

# माणूस

१४ फेब्रुवारी १९७०
चाळीस पैसे

आम्ही निराश मनानं स्टॉल्सकडून परतलो. दूरवर अंधारात एका झाडाखाली विडी पीत असलेली एक व्यक्ति मला दिसली. आम्ही झरझर चालत तिकडे गेलो. तो पोलिस होता. अगदी लाज लज्जा सारी सोडून जोशीबुवांसाठी मी पोलिसाकडे एका सिगरेटची याचना केली ! त्याच्याजवळ एकच सिगरेट शिल्लक होती. सारी रात्र थंडीत कुडकुडत काढायची होती. पण त्याने लगेच सिगरेट दिली. जोशीबुवांनी आधाश्यासारखे पाच-सहा झुरके ओढले. अक्षरशः त्यांच्याच दुसऱ्या लेखातील 'समाजवादा 'प्रमाणे सिगरेटला त्यांनी ओरबाडून ओरबाडून ओढलं. या ठिकाणी राज्यकर्त्यांची अगतिकता आणि जोशीबुवांची अगतिकता यांची जात एकच म्हणायला काही हरकत नाही. त्या गुजराथी पोलिसाला मी विचारलं...

## मौजे गांधीनगर

१४ फेब्रुवारी १९७०

समग्र साप्ताहिक
माणूस

वर्ष नववे : अंक सदतीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये

## ' व्हॉईस ' म्हणजे सूर नव्हे

आजच आपला ३१ जानेवारीचा अंक हातात पडला. माझ्या नावावर असलेला लेख वाचला आणि काही वाक्यांचा सूर खटकला म्हणून पत्राचा हा प्रपंच. घेतली ती मुलाखत असल्याने ऐकण्या-समजण्याच्या देवाण-घेवाणीत गैरसमज होण्याचा संभव असतो. कदाचित माझ्या बोलण्यातून मला काय म्हणायचं आहे ते स्पष्ट झाले नसावे. म्हणून ते लिखाणातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न.

नाटककार एकादे व्यक्तिचित्र रेखाटतो ते शब्दांतून. वाचकाच्या मनात ती प्रतिमा उभी रहाते ती ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे. पण नटाला जेव्हा प्रेक्षकांच्या पुढे त्या व्यक्तीचा आभास उभा करावा लागतो तेव्हा त्याला अनेक गोष्टींची मदत घ्यावी लागते. त्याचे स्वतःचे फिजिक, त्याच्या अभिनयाचा वकूब आणि भूमिका समजावून घेण्याची कुवत आदींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. त्यातच ' आवाजाची जात ' ही गोष्ट मोडते. नाटककाराला अभिप्रेत असलेले व्यक्तिमत्व तुमच्याशी सर्वार्थाने जुळेलच असे नाही. मग कुठेतरी तडजोड व्हावी लागते. नाटककार दिग्दर्शक, नट ह्यांचे सूर सर्व भूमिकांमध्ये जुळतातच असे नाही. नटाला ती भूमिका आपल्या व्यक्तिमत्वामध्ये mould

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

करून घ्यावी लागते. ती सुद्धा अशा कसरतीने की मूळ व्यक्तिरेखेवर basic अन्याय होऊ नये. कारण अखेर अनेक भूमिका करणारा त्याचा चेहरा, आवाज, शरीरयष्टी एकच असते. आणि मुख्यत्वे ह्याच माध्यमांच्या आणि अभिनयाच्या सामर्थ्यावर, मेकप, वेशभूषा आदी गोष्टींच्या मदतीने तो वेगवेगळ्या भूमिका साकार करतो.

पण काहीवेळा विनासायास एखादी भूमिका त्याला 'फिट्ट' बसते. त्याची सामुग्री (आभासासाठी आवश्यक ती सर्व) नाटककाराला अभिप्रेत असलेल्या व्यक्तिचित्राचे Illusion निर्माण करायला सर्वथैव योग्य ठरते. त्या बिंदूला मी 'सूर जुळले' असे मानते. 'व्हॉइस' म्हणजे 'सूर' नव्हे. 'व्हॉईस' म्हणजे आवाजाची जात. माझ्या आवाजाची जात 'बेणारे' शी फिट्ट बसली आणि म्हणून मला ते वेगळे कष्ट घ्यावे लागले नाहीत. एवढेच मला म्हणायचे होते.

'बेणारे' मला 'अनाकलनीय' वाटली नाही. पण त्यासाठी माझा पेशा आणि माझ्या आजूबाजूचे वातावरण कितपत मदत करू शकले त्याबद्दल मी साशंक आहे. आणि एखादी भूमिका अनाकलनीय वाटली नाही म्हणजे तिच्यातील गुणदोष स्वतःचेच वाटणे नव्हे. 'बेणारे' तिच्यातील गुणदोषांसकट मला आवडली म्हणजे ते गुणदोष माझेसुद्धा आहेत असे मानणे चूक होईल. अनेक भूमिका मी केल्या आहेत. करणारही आहे. त्याचा अर्थ 'त्या' म्हणजे 'मी' नव्हे. माझी मी वेगळीच आहे. रंगभूमीवर एखाद्या भूमिकेचा आभास निर्माण करताना, प्रेक्षकांना ती अनुभूती देत असताना म्हणजेच भूमिकेत सर्वथैव हरवलो आहोत असे म्हणताना सुद्धा, ती वठवणाऱ्या अभिनेत्याचे मन प्रेक्षागृहातील चलविचल टिपू शकते. लहान मुलाच्या रडण्याचा आवाज त्याला त्याच्या भूमिकेपासून दूर नेऊ शकतो, किंवा प्रेक्षकांची समरसता तो अनुभवू शकतो. हे सर्व तो भूमिकेचा आभास तन्मयतेने उभा करताना होऊ शकते. निदान माझ्या बाबतीत ते होते.

बेणारेची भूमिका ही माझीच भूमिका आहे असे मला वाटते ते स्टेजवर असताना! तशी प्रत्येक भूमिका साकार करताना ती माझीच भूमिका आहे हा विश्वास मला असतो. (अगदी नव्वद वर्षांची म्हांबरी उभी करताना सुद्धा!) तो विश्वास नसेल तर मी त्या भूमिकेत उणी पडते. अस्वस्थ होते.

बेणारेच्या भूमिकेसाठी मी तेंडुलकरांच्या डोळ्यासमोर होते ती बेणारे म्हणून नव्हे तर सुलभा देशपांडे ती भूमिका करणार आहे, तिच्या अभिनयाचा वकूब आणि आवाजाची जात ते ओळखून होते ह्या अर्थी. अर्थात भूमिका करताना मला त्रास पडला नाही, ह्याचे श्रेय मी तेंडुलकरांनाच देते. त्या भूमिकेत 'मी दुसरी तिसरी कोणी नाही पण बेणारेच वाटत होते.' असे परीक्षण लिहून परीक्षकांनी माझ्या परिश्रमांचे चीज केले आहे. पण तरीही मी 'बेणारे' नव्हे. तिचे गुणदोष माझे होऊ शकत

नाहीत. माझे आणखी वेगळे.

हिंदी नाटकाच्या दिग्दर्शनाबद्दल अजून थोडे स्पष्टीकरण. अरविंद देशपांडयांच्या मार्गदर्शनाखाली नाटकावर थोडे काम मी केले होते. अर्थात दोघांमध्ये त्याची पूर्ण चर्चा होतच होती. Movement patterns ! नेपथ्य ह्यावर मी त्यांच्या-बरोबर चर्चा केल्यामुळे हिंदी नाटकाचे दिग्दर्शन करताना वेगळा विचार करण्याची गरजच भासली नाही. किंबहुना 'लोभ नसावा, ही विनंती' ह्या नाटकाचे दिग्दर्शन त्यावेळी देशपांडे करत नसते तर हेही दिग्दर्शन त्यांनीच केले असते. श्री. सत्यदेव दुबेंची मदत ह्या बाबतीत खूपच झाली.

ह्या ओघानेच दुबेंच्या मुलाखतीतील एक वाक्य त्यांना खटकले. त्यांनी त्यांच्या वतीने देण्यास सांगितले म्हणून हे पुढील स्पष्टीकरण. 'रंगायनच्या प्रयोगाचा भाग तसा फारसा नव्हता.' हे खरे नव्हे. रंगायनचा प्रयोग आणि नाटक ह्या दोन्हीवर ते बेहद्द खूष होते. एरवी हिंदी-तून त्यांच्या संस्थेतर्फे त्यांनी रंगायनबर-हुकूम प्रयोग होऊच दिला नसता. केवळ रंगायनचा प्रयोग उत्तम झाला म्हणून हिंदी प्रयोग त्यांनी केला नाही. मूळ नाटकाचे आकर्षण त्यांना वाटले म्हणून. त्यांना म्हणावयाचे होते ते हे.

शेवटचे 'स्वगत' साहित्याचा नमुना म्हणून मला स्वतःला अतिशय आवडते. प्रेक्षकांना बेणारे कळावी म्हणून ते आवश्यकही असेल. पण तरीही, न बोलणारी, बोललेलं कळणार नाही म्हणून तडफडणारी बेणारे न बोलताही खूपसं सांगून गेली असती. आणि 'ती' बेणारे अभिनेत्री ह्या नात्याने मला जास्त आवडली असती. पण प्रेक्षकांना सर्व काही सरळ, सोपं, विनासायास उत्तर येणारं गणित आवडतं हेच शेवटी खरे !

जानेवारी २९। सौ. सुलभा देशपांडे, मुंबई

आपल्या २४ जानेवारीच्या अंकातील सौ. पुष्पा भावे यांनी केलेले 'ग्रँड रिड-क्शन सेल' या नाटकाचे परीक्षण वाचले. या एकाच परीक्षणकर्तीने माझ्यावर टीका केली याबद्दल मला बिलकूल राग नाही. त्यांच्या नाट्यपरीक्षणाबद्दल मला काहीच म्हणायचे नाही. समजणारा काय ते समजून घेईल. या परीक्षणात त्यांनी 'निखारे' या नाटकाचा उल्लेख केला आहे. अर्थात तो चांगल्या संदर्भात आहे असे वाटते. म्हणून त्यांना काही प्रश्न विचारावेसे वाटतात.

आपण 'निखारे' पाहिलेत का ?

पाहिले असल्यास ते आपणास आवडले का ?

आवडले असल्यास ते का आवडले ?

आवडण्यासारख्या कोणत्या गोष्टी त्यात होत्या ?

हे प्रश्न विचारण्याचे दुसरेही कारण असे की, परीक्षण करताना त्या मोठ्या अधिकारवाणीने दिग्दर्शनावर आणि प्रकाशयोजनेवर लिहित्या झाल्या. म्हणजे त्यांच्या वकुब मोठा असणार ! तेव्हा मला न समजलेले 'निखारे'तले काही मुद्दे त्यांच्याकडून कळावेत ही इच्छा ! गैरसमज न व्हावा ही विनंती.

जानेवारी ३१ रमेश चौधरी, मुंबई

# मनस्वी चीड आणणारे हे परावलंबित्व!

ता. ३१ डिसेंबर १९६९ ते ४ जानेवारी १९७० पर्यंत बडोद्याला डेअरी इंडस्ट्री कॉन्फरन्सला मी गेलो होतो. तेथे 'ऑपरेशन फ्लड' नावाने ओळखल्या जाणाऱ्या दूधयोजनेची माहिती झाली. आपली झोळी पसरून भीक मागण्याची वृत्ती कमी होण्याऐवजी वाढतेच आहे. ह्याची मजल देशद्रोह वाटावा येथपर्यंत गेली असावी असे वाटते. ह्या योजनेन्वये युरोपीय राष्ट्रांकडून १,२६,००० टन दुधाची भुकटी व ४२००० टन बटर ऑईल किंवा तूप देणगी म्हणून भारत सरकार घेणार आहे. दुधाची भुकटी व तूप यांचे मिश्रण करून मुंबई, कलकत्ता, मद्रास व दिल्ली ह्या शहरात ह्या दुधाचा महापूर निर्माण करण्यात येणार आहे. हे दूध फुकटच पडणार आहे. परंतु त्याच्या विक्रीतून १०० कोटी रुपये नफा करण्याची कल्पना आहे व ती रक्कम दूधविकासाकरिता वापरावयाची योजना आहे. ह्या सर्व देणगीबरोबर अर्थातच परदेशी मशीनरी घ्यावी लागणार आहे, व महाराष्ट्रातील दुधाचा धंदा ह्या पुरता अक्षरशः वाहून जाईल अशी भीती आहे. आपल्या योजनाकारांना १०० कोटी रुपये पाहून तोंडाला पाणी सुटले आहे. आपले परावलंबित्व व भीक मागण्याची वृत्ती मनस्वी चीड आणणारी आहे. ह्यासंबंधी एक लेख आपणाकडे पाठविण्याचा विचार आहे. आपली 'अन्न स्वतंत्रता संचलन मोहीम' या पार्श्वभूमीवर फारच उठून दिसते.

जानेवारी १७ — र. गो. करमरकर

बाँबे एक्सप्रेस डेअरी फार्म, दिंडोशी

---

आपला १५ ऑगस्टचा 'स्वातंत्र्यदिन विशेषांक' साधारणपणे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात सागरी-टपालाने मिळाला. संपूर्ण अंक अपेक्षेप्रमाणेच उत्तम होता. मुखपृष्ठ जितके बोलके होते तितकेच बोचकही होते. त्याचप्रमाणे संपादकीय जितके उल्लेखनीय होते, तितकेच अंतर्मुख करणारेही होते. याच पार्श्वभूमीवर आठवणीत रहावी अशी एक घटना घडली. त्याच अनुषंगाने हे पत्र लिहीत आहे.

सध्या अमेरिकेत 'ड्राफ्ट लॉटरी' हा चर्चेचा विषय आहे. विएतनाम अथवा जिथे अमेरिकेचा लष्करी तळ आहे अशा ठिकाणी पाठवण्यासाठी अमेरिकेत १८ ते २६ वयाच्या तरुणांची लष्कर भरती केली जाते. ही लष्कर भरती कोठल्यातरी एका ठराविक पद्धतीने करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष श्री. निक्सन यांनी जन्मतारखांची लॉटरी काढली आहे, व त्यानुसार सध्या लष्कर भरती चालू आहे. लॉटरी जाहीर झाल्यावर दुसऱ्याच दिवशी सकाळी मी, माझे काही सहकारी व आमचा बॉस ऑफिसमध्ये त्याबद्दल चर्चा करीत असताना, अचानक आमच्या बॉसने तुमच्या भारतात ड्राफ्टचे काय

नियम आहेत? असे विचारले. मी काही उत्तर देण्याच्या अगोदरच दुसरा एक अमेरिकन सहकारी म्हणाला, 'कदाचित् त्यांच्या देशात जगण्यासाठी लष्कर हाच एक चांगला मार्ग आहे. अन्न अन्न करीत भुकेने तडफडण्यापेक्षा लष्करात भरती झाले की निदान पोटाचा तरी प्रश्न सुटतो.'

'शट् अप, दुसऱ्याच्या देशाबद्दल पुरेशी माहिती नसताना अशी बेजबाबदार विधाने करू नकोस,' उसळत्या स्वरात मी ओरडलो. नंतर जवळजवळ दोन तास चर्चा करून मी माझ्या सहकाऱ्यांना पटवून दिले की, भारताला 'फूड प्रॉब्लेम' जरूर आहे. पण तो तुम्हाला ज्या स्वरूपात वाटतो त्या स्वरूपात नक्कीच नाही. आमच्या माणसांसाठी आमच्याच देशात आम्ही अन्न जरूर पिकवू शकतो; परंतु सदोष अन्नवाटप व इतर काही कारणांमुळे आम्हाला थोड्याफार प्रमाणात 'फुड प्रॉब्लेम' आहे. या प्रॉब्लेमची आमच्यापैकी प्रत्येकाला चांगलीच जाणीव आहे.


अमेरिकेत अन्नप्रश्नावरून अपमानित होण्याची ही पहिलीच वेळ नव्हे. अशी वेळ आम्हा भारतीयांवर कित्येकदा येते. अन् मग देशाचा प्रश्न म्हणून बराच वेळ खर्च करून सगळी कहाणी पटवून द्यावी लागते. अमेरिकेकडे भीक मागून आम्ही आमची पोटे जाळतो, व आम्हाला भीक वाढून अमेरिका आमचा स्वाभिमान जाळते. अन्नमदतीविषयी कोणतीही चर्चा करीत असताना तुमचे एक वाक्य नेहमीच डोळ्यांसमोर असते. 'आम्ही एकवेळ भूकबळी होऊ, पण यापुढे भीकबळी होणे नाही.'

कुठल्याही अमेरिकन व्यक्तीला 'आम्हालाही स्वावलंबी व्हायचे आहे' ही गोष्ट तळमळीने पटवून देताना, जेव्हा ती व्यक्ती 'पी. एल्. ४८०' अथवा इतर मदतींचा विषय काढते, तेव्हा मन अंतर्मुख होते व माझी मलाच कीव येऊ लागते. पी. एल्. ४८० च्या पार्श्वभूमीवर आमचे जीव तोडून पटवून देणे म्हणजे फुकाची बडबडच नव्हे काय?

७१ सालपर्यंत वाट न पहाता, सत्तर सालीच, थोडी अडचण सोसूनही का होईना, गांधीजींच्या ह्या देशाने, गांधीजन्मशताब्दीनिमित्त पी. एल्. ४८० सारखे करार रद्द करून भिकेच्या भाकरीवर लाथ मारावी असे आपल्या प्रमाणे आम्हासही वाटते. 'मदती'-सारख्या गोंडस शब्दाचा आधार घेऊन निर्लज्जपणे भिकेचा वाडगा पुढे करणे, व त्यायोगे आपले राजकीय स्वातंत्र्य बड्या राष्ट्रांकडे गहाण टाकणे, ह्या कृतीविरुद्ध प्रखर आंदोलन वेळीच उभारले पाहिजे. 'अन्नस्वतंत्रता संचलन' व इतर विधायक कार्यास सक्रिय पाठिंबा दर्शविण्यासाठी भारताबाहेर राहून जर काही करता येण्यासारखे असेल तर आम्हास जरूर कळवावे. पी. एल्. ४८० करार रद्द होण्यासाठी आपण उभारीत असलेल्या आंदोलनास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे हातभार लावण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते तयार आहेत.

जानेवारी ४ — जगदीश राऊत

अटलांटा, जॉर्जीया, यू. एस्. ए.



# दिल्ली

## दिनांक ३ फेब्रुवारी

### चंदीगडच्या हत्तीचे शेपूट

चंदीगडचा हत्ती मेला, फक्त शेपूट राहिले असे विधान मागल्या वार्तापत्रात केले तेव्हा हे शेपूटही आठवडयाभरात जाईल अशी अपेक्षा होती. पण चंदीगड अखेर पंजाबला देतानाही इंदिराजींनी ज्या दोन मोठ्या अटी घातल्या त्यामुळे हत्तीचे शेपूट प्रत्यक्ष हत्तीपेक्षाही मोटे होणार की काय असे वाटू लागले आहे. अट क्रमांक एक : चंदीगड पंजाबला द्यायचे खरे, पण प्रत्यक्ष कब्जा पाच वर्षानंतर. क्रमांक दोन : फाजलका हा अत्यंत सुपीक जिल्हा पंजाबने हरियानाला द्यायचा. परिणाम असा झाला की चंदीगडचा प्रश्न कठीण होताच, पण उत्तर त्याहून कठीण झाले. एकीकडे हरियानात चंदीगड मिळाले नाही म्हणून दंगे झाले तर दुसरीकडे पंजाबात फाजलका गेले म्हणून काही अतिरेकी सरदारजींनी संत फत्तेसिंगांना बांगडया अन् दुपट्टयाचा अहेर केला. शिवाय पंजाब प्रांतीय जनसंघाने गुरनामसिंगांना केंद्र सरकारचा निर्णय स्वीकारू नका असा निर्वाणीचा इशारा दिला व तो धुडकावून लावण्यात आल्यावर अदोलन सुरू करायचे ठरवले ते वेगळेच.

दिल्लीतल्या राजकारणी मंडळींची प्रतिक्रिया काय ? अर्थात प्रत्येक राजकीय पक्ष प्रस्तुत निर्णयाचा आपल्या राजकारणाला कसा उपयोग करून घेता येईल हे पाहण्यात गुंतला आहे हे सुज्ञास सांगणे नलगे. निर्णय चांगला की वाईट यावर कोणीच मत प्रदर्शित केले नाही. पण काही पक्षांनी–विशेषत: संसोपा अन् विरोधी कॉंग्रेसने–इंदिराजींनी प्रस्तुत प्रकरणी घेतलेल्या ' माघारी'ची हेटाळणी केली आहे. राजसुभगसिंग उवाच : ' हरियानात जे प्रकार झाले ते पंतप्रधानांनी व त्यांच्या सरकारने परिस्थिती हाताळण्यात चूक केल्यामुळे घडले. चंदीगड प्रकरणाची चर्चा चालू असताना इंदिराजींनी नेहमी दोन्ही बाजूच्या मंडळींना आशा दाखविली. त्या आशेची निराशा झाल्यामुळेच ही नासधूस व प्राणहानी झाली.'

### उत्तर प्रदेशात इंडिकेट–सिंडिकेट सामना

चंदीगडचा ' निकाल ' लागला त्याच सुमारास उत्तर प्रदेश प्रकरणाला उकळी फुटून त्या निमित्ताने पुन: एकदा इंडिकेट–सिंडिकेट कसोटीचा सामना सुरू झाला

आहे. उत्तर प्रदेशचे भाक्रांदी नेते चरणसिंग नुकतेच दिल्लीला येऊन इंदिराजींशी बातचीत करून गेले. सरकारी कॉंग्रेसचे उत्तर प्रदेशीय नेते कमलापति त्रिपाठी अन् चरणसिंग या दोघांनी मिळून चंद्रभानु गुप्तांचे सरकार उलथून पाडायचे असा मनसुबा रचला आहे. —पण नवीन सरकारात मुख्यमंत्री कोणी व्हायचे हा प्रश्न अवघड जगाचे दुखणे ठरणार असे दिसते. त्रिपाठी व चरणसिंग या दोघांनीही या बाबतीत इंदिराजींचे म्हणणे ऐकायचे ठरवले आहे, व विशेष म्हणजे चरणसिंगांनी जाहीररीत्या असे आश्वासन दिले आहे. पण मॅन प्रपोझेस् पार्टी डिस्पोझेस् ! चरणसिंगांचे हे आश्वासन त्यांच्या अनुयायांना रुचलेले नाही. आपलाच नेता मुख्यमंत्री झाला पाहिजे असा त्यांचा हट्ट आहे; इतकेच नव्हे तर चरणसिंग–इंदिरा वाटाघाटीत इंदिराजींनी त्यांना मुख्यमंत्रिपदाचे स्पष्ट वचन दिले नाही याबद्दल त्यांचा इंदिराजींवर रोष आहे असे म्हणतात.

दरम्यान गुप्ता सरकारची परिस्थिती इतकी नाजुक झाली आहे की विरोधी कॉंग्रेस–श्रेष्ठींनी राजधानीत एक तातडीची बैठक घेतली व काहीतरी उपाययोजना करायचे ठरवले. गुप्ताजी स्वत: या बैठकीला हजर होते. त्यांनी एकंदर परिस्थिती विशद करताना असा दिलासा दिला की अजूनही डझनभर मते आपल्या खिशात आहेत. पण केवळ डझनाच्या बहुसंख्येवर राज्य करू पाहणारे गुप्ताजी केव्हाही गडगडू शकतील हे ओळखून सिंडिकेटने पहिला उपाय योजला तो म्हणजे प्रत्यक्ष मोरारजींना उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर पाठविले आहे. स्वत: अप्पाही म्हणे 'ॲट शॉर्ट नोटीस' निघण्याच्या तयारीत बसले आहेत. सिंडिकेट श्रेष्ठींना ऐनवेळी ही धावाधाव करावी लागत आहे याचे कारण सरकारी कॉंग्रेस एवढा पेचप्रसंग उभा करण्याइतकी जोरदार होईल अशी त्यांची खरोखरीच अपेक्षा नव्हती. वास्तविक परिस्थिती आता इतकी विकट झाली आहे की चरणसिंगांचा हुकमाचा एक्का हस्तगत करण्यासाठी गुप्ताजींनी त्यांना काही अटींवर मुख्यमंत्रिपदही देऊ केले आहे असे म्हणतात. गुप्ता सरकार कोसळले व उत्तरप्रदेश इंदिरा–गटाच्या हातात गेला तर सरकारी कॉंग्रेसला तर नवीन अवसान येईलच, पण केंद्रीय राजकारणालाही नवा रंग चढण्याची शक्यता आहे.

चरणसिंगांच्या मागोमाग बिहारमधले इंदिरानुयायी दरोगाराय हेही दिल्लीला इंदिरा–दर्शनाला येऊन गेले. बिहारमध्ये संसोपाच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होण्याची शक्यता दिसू लागल्यावरोबर टरकलेले दरोगाराय दिल्लीला धावत आले आणि त्यांनी इंदिराजी, जगजीवनराम, यशवंतराव इत्यादी श्रेष्ठींना भेटून आपले सरकार स्थापन करायची परवानगी मिळवली. प्रसोपाचे निदान प्रांतीय पातळीवर तरी सहकार्य लाभेल अशा समजुतीवर सरकारी कॉंग्रेस–श्रेष्ठींनी दरोगारायांना हिरवा कंदील दाखविला होता. परंतु प्रसोपाच्या सध्या चाललेल्या बैठकीत दरोगा-

रायांना पाठिंवा देण्याची कल्पना नामंजूर करण्यात आली असल्याने सध्यातरी दरोगारायांचा बार फुसका निघाला आहे.

## गफारखान, पाहुण्यांनी केव्हा जावे ?

गफारखान भारतात आले तेव्हा दिल्लीतल्या त्यांच्या वास्तव्याची (अन् वक्तव्यांची) दखल एका वार्तापत्रात घेतली होती. त्यानंतर ते दौऱ्यावर गेले व बऱ्याच ठिकाणी हिंडले. अर्थात बरीच भाषणे झाली, व या भाषणातून हळूहळू जो सूर उमटू लागला तो एका निराळ्याच अर्थाने विचारप्रवर्तक ठरला. अखेर "पाकिस्तानातल्या हिंदूंची परिस्थिती भारतातल्या मुसलमानांच्या परिस्थितीपेक्षा अधिक चांगली आहे !" असे अफाट विधान करून गफारखानांनी अनेक भारतीयांच्या मनात उद्‌भवलेल्या साधार कुशंकेवर शिक्कामोर्तब केले.

भारताचा निरोप घेण्यासाठी गफारखान आता दिल्लीला आले असून नुकतीच त्यांनी एक 'मानवी बंधुता परिषद' या राजधानीत भरवली. अर्थात असा काही उच्च विषय म्हटला की जयप्रकाश नारायण हवेतच. पण गंमत अशी की त्यांच्या जोडीला शेख अब्दुल्लाही होते. या परिषदेची कल्पना गफारखानांनी काही दिवसांपूर्वी काढली तेव्हा ती फक्त मुसलमानांसाठीच आहे असा रागरंग दिसत होता. पण पुढे ती सर्व 'राष्ट्रीय वृत्ती'च्या लोकांसाठी आहे असा गफारखानांनी खुलासा केला. एकी वाढविण्यासाठी भरवलेल्या या परिषदेचा आरंभ स्वतः गफारखानांनी


**पुरंदऱ्यांची नौबत**

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

बेकीने केला. ते म्हणाले, सबंध परिषदेने मिळून काही ठरविण्यापूर्वी स्पष्ट चर्चेला वाव मिळावा म्हणून हिंदु व मुसलमानांनी वेगवेगळे बसून चर्चा करावी. लगेच काही ख्रिस्ती मंडळी म्हणाली, "मग आम्ही कुठे जायचे ?" पण प्रथमग्रासे मक्षिकापात व्हायच्या आत जयप्रकाशजींनी हिंदूंना एका कोपऱ्यात नेले व गफारखान मुसलमान मंडळीत बसले. पण अब्दुल्ला म्हणाले, "गफारखान किती केले तरी बाहेरचे आहेत. त्यांनी आमच्यात बसू नये. शेवटी आम्हा भारतीयांनाच आमचे प्रश्न सोडविले पाहिजेत." "आम्ही भारतीय," बरं का मंडळी! याच अब्दुल्लाने मागे स्वतःला भारतीय म्हणवून घ्यायला नकार दिला होता हे बरेच जण विसरले नसतील.

असो. प्रस्तुत परिषदेत गांधीजींच्या सेवाभावी तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी व पर्यायाने हिंदु–मुस्लिम बंधुभाव वाढविण्यासाठी 'खुदाई खिदमतगार' नावाची संस्था काढायची असे ठरले व या संस्थेची घटना तयार करण्यासाठी जयप्रकाश नारायण, शेख अब्दुल्ला इत्यादी मंडळींची एक समिती नेमण्यात आली आहे. अर्थात अब्दुल्लाच्या मनात अभावाने तळपणारा हिंदु–मुस्लिम बंधुभाव लक्षात घेतला म्हणजे त्याच्या मार्गदर्शनाखाली जन्माला येऊ घातलेल्या संस्थेची जन्मपत्रिका कशी असेल हे ओळखायला ज्योतिषी नको.

## समाजवादी मुंगीची पदयात्रा

प्रसोपा व संसोपा या दोन समाजवादी पक्षांनी पुनः विलीन व्हावे या जुन्या कल्पनेच्या मुंगीने इतक्या दिवसांनी पुनः आपली पदयात्रा चालू केली आहे. संसोपाने सोनपूरच्या अधिवेशनात असा ठराव केला होता. त्यानंतर आता संसोपाचे सरचिटणीस फर्नांडोस यांनी नानासाहेब गोऱ्यांना पत्र पाठवून असा आग्रह केला आहे की, 'इंदिरा–सरकार उलथून पाडायचे की नाही' या 'असंबद्ध' मुद्याच्या वादात गुरफटून न जाता अधिक वरच्या पातळीवर एकीकरणाच्या कल्पनेचा पाठपुरावा करू या. इंदिराजींच्या समाजवादाच्या फोलपणाचा लांबलचक पुरावा पत्रात मांडून जॉर्जसाहेब म्हणाले, इंदिराजींचा पक्ष व त्यांचे सरकार या दोन्हींनी केवळ समाजवादाचे पांघरूण घेतले असल्याने आमचा त्यांना विरोध आहे; तरीदेखील इंदिरा–सरकार पाडण्याच्या मुद्यावर आपण पुढे सविस्तर चर्चा करू या. प्रसोपाचे म्हणणे असे आहे की संसोपाचा सोनपूरचा ठराव तितकासा स्पष्ट नाही. शिवाय संसोपाने बिहारमध्ये जनसंघ, स्वतंत्र इत्यादी मंडळींशी हात मिळवून संयुक्त विधायक दल स्थापन केले आहे, हा समाजवाद कुठला ' तरीदेखील संसोपाशी वाटाघाटी करण्यासाठी प्रसोपाने नानासाहेब व आणखी दोघे अशी एक समिती नेमली आहे. तात्पर्य ही समाजवादी मुंगी चालू लागली आहे खरी, पण तिचा पाय मुरगळलेला दिसतो

– अनामिक

# मुक्ताफळे

## अय्या आणि इश्श

आपली दो या तीन मुले शाळेत जातात. आपल्या मुला–मुलींनी काय शिकावे अथवा शिकू नये यावर भारत सरकारचे संशोधन सतत चालू असते. 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँन्ड ट्रेनिंग' या नावाची अगडबंब संस्था यासाठी सतत कार्यरत असते. रतीदेवाने आपल्या देशात जो धुमाकूळ घातला आहे त्याचा बंदोबस्त शालेय शिक्षणापासून करायला पाहिजे असे या संस्थेने आता नक्की ठरवले आहे. या संस्थेचे प्रमुख प्रा. अय्या हे नुकतेच म्हणाले –

" इतिहास, भूगोल आणि समाजशास्त्र या विषयांवरील शालेय पाठ्यपुस्तकांतून कुटुंबनियोजनाच्या कल्पना मुलांच्या डोक्यात भरण्यासाठी मुद्दाम प्रयत्न करण्याचे आम्ही ठरवले आहे. "

एका मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिकाबाईंनी सर्व शिक्षिकांची सभा घेतली व अय्या काय म्हणतात ते सांगितले. "या बाबतीत आपल्याला तावडतोब काय करता येईल ?" असा त्यांनी सहकारी शिक्षिकांना प्रश्न विचारताच चहूबाजूंनी 'इश्श' 'इश्श' असे आवाज निघाले. आम्हाला हे लक्षण ठीक दिसत नाही. यात लाजण्यासारखे काय आहे बुवा ? अशा बातम्या भारत सरकारच्या नावावर छापून येतात याची 'लाज' दिल्लीतील मोठ्या बाईंना वाटत नाही, तर शाळेतील शिक्षिकांना वाटण्याचे कारण काय ?

खरे पहाता दिल्लीश्वरांच्या समाजवादाचे हे नवे आव्हान, शाळेतील शिक्षक–शिक्षिका कसे काय पेलतात हा खरा प्रश्न आहे. इतिहास अथवा भूगोल शिकवता शिकवता शिक्षक हे करू लागले की हे दोन्ही विषय किती बरे खुमासदार होतील ?

पृथ्वीभोवतीचा काल्पनिक करगोटा म्हणजे बरं कां बाळांनो, विषुववृत्त, हे सांगितल्यावर शिक्षिकाबाईंनी लगेच "म्हणजे किनई विषुववृत्त हा पृथ्वीभोवती पडलेला लूपच नाही का ?" असे म्हटले तर काय हो बिघडणार आहे ?

सूर्यापाठोपाठ श्री. व सौ. विधाते यांना पृथ्वी झाली. पृथ्वीच्या पाठीवर 'काही दिवस जाताच' चंद्र झाला. सौ. विधाते यजमानांना म्हणाल्या सुद्धा–' आता गडे पुरे हो ! दो या तीनच पुरे. जास्ती झाली तर रिक्षावाला, टॅक्सीवाला काय म्हणेल ?" परंतु विधात्याने ते ऐकले नाही. किरट्या आणि अशक्त पोरांनी घर भरून टाकावे त्याप्रमाणे त्याने असंख्य किरकोळ तारकांनी आकाश भरून टाकले. खूप मुले झाली तर सर्वांच्या वाढीकडे लक्ष देता येत नाही ही गोष्ट मुलींनो, आली ना ध्यानात ? वा: !

जिथे सहा महिने रात्र असते आणि सहा महिने दिवस असतो तिथे खूप थंडी असूनही लोकसंख्या कमी आढळते. याचे मुख्य कारण सहा महिने रात्र असूनही तेथील माणसे कुटुंबनियोजन करतात हेच होय – असे सांगायला काय हरकत आहे ? जो जो विचार करावा तो भूगोल विषयाची प्रचंड आसक्ती मुलात कशी निर्माण होईल या विचाराने आमच्या अंगावर रोमांच येत आहेत.

इतिहासात नेहमीच वाटेल ते करता येते ! माँसाहेबांनी शहाजीराजांना याबाबतीत कसे खडसावले, याचा पाठ्यपुस्तकासाठी संवाद प्रा. वसंत कानेटकर छान लिहून देतील.समस्त भोसले कुटुंबाच्या खासगी जीवनावरील एवढी अँथॉरिटीआज अन्य नाही.

" राजे आम्हास दो या तीनच पुत्र पुरे आहेत ! शिवबाला बहिण हवीच हे टुमणे तुम्ही आमच्यामागे सतत लावू नका. यवनांच्या – [ इथे ' अल्पसंख्याकांच्या ' म्हटले तर लवकर समजेल ] राज्यात, आया–बहिणींची अब्रू सुरक्षित नसताना, बहिण असण्यापेक्षा नसलेलीच बरी नाही का ? स्वराज्याचे लग्न लावण्यासाठी जन्मलेल्या शिवबाच्या मागे बहिणीचे लग्न करण्याची जबाबदारी राजे तुम्ही टाकू नये. मुले होणे ही तो श्रींची इच्छा, असे आपण पुनः पुनः म्हणता ते आम्हास मंजूर नाही. यात श्रींचा काहीही संबंध नाही. आपण उदईक मोहिमेवर जाणार आहात, परंतु आजच सायंकाळी जावे ! "

माँसाहेबांनी शिवबाला लहानपणी रामायण–महाभारतातील गोष्टी जशा सांगितल्या तसेच कुटुंबनियोजनाचे महत्त्वही पटवले होते. नाहीतर आठ विवाह करूनही फक्त दो या तीनच मुले शक्य होते काय ?

तात्पर्य, इतिहास अथवा भूगोल, कुटुंबनियोजनप्रधान करणे फारसे कठीण आहे असे आम्हास वाटत नाही. ' लाज ' वाटणाऱ्या गोष्टी खुबिदारपणे कशा सांगाव्या याबाबतीत साहेबापासूनही खूप शिकता येईल.

एका प्रख्यात कॉमेडियनची ही गोष्ट आहे.

बी. बी. सी. वर असा नियम आहे की जननक्रियेशी दूरान्वयाने संबंध जोडणारे विनोद...म्हणजे अश्लील असे काही विनोदवीरांनी सांगायचे नाही. सशाच्या युगुलाची प्रसवक्षमता अति प्रचंड आहे अशा गोष्टीचा उल्लेखही करू नका अशी ताकीद हसवण्याचा धंदा करणाऱ्या कलाकारांना बी. बी. सी. अधिकाऱ्यांनी आधीच दिली होती. त्या विनोदवीराने कार्यक्रम सुरू केला –

' इंग्लंडमध्ये नव्याने तयार होणाऱ्या जेट विमानाची गती फार म्हणजे फारच आहे. मी परवाच जेटने न्यूयॉर्कला गेलो. लंडनहून निघताना विमानात एक सशाची जोडी होती. न्यूयॉर्कला विमान पोचले तेव्हा देखील विमानात ती फक्त जोडीच होती...यावरून जेट विमानाच्या वेगाची आपल्याला कल्पना येईल ! "

मनात आणले तर आपणाकडील पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळही मुलांसाठी कुटुंबनियोजनप्रचुर, खुमासदार पुस्तके लवकरच निर्माण करतील.

अय्या ऽऽ ! मग किति किति मौज होईल नाही ? – ग्यानबा

# रक्तपट

विजय तेंडुलकर

# प्ले डर्टी

हा रक्ताळ चित्रपट आहे सप्तरंगी. पण त्याचे रंग वाळवंटाची रूक्ष चित्रणे, पेटलेले आकाश, लालसेने आणि क्रौर्याने विद्रुप झालेले चेहरे आणि मुख्यतः लालभडक दाट ओले ओले रक्त दाखवण्यात खर्ची पडले आहे....

---

उत्तर आफ्रिकेत गेल्या दुसऱ्या महायुद्धात बेचाळीस त्रेचाळीस सालच्या सुमारास रोमेल नावाच्या जर्मन सेनानीने दोस्त राष्ट्रांच्या फौजांच्या नाकी नऊ आणले होते. वाळवंटातल्या युद्धशास्त्रात हा रोमेल फार पारंगत होता. याला निष्प्रभ करण्यासाठी दोस्त राष्ट्रांच्या सेनानींनी डोकी खाजवून सरळ युद्धापलीकडे अनेक आडमार्ग अमलात आणले. त्यात लाँग रेंज डेजर्ट ग्रुप आणि स्पेशल एअर सर्व्हिस अशा दोन यंत्रणा होत्या. प्रत्यक्ष लष्करात यांची जमा नव्हती; लष्कराला या साहाय्यभूत होत आणि अनेक उलटया काळजाच्या लष्करी डावपेचात यांना इरेस घातले जाई. यात शत्रूच्या पिछाडीपर्यंत शिरकाव मिळवून त्याचे साठे उडविणे आणि रसद तोडणे या गोष्टींचा समावेश होता. असल्या हालचाली करताना मरणाच्या खाईतून प्रत्येक क्षणी जात रहावे लागे. अशाही स्थितीत मेंदू आणि शरीर तेज ठेवून वापरावे लागे. हे जमणाऱ्या माणसांची एक वेगळी जातच असे. ही माणसे संख्येने कमी उपलब्ध होत. साहजिकच त्यांना भारी मोबदला द्यावा लागत असे आणि त्यांचे पूर्वचारित्र्य दुर्लक्षावे लागे. बहुधा असल्या राक्षसी जिद्दीची ही माणसे काही अनैसर्गिक प्रवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्ती, एका प्रकारची बेमुर्वत मवाली वृत्ती अंगी मुरलेली असत. बहुधा ह्यांच्या आयुष्याने त्यांची होलपट करीतच त्यांना या भयंकर जगण्यात आणून टाकल्याने त्यांच्या पोटात ओतप्रोत सूड आणि चीड भरलेली असे. 'डर्टी डझन' या गाजलेल्या युद्धपटात अशाच प्रवृत्तींचे मरणाच्या खाईतले दर्शन होते. 'प्ले डर्टी' हे या चित्रपटाचे भावंड असेच आणखी एक दर्शन, आधारार्थ दुसऱ्या महायुद्धात उत्तर आफ्रिकेत घडलेली एक सत्यकथा घेऊन, घडविते.



सारे ठार झाले – उरले फक्त दोघेच....

कर्नल मास्टर्स हा वस्तुतः प्राचीन इतिहासाचा प्राध्यापक; युद्धशास्त्र शिकून या युद्धात उत्तर आफ्रिकेत आला. दोन हजार वर्षांतल्या वाळवंटी युद्धशास्त्राचा त्याचा गाढा व्यासंग होता. लाँग रेंज डेझर्ट ग्रुप या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सैलसर संघटनेतल्या अमानुष जिद्दीच्या बाजारबुणग्यांच्या एका गटाचा तो प्रमुख होता. वाळवंटी युद्धशास्त्र विसाव्या शतकातही मूलतः वीस हजार वर्षांपूर्वी होते तेच आहे असा त्याचा सिद्धांत होता. या सिद्धांतानुरूप आखलेले त्याचे अनेक लष्करी डावपेच आणि चढाया रोमेलच्या फौजेच्या जागरूकतेने म्हणा की मुळातल्याच गफलतीने म्हणा, एकामागोमाग फसल्या होत्या. लष्करी वरिष्ठांनी त्याला अखेरची

संधी म्हणून एक कामगिरी नेमून दिली. शत्रूच्या पिछाडीला सुमारे साडेसहाशे मैल जाऊन जर्मनांचा तेलसाठा उध्वस्त करावयाचा. हिरवट डोळ्यांचा मास्टर्स म्हणाला, ठीक आहे. युद्धाआधी तेलाच्या नळांचा तज्ज्ञ म्हणून काम करणारा कॅप्टन डग्लस म्हणून एक ब्रिटिश लष्कराच्या इंजिनियर्सच्या पलटणीतला तरुण अधिकारी या कामी प्रत्यक्ष चढाईसाठी मास्टर्सच्या हवाली करण्यात आला. मास्टर्सचे भयानक जिद्दीचे वेचीव लष्करी बाजारबुणगे याच्या हाताखाली या कामगिरीवर नेमले गेले. आणि कर्नल मास्टर्सने एका प्राचीन प्रदीर्घ वाळवंटी मार्गाचा निर्देश नकाशा-वर करून या मार्गाने या तुकडीने शत्रूच्या पिछाडीला जावयाचे असे नेमून दिले. या कामी वाळवंटी प्रवासातला दर्दी म्हणून लीच् नामक प्रमुख लष्करी बाजार-बुणगा कॅप्टन डग्लसची संगत करणार होता. आणि ज्यांचा आगापिच्छा ठावे नाही असे पाच इतर या दोघांबरोबर असणार होते.

लीचला वरिष्ठांनी एक समज दिली होती. कॅप्टन डग्लसला जिवंत परत आणण्याची जबाबदारी त्याची. त्याबद्दल त्याला एक घसघशीत इनाम देण्याचे अभिवचन देण्यात आले होते. कारण अशा गनिमी चढायात हे भयंकर बाजार-बुणगे बरोबरच्या मुख्य लष्करी अधिकाऱ्याचा खातमा चिडीने नाहीतर लोभाने करून टाकीत आणि लढाईत तो कामी आला असे नंतर सांगून नामानिराळे होत. लीच् सलाम ठोकून म्हणाला, इनाम पक्के तर डग्लसला जिवंत परत आणतो, हुजूर. काळजी नसावी.

सर्व निघाले. एकेक अनुभव एकाहून एक भयानक. त्यात आग ओकणारे नाही-तर गारठ्याने हाडे फोडणारे वाळवंट. सरळ वाट नसलेला मार्ग. आणि यातच तरुण कॅप्टन डग्लसला पहिल्या काही वेळातच असे दिसून आले की लष्करी शिस्तीने, 'प्रमुख' म्हणून आपले इथे कोणी ऐकणार नाही. आपले प्रभुत्व आपल्याला सिद्ध करूनच प्रस्थापित करावे लागणार. साडेसहाशे मैलांची मजल मारावयाची होती— या असल्या अनोळखी, बेमुर्वत, लोभी सैतानांबरोबर. पण दुसरा पर्यायच नव्हता आणि कॅप्टन डग्लस हा धीम्या वृत्तीचा आणि थंड डोक्याचा चिवट ब्रिटिश माणूस ही अपरिहार्यता पत्करून एका निर्धाराने, प्रसंगी एकाकी आणि वेड्या निर्धाराने वागू लागला. कधी वरचढ तर कधी केविलवाणा ठरू लागला.

विशिष्ट लष्करी उद्देशाने वाळवंट तुडविणाऱ्या या तुकडीला वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचा आणखी एक डाव माहीतच नव्हता. ही तुकडी मुळी या उलट्या काळजाच्या वरिष्ठांनी जर्मनांहाती बळी देण्यासाठीच पाठवली होती; आणि हिचा बळी घेण्यात गुंतलेल्या जर्मनांना टाळून लष्करी उद्दिष्ट फत्ते करण्यासाठी मेजर वॅटकिन्सच्या अखत्यारात वेगळी नवी तुकडी त्यांनी पाठोपाठ धाडली होती!

परंतु आफ्रिकेच्या वैराण वाळवंटातही नशीब नावाचे काहीतरी फिरत असते. मेजर वॅटकिन्स आणि त्याची तुकडी जर्मनांहाती पडली आणि जर्मनांनी त्यांना

कोंडीत पकडून घुशीसारखे ठार केले. कॅप्टन डग्लस आणि त्याची तुकडी बचावली --पण कशासाठी ? जर्मनांच्या तेलसाठ्यावर हल्ला चढवून, तो उडवून त्यातच निकालात निघण्यासाठी. सारे ठार झाले--उरले दोघेच. कॅप्टन डग्लस आणि त्याला जिवंत परत नेऊन अधिकाऱ्यांपुढे हजर करून इनाम पटकाविण्याच्या जिद्दीनें पेटलेला लीच्. या शेवटच्या दृश्यात लीच डग्लसला म्हणतो, कॅप्टन, तुला जिवंत परत पोचवायचा या माझ्या निश्चयामुळेच तू अद्याप हयात आहेस. आणि या निश्चया-साठीच बहुधा मीही अजून वाचलो आहे. कॅप्टन डग्लस हे मान्य करतो. थोड्या लढाईनंतर दोस्त फौजा या उध्वस्त जर्मन ठाण्यात घुसल्या. या दोघांच्या अंगावर गनिमी हल्ल्यासाठी चढवलेला जर्मन गणवेष होता. त्यांना कोणी ओळखणारेही नव्हते. दोघांनी पांढरे निशाण हाती धरून रीतसर शरण जाण्याचे ठरवले आणि अक्षरशः चुकून त्यांना गोळ्या घातल्या गेल्या. म्हणजे शरण आलेल्यांना ठार करण्याचा वस्तुतः रिवाज नसताना हे करून दिलगीर सैनिकाने वरिष्ठाची क्षमा मागितली. म्हणाला, पुन्हा असे घडणार नाही, सर. आणि दोघेही निघून गेले. उरले दोन मुडदे--कॅप्टन डग्लस आणि लीच् यांचे.

'प्ले डर्टी' नामक युद्धपटाची ही अशी कहाणी.

हे खरे की युद्ध हा एक फार मोठा अनुभव आहे. युद्धासाठी स्वदेशाची भूमी सोडून कुठे तरी देशोधडी जाणे आणि कोणाच्या तरी हुकुमाने कारण न विचारता दुसऱ्याचे आणि स्वतःचे रक्त नाहीतर प्राण सांडणे हा तर माणसाला स्वतःपलीकडे नेणारा एक भयंकर अनुभव. हा अनुभव युरोप--अमेरिकेत कितीकांनी घेतला. शौर्य आणि क्रौर्याचे चित्तथरारक, काळीज आणि मेंदू फाडून टाकणारे साक्षात्कार अनेकांना या अनुभवात घडले. जगले वाचले त्यातल्या कुणी कुणी हे अनुभव अक्षरबद्ध केले या अक्षरबद्ध अनुभवातून होलिवुडसारख्या बऱ्यावाईट व्यापारी चित्रपटांच्या पेठेने आपला 'कच्चा माल' गेल्या काही वर्षात भरभरून उचलला आणि युद्धपटांची रेलचेल करून टाकली. जंगले, वाळवंटे, समुद्र, अंतराळ या मंडळीला घरच्या अंगण--परसासारखे होऊन गेले. रुपेरी पडद्यावर रक्ताचे समुद्र वाहिले. मुडद्यांचे डोंगर झाले. विध्वंस तर दरेक युद्धपटातून मिळून असा घडत होता की, हा सारा विध्वंस प्रत्यक्षात घडता तर या पृथ्वीतलावर बहुधा अमेरिका आणि होलिवुड वगळता काही राहाते ना. दर वेळी अमेरिकन्स शौर्यधैर्यादि गुणांचे उच्चांक गाठीत होते. अमेरिकन्स मुत्सद्देगिरीचे आदर्श निर्माण करीत होते. औदार्य नावाचे, मानव्य नावाचे आणि संस्कृती नावाचे काही शिल्लक राहिले असेलच तर त्याचे श्रेय अमेरिकनांना होते--असा हे चित्रपट पाहून कोणाचाही ग्रह झाला असता आणि होतही होता.

अलीकडे मात्र होलिवुडच्या हुशार व्यापाऱ्यांनी युद्धपटांचा हा अमेरिकन संस्कृतीचा जय ओरडणारा साचा लोकप्रियतेच्या शिडीवरून गडगडल्याचे ओळखले आहे. व्हिएतनामच्या अनुभवाने खुद्द अमेरिकन माणसाला--सामान्यातल्या सामान्य

माणसाला—युद्धाविषयी विचार करण्याला लावले आहे. आता अमेरिकन बनावटीच्या युद्धपटांचा सूर बदलला आहे. तो युद्धविरोधी लागू लागला आहे. युद्धाची अर्थहीनता, त्यातली निरुद्देश प्राणहानी आणि विध्वंस, युद्धाच्या डोंबात प्रखरपणे दिसून येणारे माणसातले पशुत्व आणि या पार्श्वभूमीवर एका भयंकरपणे हास्यास्पद दिसणारी काही माणसांमधली कठोर कर्तव्यनिष्ठा यांचे दर्शन या अमेरिकन युद्धपटांतून घडविण्यात येऊ लागले आहे. ' डर्टी डझन ' या एका जुन्या गाजलेल्या युद्धपटाच्या शीर्षकावर शीर्षक टाकून पडद्यावर आलेल्या ' प्ले डर्टी ' या युद्धपटाची प्रत्यक्ष निर्मिती इंग्लंडमध्ये झालेली असली तरी एका अमेरिकन चित्रपट वितरण संस्थेने तो व्यापारार्थ हाती घेतला आहे याहून अधिक त्याच्या जातीविषयी सांगण्याचे कारणच नाही. तो सप्तरंगी आहे. परंतु त्याचे रंग वाळवंटाची रुक्ष चित्रणे, पेटलेले आकाश, श्रमांनी, हालांनी, तहान भुकेने, लालसेने आणि क्रौर्याने विद्रूप झालेले मानवी चेहरे आणि मुख्यत: लालभडक दाट ओले ओले रक्त दाखविण्यातच खर्ची पडले आहेत. मानवी रक्ताची इतकी विविधतायुक्त आणि ठरवून घडविलेली दृश्ये या चित्रपटात घडत जातात की चित्रपट पाहून घरी जाताना डोळ्यांच्या पापण्यांना हे रक्त चिकटून येते आहेसे वाटते.

अशा या ' रक्ताळ ' चित्रपटात तो अगदीच स्त्रीपात्रविरहित होऊ नये म्हणून एक स्त्री — जर्मन नर्स — सोडण्यात आली आहे. परंतु ही पुरुषांनाही भारी ठरणारी चंडिका आहे. कॅप्टन डग्लसच्या माणसांच्या हाती पडताच ती दारासिंगला लाजविणारी लढत दात ओठ खाऊन देते. तिचा एकेक ठोसा घणाघाती आहे. खुद्द कॅप्टन डग्लस या लढतीत तिला नरम आणण्याच्या निश्चयाने लढून थकतो. लीच्च्या एका गुद्याने काम भागते. जर्मन नर्स निष्प्रभ होते आणि लीच् डग्लसला वाकड्या मिशीचे स्मित करून विचारतो, कॅप्टन, अजून बाई कधी हाताळली नव्हतीस वाटते ?

एक परस्परांवर अनुरक्त असलेले मुस्लिम पुरुष — युग्मही कॅप्टन डग्लसच्या तुकडीत आहे. या दोघांचे नाजूक आणि हळवे हळवे प्रेम रानदांडग्या नर्सच्या तुलनेने अधिक ' नॉर्मल ' वाटू लागते.

लीच्ची भूमिका पहाताना अँथनी क्विन (झोर्बा द ग्रीक, गन्स ऑफ नॅव्हरोने फेम) आठवतो. अँथनी क्विनसाठी ती बेतल्यासारखी वाटते. याचे एक कारण असे की या चित्रपटात ती करणाऱ्या नायगेल डॅव्हनपोर्ट या नटाने ती क्विनच्याच इरसाल रांगड्या ढंगाने उभी केली आहे. कॅप्टन डग्लस मायकेल केन या नटाने वठविला आहे. याही भूमिकेत, मूळ भूमिका आणि ती वठविणाऱ्या केनचे व्यक्तिमत्व असे मिळून 'बेकेट' आणि 'लॉरेन्स ऑफ अरेबिया'तल्या पीटर ओ 'टूलची आठवण जागी होते. किंबहुना आणखी कशाचे तरी असे स्मरण देत देतच हा युद्धपट दिग्दर्शक आंद्र द तॉथ यांच्या सारथ्यानिशी त्याच्या दे-मार कथेचे टप्पे घेत हिंदकळत हिंदकळत प्रवास करतो आणि एका विदारक शेवटाशी, माफक परिणाम साधून संपतो. उरते ते डोळ्यांना दीड दोन तास सातत्याने लागलेले लाल दाट चिकट रक्त—बस्स. ◻ ◻ ◻

# फॅशन – नाट्य

मुंबईत नाटकांना तोटा नसतो. पुंगीवाल्याच्या गोष्टीत उंदरांचे प्रकार नसतील एवढे नाटकांचे प्रकार मुंबईत आजकाल चालतात. काही खऱ्या अर्थाने 'चालतात' तर काही मर्यादित प्रेक्षकांना आपले चालतात, एवढेच. 'ललित-कलादर्श'च्या बालबोध संगीत 'रंगात रंगला श्रीरंग' पासून प्रताप ऊर्फ पॅट शर्माच्या 'प्रोफेसर हॅज अ वॉर क्राय' किंवा चि. त्र्यं. खानोलकरांच्या 'एका नाटकाचा अंत' सारख्या घनचक्कर नाटकांपर्यंत सर्व प्रकारांना कमजास्त गिऱ्हाईक या अफाट शहरात आहे. यातच एक वेगळा प्रकार अधूनमधून षण्मुखानंद किंवा तत्सम अवाढव्य जागी चालतो. या नाटकाला फॅशन–शो असे म्हणतात. याचा प्रेक्षक संख्येने प्रचंड नाही पण ही नाटके अधूनमधून व्हावीत इतका तो नक्कीच आहे. हा सर्व उच्चवर्गीय आहे. मराठी आहे त्याहून अ–मराठी आहे. याच्यासाठी केली जाणारी ही फॅशन–शो नामक नाटके बव्हंशी दृश्य भागाला महत्त्व असलेली असतात. नवनव्या फॅशन्स ती या प्रेक्षकासमोर प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यातला 'आशय' किंवा 'थीम' अमूक एका गिरणीचे किंवा अमूक तमूक गिरण्यांची कापडे अद्ययावत आणि सर्वगुणसंपन्न असतात हा किंवा अशा थाटाचा असतो. हा आशय फारच ढोबळ झाला असे नवनाट्यवाले नाक मुरडून म्हणतील तर यात 'नाट्य' नाही असा परंपरानिष्ठ नाटकवाल्यांचा एक भिवई वर करून अभिप्राय पडेल. परंतु तरीही नवनाट्याच्या प्रयोगांना आणि 'नाट्य' संपन्न परंपरागत खेळांनाही पुढल्या खुर्च्यात दिसणारी काही प्रेक्षकमंडळी याही नाटकांना आलेली दिसतात. इतकेच नव्हे तर माना उंच करकरून रंगमंचावरचे फॅशन–नाट्य क्षणोक्षणी विस्फारलेल्या डोळ्यांनी न्याहाळीत अधूनमधून 'ओह, हाऊ नाइस' 'सिम्पली मार्व्हलस' अशी उत्स्फूर्त दाद देताना दिसतात.

परवा तेवीस तारखेला असे एक नवे फॅशन–नाट्य षण्मुखानंद सभागारात झाले. याची सादरकर्ती होती असोसिएशन ऑन मॅन–मेड फायबर इंडस्ट्री म्हणून कापड-गिरण्यांची संघटना. निर्मिती आणि दिग्दर्शन कोणी रिना राणी मेहता यांचे होते. नेपथ्य, रंगमंचव्यवस्था आणि प्रकाशयोजना इंडियन नॅशनल थिएटर या मुंबईतील प्रामुख्याने गुजराती नाटके करणाऱ्या संस्थेच्या तंत्रज्ञांची होती. प्रमुख भूमिकेत भवन पटेल, अप्सरा, डिल्बेर डिवारा, जॉइस डिसोझा, ज्युलिएट फोन्सेका इत्यादी गुलगुलीत उच्चाराची स्वर्गीय नावे झळकत होती. शोभा राजाध्यक्ष असे कोणी

उगीच परिचयाचे वाटणारे एक मराठी नावही या गर्दीत एकुलते एक उमटून दिसत होते. हे 'नाटक' स्त्रीपात्रप्रधान होते. म्हणजे पुरुष दुय्यम भूमिकात होते. नाटकाचे नाव 'वस्त्रालंकार.'

वस्तुत: या फॅशन–नाटकांना नावे असण्याची गरजच नसते कारण तपशिलाचा फरक करून एकच नाटक पुन:पुन्हा केले जाते. पात्रेदेखील काही तीच सर्व नाटकातून असतात. उदाहरणार्थ डिल्बेर (आपल्या पद्धतीने याचा अपभ्रंश दिलबहार असा करता येण्याजोगा आहे; किंवा कोणी सांगावे, याच शब्दाचा डिल्बेर हा ख्रिश्चन आंग्ल शैलीदार अपभ्रंश असू शकेल.) डिबारा, जॉइस डिमुझा, अवन पटेल या अप्सरा अशा प्रकारच्या प्रत्येक नाटकातून दिसतात. त्यांचा अभिनयदेखील तोच. म्हणजे परिधान केलेले वस्त्रालंकार उपस्थित प्रेक्षकांस सर्वांगांनी दिसतील अशा पद्धतीने एका आकर्षक, स्वर्गीय शैलीने रंगमंचावरून फिरणे. वस्त्रालंकारांच्या शैलीत तेवढा फरक, बाकी तेच नाटक नव्या नेपथ्यावर, नवनव्या वेषभूषेनिशी त्याच त्या कृत्रिम प्रसन्नपणे करायचे. (यावद्दलची यांची 'नाइट' अनेकदा तीन चार आकडयांची असते म्हणे. इतकेच नव्हे तर निर्मात्यांशी धंदा पटविण्याला यातल्या एकेकीचा पगारी एजंट असतो.)

हे 'वस्त्रालंकार' नामक फॅशन–नाटक सादर करणारे मात्र त्यातल्या त्यात प्रयोगशील वाटले. म्हणजे त्यांनी तेच आपल्या जीवनाशी सुतराम् नाते न सांगणारे एक सर्वसाधारण गुळगुळीत, शोभादायक नेपथ्य आणि त्याच त्या समोर हिंडण्याऱ्या पात्रांच्या यांत्रिक साचेबंद खोटया खोटया पद्धती यांना फाटा देण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी भारतीय (होय, चक्क भारतीय !) पुराणातले आणि इतिहासातले काही प्रसंग निवडले. नाटयापेक्षा विविध वस्त्रालंकारांच्या प्रदर्शनाची दृष्टीच या


मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमानुसार लिहिलेलें

**सुगम समाजशास्त्र**

लेखक : प्रा. उत्तम बा. भोइटे, एम्. ए.

*श्रीशिवाजी महाविद्यालय, परभणी*

मूल्य रु. ६–००          रजि. ट. खर्च रु. १–२०

व्हीनस प्रकाशन

३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०

निवडीमागे होती; पण ओघाने काही नाट्यही होते. तुटक का होईना, कथाभाग होते. हे कथाभाग संवादांशिवाय 'टॅब्लो'च्या तंत्राने रंगमंचावर मांडले होते. उदाहरणार्थ समुद्रमंथनाचा पौराणिक कथाभाग. प्रलयानंतर सर्वभर माजलेल्या अंदाधुंदीने भगवान शंकर क्रुद्ध होऊन तांडव नाचतात. यातून ओंकार–ध्वनी निघतो आणि या नादब्रह्मातून विश्व जन्माला येते. देव आणि दैत्यांची जुंपते. समुद्र-मंथन होते. यातून जी रत्ने निघतात त्यात लक्ष्मी असते. शंकर आणि विष्णु यातून ती विष्णुभगवानांची निवड करते.

सलामीच्या या दृश्यात विश्वजन्माआधीच्या शंकररावांची वल्कले मॅनमेड-फायबर ऊर्फ नायलॉनची होती. त्यांच्या जटादेखील बहुधा नायलॉनच्या असाव्यात. देव–दैत्य नायलॉनधारी होते आणि लक्ष्मी तर नायलॉनच्या एका नव्या फॅशनमध्ये अशी शोभत होती की प्रेक्षकवृंदातून हलक्या शीळा उमटल्या. लक्ष्मीने शंकराला अव्हेरले आणि विष्णुपंतांना वरले ते सर्वांगांनी आपल्या वस्त्रालंकारांचे दर्शन प्रेक्षकांस परिणामकारकपणे घडत आहे याची दक्षता घेऊनच आणि पडद्यामागचा निवेदक म्हणाला, मंडळी, लक्ष्मीने शंकराला का अव्हेरले ? तो 'प्रॉपरली ड्रेस्ड' ऊर्फ टिप-टॉप नव्हता म्हणून; त्यात वेटा विषप्राशन करणारा. उलट विष्णु पसंत ठरले कारण ते 'पितांबरधारी' म्हणजे आकर्षक पोषाखात होते. अशा प्रकारे पुराणेही हेच सांगतात की 'क्लोथ्ज मेक अ मॅन'–कपड्यांवरून माणसाचे मोल ठरते !

पुराणांचा हा सारांश दुसऱ्यातिसऱ्या ठिकाणी विथरवणारा ठरला असता परंतु उपस्थित प्रेक्षकांनी माफक टाळ्या वाजवून लक्ष्मीच्या फॅशनचे आणि निवडीचे एकदमच स्वागत केले.

यानंतर हे फॅशन–नाटक शिरले थेट राजपुतांच्या इतिहासात आणि त्यातल्या


पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेसाठी
आणि कोणत्याही इंटरव्ह्यूसाठी

**मॅजेस्टिक जनरल नॉलेज**

१९७० ची नवी आवृत्ती प्रसिद्ध झाली !

लेखक : मो. वा. औंधकर — किंमत : रु. ३·५०

मॅजेस्टिक बुक स्टॉल — गिरगाव, मुंबई – ४ / शनिपाराजवळ, पुणे – २

राणी पद्मिनीच्या प्रकरणात. पद्मिनीचे प्रकरण कशामुळे उद्भवले? अर्थात तिच्या आकर्षक सौंदर्यामुळे. हे सौंदर्य सुंदर पोषाख आणि अलंकारांशिवाय उठले असते काय? पद्मिनीची ऐतिहासिक आत्माहुती या फॅशन—नाटकात तपशिलाचा आनुषंगिक भाग होती तर तिचे लावण्य हा मुख्य मुद्दा होता. साधे लावण्य नव्हे, नायलॉन—लावण्य. पद्मिनीच्या नायलॉन—आत्माहुतीला प्रेक्षकांनी माफक टाळ्या दिल्या.

त्यानंतर नूरजहान-जहांगीर, राणकदेवी, रूपमती, संयुक्ता-पृथ्वीराज, अनारकली-सलिम, सोनि-महिपाल असा प्रवास करीत, नायलॉनच्या विविध फॅशन्सचे दर्शन घडवीत, जोडीला प्रकाशयोजना आणि नेपथ्य यांच्या कल्पक वापराने लढाया, विषप्रयोग, स्वयंवर, जिवंत समाधी, मडक्यावर बसून नदीतून प्रवास, अशा नाटयपूर्ण आभासांचा मसाला जमवीत हे फॅशन—नाटक शकुंतला-दुष्यंताच्या परिचित प्रेमकहाणीच्या 'टॅब्लो' वर संपले.

नायलॉनखालोखाल डोळयात भरल्या होत्या त्या नायलॉनधारी डिल्बेर, जॉइस, ज्युलिएट, अबन आदि सुडौल देहलतायुक्त ललना. जहांगीर, पृथ्वीराज इत्यादी इतिहास गाजविणारे वीर या नाटयात 'एक्स्ट्रॉ' ठरले होते. त्यांची भूमिका नायिकांना उठाव मिळेल अशा पद्धतीने उभे रहाणे वा वावरणे एवढीच होती.

पडदा खाली आला आणि प्रेक्षागृहात उजेड झाला तेव्हा काही नवीन गोष्टी जाणवल्या. प्रेक्षागृहातले ऐटबाज जहांगीर आणि पृथ्वीराज त्यांच्या नायिकांचे 'एक्स्ट्रॉ' असल्यासारखेच आपापल्या नायिकेला उठाव देत बोलत चालत होते. प्रेक्षागृहातल्या नायिका जास्त आकर्षक होत्या—विशेषत: चेहरे. आणि प्रेक्षागृहातल्या फारशा कोणीही नायलॉन वापरलेले नव्हते. खादी सिल्क किंवा तत्सम वस्त्रप्रावरणात जी ती आणि जो तो दिसत होता. एकंदरीने नायलॉनचा प्रचार होण्याला योग्य असाच हा प्रेक्षकवर्ग असल्याचे मी समजतो तर एका माहीतगाराने माहिती दिली की यातले बहुसंख्य प्रेक्षक मॅन मेड फायबर इंडस्ट्रीजमध्येच उच्च पदावर कामे करणारे आणि त्यांचे कुटुंबीय आहेत.

जे निर्माण करतात तेच जर ते वापरीत नाहीत तर इतरांना सांगण्यात काय अर्थ राहिला हो? आणि या आपल्याच माणसांपुढे या असोसिएशनने एवढा पैसा नि श्रम खर्च करून हे फॅशन—नाटक करण्यात काय साधले? तिलाच माहीत.

मराठी नाटयव्यावसायिकांनी मात्र हे फॅशन—नाटक पहायला हवे. मोठमोठया कापड—उत्पादकांशी आणि अन्य उद्योगपतींशी नि व्यापाऱ्यांशी बोलणी करून आपल्या पौराणिक, ऐतिहासिक आणि जमल्यास सामाजिक नाटकातून या नाटयव्यावसायिकांनी जाता जाता फॅशन—नाटयाचाही मर्यादित समावेश का करू नये। एरवी तेवी अनेक नटींचा नि नटांचा अभिनयाचा प्रयत्न आणि वकूब एवढाच असतो। आणि क्वचित नाटकाचाही. मग प्रेक्षकांसाठी हे जास्तीचे आकर्षण का नको?

□ □ □

# सामर्थ्य! आरोग्य! चैतन्य!



## या क्रांतिकारक व्यायामसाधनाने रोज फक्त काही मिनिटातच सामर्थ्य-संपन्न शरीर कमवा!

बुलवर्कर२ च्या साधनाने या तरुणाने आपली शक्ती दर आठवड्यास ४ टक्के वाढविली.

हॅनोव्हर (पश्चिम जर्मनी) ऑलिम्पिक क्रीडासत्रात जर्मन संघाने (१० सुवर्णपदके) आपली तयारी बुलवर्कर२ या आश्चर्यकारक आयसोमेट्रिक आयसो-टॉनिक व्यायामसाधनाने केली होती.

बुलवर्कर२ चा उपयोग करून कोणत्याही वयाच्या कोणाही व्यक्तीला रोज फक्त पांच मिनिटे खर्च करून मल्लासारखे सामर्थ्यसंपन्न शरीर कमावता येईल. कोणत्याही स्नायूगटाचा विकास करण्याकरिता रोज फक्त सात सेकंद पुरेत! सपाट दुबळी छाती याने दणकट भरदार बनते, खांदे रुंद करता येतात, पोटाचे स्नायू, मांड्या, पोटऱ्या कणखर पोलादी होतात आणि हे सारे दर आठवड्यास ४ टक्के या अपूर्व वेगाने...म्हणजे केवळ तीन महिन्यात ५० टक्के सुधारणा होते! केवळ स्वास्थ्यसंरक्षण अथवा वजन कमी करणे हे ही साधावयाचे असेल तर बुलवर्कर२ चा व्यायाम दोन्हीसाठी आदर्शच आहे.

जगत्-विजेता मुष्टियोद्धा कॅशियस क्ले, ज्युडो जगत-विजेता विम रस्का, सायकलिंगमधील जगत्-विजेता एडी मर्क्स अशासारख्या ऑलिम्पिक क्रीडासत्रातील जगविख्यात क्रीडापटूंनी बुलवर्कर२ ची शिफारस केली आहे. बुलवर्कर२ व्यायामपद्धतीने सामान्य व्यायामपद्धतीपेक्षा चौपटीने अधिक झपाट्याने स्नायूची वाढ साधते. दोन आठवड्यात अनुकूल परिणाम दिसू लागतातच — नपेक्षा तुम्हांला पैसे द्यावे लागत नाहीत. आमच्या खर्चानेच चांचणी घेऊन आपली खात्री करून घ्या. हे कूपन आताच पोस्टाने पाठवून द्या, की तुम्हाला या नव्या विस्मय-कारक व्यायामपद्धतीतील व्यायामक्रियांचे फोटो व पूर्ण तपशील असलेली मोफत पुस्तिका पाठवून देण्यात येईल, त्यावरून नवी जोमदार शक्ती तुमच्या स्नायूत किती त्वरित भरू शकते हे समजून येईल.

## "बुलवर्कर सर्वोत्तमच आहे"

"मी सर्व व्यायामसाधने वापरली, पण या सर्वांत बुलवर्कर२ हे शरीर कमावण्याचे सर्वोत्कृष्ट सर्वोपयोगी साधन आहे." के. आर. सी. (भावनगर, गु. रा.)

"माझी छाती २ आठवड्यांच्या चाचणीमुदतीत ९.५ से. मि. नी वाढली." एम. डी. (मुंबई)

"माझ्या मुलाकरिता दुसरा एक बुलवर्कर नुकताच खरेदी केला प्रत्येक कुटुंबात एक बुलवर्कर हवाच ५८ वर्षांच्या माझ्या वयावरही बुलवर्करने माझ्यात फार बदल घडवून आणला." एच. गी. (मुंबई)

©Mail Order Sales Pvt Ltd.
15 Mathew Road, Bombay 4

**मोफत**

OA-M

रोज केवळ पाच मिनिटात सामर्थ्यसंपन्न स्नायू कमविण्याच्या या व्यायामपद्धती-विषयी संपूर्ण माहिती व वर्णन असलेली मोफत पुस्तिका मला त्वरित पाठवून द्या. सोबत टपालखर्चासाठी १५ पैशाचे तिकिट जोडले आहे.

नाव ..................................

पत्ता ..................................

..................................

.................................. वय ...

बुलवर्कर सर्व्हिस
१५ मॅथ्यू रोड, मुंबई ४


MP

मौजे गांधीनगर

लेखांक सहा

वि. शं. पारगांवकर





# अडीच ते अडीच!

रविवारी सकाळी साडेसात वाजताच आम्ही हॉटेल अलंकारमधून बाहेर पडलो. (२१–१२–६९). सकाळी शारदा मुखर्जी, मिश्रा वगैरेंची भाषणे होणार होती. आतापर्यंत सर्व भाषणे ऐकून झाली होती. आता ही सकाळची सभा संपली की गांधीनगरला रामराम ठोकायचा आणि बारापर्यंत अहमदाबादला परतायचे. दुपारी तीन पासून जाहीर सभेला सुरुवात होणार होती. आता आणखी जाहीर सभेत आम्ही काय ऐकणार होतो? विषय नियामक समितीच्या आणि शाखा संमेलनांच्या निमित्ताने सर्व छोट्या मोठ्या सिंडिकेटवाल्यांची भाषणे आणि विचार (!) ऐकून झाले होते. जे तिथं झालं तेच जाहीर सभेत अहमदाबादच्या नागरिकांना खड्या आवाजात ऐकविलं जाणार होतं! म्हणून आम्ही जाहीर सभेला आज हजर राहायचं नाही असं ठरवलं आणि त्या ऐवजी दुपारी अहमदाबाद शहरात फिरून

शहर पाहायचं, काही प्रमुख ठिकाणं पाहायची, वेगवेगळ्या थरातील लोकांना भेटायचं असा आमचा कार्यक्रम होता.

परंतु मध्येच दोन ते तीन महिला संमेलन होणार असल्याचं घोषित करण्यात आलं आणि जोशीबुवांचा विचार फिरला. ते म्हणाले, 'आपण आताच गावात परत जाऊ आणि जेवण वगैरे करून दोन वाजता परत येऊ. महिला संमेलनाला हजर राहायलाच हवं!' जोशीबुवांच्या या पुनर्विचाराशी मी फारसा सहमत नव्हतो, थोडयाशा अनिच्छेनेच मी त्यांना पुन्हा परत येण्याविषयी अनुमती दिली.

आम्ही गावात जायला अकरा वाजता बसने निघालो. अर्धे अंतर ओलांडून जातो न जातो तोच आमच्या बसचा वेग कमी झाला. अगदी बैलगाडीच्याच नव्हे तरी आसपास तेवढयाच वेगाने आमची बस चालू लागली! समोरून येणाऱ्या हिरव्या–पोपटी रंगाच्या बसेसची माळ लागली होती. बसेस्, त्यामध्ये रिक्षा, जीप्स्, टॅक्सीज आणि खासगी मोटारी असं ते गांधीनगरला धावणाऱ्या गाडयांचं रूप होतं. पालखी एवढयाच वेगात ही वाहने चालली होती. गांधीनगरहून गावाकडे येणारी वाहने तशी संख्येनं थोडी होती. परंतु डावा आणि उजवा–रस्त्याचे दोन्ही भाग मोटारींनी भरलेले होते. तशातच काही उच्छृंखल रिक्षेवाले थोडीशी जागा मिळाली की ओव्हरटेक करण्यासाठी माळेतून आपली रिक्षा बाहेर काढीत. परंतु त्यांना पुढेही रस्ता मिळत नव्हता आणि डावीकडचे त्यांचे विशिष्ट स्थान गेल्यामुळे पुन्हा त्या माळेतही घुसता येत नव्हते. या सर्व घोटाळ्यात रहदारी तुंबून पडत होती. मग पंधरा वीस मिनिटांनी पोलिस येऊन मध्यस्थी करून रिक्षाला माळेत जागा देत असे!

प्रचंड संख्येने गांधीनगरकडे धावणाऱ्या या गाडया पाहून दुपारच्या खुल्या अधिवेशनाची कल्पना सहज करता येण्यासारखी होती!

अकराला निघालेलो आम्ही एक वाजता हॉटेल अलंकारवर पोहोचलो. गावातल्या खानावळी बंद झाल्या होत्या. मग अलंकारमध्येच आम्ही कट्लेट वगैरेसारखे पदार्थ घेऊन भूक भागविली.

आणि लगेच गांधीनगरला–महिलांच्या समेलनाला जाण्याची भुणभुण जोशीबुवांची मागे लागली. समोर स्टेशनवर हजारोंच्या रांगा लागलेल्या दिसत होत्या. त्या क्यूमध्ये उभे राहिलो तर जायलाच सहा वाजतील असे मी जोशीबुवांना सांगितले. पण त्यांना काहीही करून महिलांच्या संमेलनासाठी जावयाचेच होते. आम्ही गावात एका मित्राकडे निघालो. रविवार असल्यामुळे त्याची भेट झाली असती. मित्र भेटला आणि त्याच्या ओळखीच्या एका सिंधी माणसाची गाडी गांधीनगरला चालली होती तिच्यातही आम्हाला जागा मिळाली. हा सिंधी माणूस तिथला एक मोठा कॉंट्रॅक्टर होता. त्याची डॉज् पेट्रोल घेण्यासाठी एका पंपावर

[पृष्ठ ४२ वर]




# इंदिरा की कम्युनिस्ट?

जवाहरलाल नेहरू सत्तेवर असताना यूरोप-अमेरिकेत नेहमी एक प्रश्न सतत विचारला जात असे, "नेहरू साम्यवादी आहेत काय?" प्रत्येकाची खात्री होती की नेहरू साम्यवादी नाहीत; पण त्यांचे धोरण साम्यवादास उत्तेजन देते.

१९६२ साली आपण हिमालयात पराभव पत्करला होता. याचे उघड कारण होते आपल्या राजकीय डोळ्यांवरील 'साम्यवादी पटल.' आपल्याला सल्ला मिळाला तोच चुकीचा. पराभव झाल्यावर हा बदसल्ला थांबावा, कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली जावी व राष्ट्रवादी पक्षांचे सहकार्य घेऊन राष्ट्रवादास उत्तेजन देण्यासाठी जी संधी उपलब्ध झाली होती त्याचा पुरता फायदा उठवावा असे मला वाटे.

साऊथ ब्लॉकमध्ये परदेशी खात्याच्या कार्यालयात माझी नेहरूंशी त्यावेळी मुलाखत ठरली होती. नेहरूंना इतके 'नर्व्हस्' झालेले व इतके 'डाऊन कास्ट्' झालेले मी पहिल्यादांच पाहिले.

मी सुचविलेल्या तीन चिजांपैकी दोन चिजा नेहरूंना मान्य होत्या. डावरा बदसल्ला न ऐकणे व राष्ट्रवादी पक्षांचे सहकार्य त्यांना मंजूर होते. आश्चर्य वाटेल, आर. एस. एस. चे सहकार्य स्वीकारायला नेहरू तयार होते! माझा विश्वास बसेना. म्हणून हा प्रश्न मी पुन्हा विचारला. उत्तर तेच मिळाले. पण साम्यवादी पक्षावर बंदी? छे:, त्याचे नाव नाही.

"नासरने कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली आहे. रशियाकडून आस्वान धारणासाठी मदत घेऊनसुद्धा ही बोल्ड स्टेप् नासरने घेतली. मग तुम्हाला ही बंदी घालायला कोणती हरकत आहे?" मी धिटाईने विचारले.

# दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा

# ४

## दा दू मि या । । । । । । । । । । । ।

माझी अपेक्षा होती, नेहरू भडकतील.

पण झाले उलटे.

ते अंतर्मुख झाले. इजिप्त व भारत यांची राजकीय पार्श्वभूमी निराळी आहे. ती का व कशी याविषयी मला त्यांनी थोडक्यात समजावून सांगितले. खरं सांगू, माझे त्या गुळमुळीत बचावाच्या उत्तराने समाधान बिलकूल झाले नाही. मला सारखे वाटत होते, नेहरू ही 'बोल्ड् स्टेप' घेण्यास शारीरिक, मानसिक व राजकीय दृष्टचा असमर्थ आहेत, दुबळे आहेत.

क्यूबाचा फिडेल् कॅस्ट्रो याने 'टाईम्' साप्ताहिकास जी मुलाखत दिली त्यात त्याने हेच म्हटले. त्यावेळेस यूनोच्या बैठकीत साऱ्या देशांचे पंतप्रधान क्रुश्चेव्हच्या विनंतीनुसार हजर राहिले होते. न भूतो न भविष्यति अशी ती बैठक होती. त्यात वेळेस नवमुक्त देशांचे सारे पुढारी एकमेकांस भेटले. एकमेकांबरोबर भोजन घेतले. फिडेल् कॅस्ट्रो, नासर व नेहरू यांची तुलना करून त्या 'टाईम्' साप्ताहिकाच्या मुलाखतीत म्हणाला होता, "नासर हा मला मॅन् ऑफ् अॅक्शन् वाटला. नेहरू नुसतेच बोलणारे वाटले. बोलेल तो करेल काय?"

नेहरूंचा जो अनुभव १९६२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात मला आला तोच अनुभव त्यांच्या सुकन्येबरोबर मला १९६९ च्या दिवाळीत आला.

बाई कम्युनिस्ट नाहीत, फार काय 'फेलो ट्रॅव्हलर'देखील नाहीत याची खात्रीही मनास पटते. पण?

उदाहरणार्थ: कृष्ण मेननशी चर्चा करताना त्यांचे ब्रिटीशविरोधी व प्रो-रशिया धोरण संभाषणात चक्क जाणवते. फार काय, त्यांच्या बसावयाच्या खोलीत, त्यांच्या

काचेच्या कपाटात सारे रशियन वाङ्मय खच्चून भरलेले आहे, हा लहानसा पण महत्त्वाचा मुद्दा तुमच्या दृष्टीतून निसटू शकत नाही. तेवढे लाल वाङ्मय तर मला ई. एम्. एस्. नंबुद्रीपादांच्या बैठकीच्या खोलीतही आढळले नाही ! एकदम साधे काम ! !

इंदिरा गांधी कम्युनिस्ट पक्षाच्या सभासद नाहीत, मेननप्रमाणे त्या फेलो ट्रॅव्हलरदेखील नाहीत. पण साम्यवाद या देशात येण्यासाठी त्या निमित्तरूप तर होणार नाहीत ना, या माझ्या शंकेचे छाती ठोकून नकारात्मक उत्तर मला राजधानीत कोणीही देऊ शकले नाही. इतिहासात अशी बरीच उदाहरणे आहेत. शिवाजी महाराजांचा सुपुत्र संभाजी. पण डोके बिथरले व मोगलांच्या छावणीत स्वारी सरळ गेली. मोगलच मूर्ख. नाहीतर ती संधी पूर्णपणे Exploit करून त्यांनी मराठ्यांची सहज हवा खराब केली असती. गुजराथच्या करण वाघेलाचा प्रधानजी माधव अगदी सोवळा ब्राह्मण. पण अल्लाउद्दीन खिलजीस भारतावर चढाई करण्यासाठी याच दीड शहाण्याने आमंत्रण दिले ना ?

इंदिराजींचे स्टेचर मुळात लहान. त्यामुळे विरोधक जाहीरपणे ही भीती स्पष्टपणे बोलून दाखवितात. जराही घाबरत नाहीत. असे बोलण्याचे धाडस नेहरूंच्या राजवटीत होत नव्हते. आजकाल कोणी कुजबुजत नाही. लोकसभेपासून जाहीर प्लॅटफॉर्मपर्यंत सरळ हल्ला ! बोंबाबोंब ! !

एकसारख्या सतत दोन वर्षे होत गेलेल्या हल्ल्यामुळे बाईही आता घट्ट झाल्या आहेत. त्यांनी बोलण्याचा रोख मस्तपैकी जुन्या कॉंग्रेसमनवर वळवून ह्या विरोधकांना सुनावले आहे, ' या देशात साम्यवादास पोषक असे वातावरण या जुन्या मंडळींनी निर्माण केले होते. त्यांच्याऐवजी मी प्रगतिशील; खरे समाजवादी, डावे धोरण स्वीकारून खरे लोककल्याणाचे कार्य हाती घेतले आहे. ह्याने उलट साम्यवादाची वाटचाल या देशात थांबणार आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण म्हणून तर मी केले. '

आहे की नाही सुंदर युक्तिवाद ?

बाई कम्युनिस्ट नाहीत असा लोकांच्या डोळ्यांवर फेकण्यासाठी बाईजवळ पुरावाही भरपूर उपलब्ध आहे. ' पास्ट रेकॉर्ड ! '

उदाहरणार्थ : १९५९ मध्ये केरळात कम्युनिस्टांनी मोठा जोर करून लोकशाही पद्धतीने आपले सरकार स्थापन करून साम्यवादास भारतात प्रथमच सत्तेवर बसविले. त्याआधी असे प्रयत्न एका दशकाआधी आंध्र व तामीळनाड येथे झाले होते; पण पटेल व राजाजी या दुकलीने ते प्रयत्न हाणून पाडले. १९५९ साली केरळच्या बाबतीत हेच काम मुस्लीम लीग व ख्रिस्ती पाद्री यांच्या मदतीने इंदिराजींनी पार पाडले. कम्युनिस्ट तेव्हापासून या अक्षम्य गुन्ह्यामुळे इंदिराजींवर भलतेच गरम झाले आहेत. ते त्यासाठी त्यांना कदापिही क्षमा करणार नाहीत. पण तो भूतकाळ झाला. आजही



**इतिहासात अशी बरीच उदाहरणे आहेत**

नंबुद्रीपाद यांना काढण्याची शक्कल बाईंचीच. प. बंगालमध्ये कम्युनिस्टस् आहेत व तेही बाईंच्या डोळ्यात खुपत आहेतच. १९७२ साली बाईंना केरळ व प. बंगाल येथे काँग्रेस सरकार स्थापन करावयाची महत्त्वाकांक्षा आहे. हे करण्यासाठी थोडीशी तयारी हवीच. ही तयारी कोणत्या प्रकारची ?

१. स्वत:च्या सरकारात स्वत:स अनुकूल राहतील असे मंत्री व सल्लागार सत्तेवर ठेवण्यासाठी आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना.

२. स्वत:च्या धोरणास व योजनांना पाठिंबा देणारे काँग्रेस खासदारांचे बहुमत असलेला लोकसभेत स्वतंत्र वा संयुक्त गट.

३. स्वत:च्या नेतृत्वाखाली समाजवादी शक्तींचे संघटन.

ही स्ट्रॅटेजी यशस्वी करण्यासाठी तेवढीच साधी दिसणारी व सरळ भासणारी यंत्रणा विशद करतो :

१. खरी प्रजा कोणती ? गरीब व पददलित वर्ग. त्यांचे कल्याण करण्यासाठी प्रतिक्रियावादी शत्रूंचा नि:पात करणे ही पहिली योजना.

२. लोककल्याणासाठी समाजवाद हवाच. त्यासाठी काँग्रेस पक्षातीलच केवळ नाही तर पक्षाबाहेरील समाजवादी व साम्यवादी मंडळींचेही सहकार्य हवे.

३. कृष्ण मेनन, सुभद्रा जोशी, अरुणा असफअल्ली किंवा मालवीय ही काही साम्यवादी मंडळी नव्हत. पण ते भांडवलदारांचे विरोधी लोक आहेत. पददलितां विषयी त्यांच्या मनात लागणी खूप आहे. डांगे कम्युनिस्ट असतील पण चिनी कम्युनिस्टांप्रमाणे घातक नाहीत. उलट चिन्यांविरुद्ध रशियाने आपणास मदतच केलेली आहे. आज अमेरिका–रशिया सहकार्याची भाषा बोलत आहेत. दोन्ही गट चंद्रावर एकत्र स्वारी करण्याचे मनसुबे रचीत आहेत.

४. पिताजींच्या वेळेपासून भांडवलशाहीचे काही खास विरोधक समाजवाद

भारतात आणण्यासाठी उत्सुक आहेत. ही ज्येष्ठ व श्रेष्ठ मंडळी विद्वान आहेत. त्यांचा सल्ला ठोकरून कसे बरे चालेल ? आज संघटन कोठेच दिसून येत नाही. लोक आज एकोप्याच्या विरुद्ध झाले आहेत. राष्ट्रीय संघटनेसाठी, राष्ट्रीय एकात्मतेसाठी पिताजींच्या वेळची ज्येष्ठ व श्रेष्ठ माणसे हवीतच, ते थोडाच चुकीचा मार्ग दाखविणार होते.

धन्य ती स्ट्रॅटेजी व धन्य ती यंत्रणा ! इंदिराबाई कम्युनिस्ट नाहीत, फेलो ट्रॅव्हलर नाहीत, तरीसुद्धा ? चव्हाणसाहेबांनीच परवा (१२ जानेवारी) सांगलीस नाही का शपथपूर्वक सांगितले की, बाईंचा स्वातंत्र्य व लोकशाहीवर पुरा विश्वास आहे व त्या कम्युनिस्ट नाहीत म्हणून ?

मग दिनेशसिंग, व्ही. के. आर. व्ही. राव, नंदिनी सत्पथी, रमेश थापर, मोहन कुमारमंगलम्, हिमतसिंहजी, भूपेश गुप्ता, डांगे यांचे बाई चक्क सहकार्य घेतात— या सहकार्याचा अर्थ काय लावायचा ?

बाईंच्या गटातील लोकांचा प्रश्न : शहाजीस सोडविण्यासाठी शिवाजीने मोगलांची मदत घेतली होती का नाही ?

कम्युनिस्टांच्या गोटातील प्रश्न : ' मिस्टर, वो ताकदका सवाल है, बाई आमच्या ताकदीला पाहून शरण आल्या आहेत. समजले ना ?'

कम्युनिस्टांच्या या आत्मविश्वासात त्यांच्या स्ट्रॅटेजीचे सामर्थ्य कळून येते. ते नीट कळण्यासाठी कम्युनिस्ट वाङ्मयाचा व भाषेचा आधार घेतला पाहिजे. त्यांचे सामर्थ्य गिरींच्या निवडणुकीत प्रथमत: जाणत्यांच्या लक्षात आले. भांडवलशहा व त्यांचे प्रतिगामी साथी यांच्याविरुद्ध लढा देण्यासाठी कामगार, तरुण, महिला, कर्मचारी व रिक्षावाले यांची ' एकजूट ' करून इंदिराबाईंची मोरारजींविरुद्ध बाजू मजबूत करून बाईंची ' नवी ' इमेज् देशासमोर उभी करण्यात मिळालेल्या यशाचा मुख्य वाटा बाईंच्यापेक्षा कम्युनिस्टांच्या कर्तृत्वाचा होय, तेही जाणत्यांच्या नजरेतून सुटले नाही. प्रो– पेकींगवाल्या ' फ्रंटीयर ' साप्ताहिकाने आपल्या अग्रलेखात (२३ ऑगस्ट १९६९) लिहिले, " आजचा क्षण इतिहासात फार महत्त्वाचा ठरेल. आता राजनीती व अर्थनीती पूर्वीच्याच धोरणाने जाणार नाहीत. राजकारण शेवटी सत्ता हस्तगत करण्याचाच एक धंदा (Business) आहे ना ? त्यावेळेस ' मेन स्ट्रीम ' (२३ ऑगस्ट १९६९) मध्ये हेडलाईन होती : ' संयुक्त आघाडीसाठी तयार रहा !' मेनस्ट्रीमने लिहिले, ' भारताचा इतिहास पार बदलत आहे. आज दिसतो तो व्यक्तीतील वाद नाही, हा आहे तो ऐतिहासिक शक्तींचा संघर्ष. प्रजा अंतर्गत शक्तीमुळे सबळ व जागृत बनत आहे. श्रीमती गांधी बऱ्याच अंशी प्रगतिशील शक्तींची एकजूट करण्याच्या प्रयत्नात साधन बनल्या आहेत.'

मेनस्ट्रीमने पुढे लिहलेले जास्त सूचक आहे ' ...कॉंग्रेसमधील प्रगतिशील तत्त्वांशी हातमिळवणी करून आपले उद्दिष्ट साधण्याची वेळ आता आली आहे. कम्यु-

निस्टांच्या दोन्ही पक्षांनी आपले मतभेद विसरून एकत्र काम केले पाहिजे. विलंब न करता आता क्रांतीचे परिवर्तन आपण साधले पाहिजे.'

या सुमारास इझ्वेस्तीया, प्रावदा, झा रुबेझो वगैरे रशियन वृत्तपत्रे भारतीय राजकारणात रस घेऊ लागली होती. त्यात प्रत्याघाती कोण, प्रगतिशील कोण याची यादी होती. कम्युनिस्टांनी काय करावे हेही ती पत्रे सुचवीत असत. आपले रशियात काही पत्रकार आहेत. त्यांनी सांगितले की, भारताचे एवढे विस्तृत कव्हरींग पहिल्यांदा होऊ लागले आहे तेथील वर्तमानपत्रांतून याचा अर्थ काय? इंदिराजींच्या राजवटीत असा कोणता चमत्कार झाला की कम्युनिस्टांनी राजसंन्यास घेऊन सात्विक बनून आपला पाठिंबा इंदिराजीस जाहीर करावा? २३ ऑगस्ट १९६९ च्या 'मेनस्ट्रीम' मध्ये ह्या प्रश्नाचे उत्तर मिळते: 'इंदिराजींनी जाहीर केलेल्या धोरणानुसार योग्य ती पावले टाकली नाहीत तर देशातील प्रगतिशील शक्ती (फोर्सेस्) बाईंना दूर फेकून देऊन आगेकूच करतील.' – ३१ ऑगस्ट १९६९ रोजी डांग्यांच्या 'न्यू एज'ने आशा प्रकट केली की, '१९६३ पासून आपण जी स्वप्ने पाहत आहोत ती आता खरी होणार तर. राजकीय ध्रुवीकरणाचा मार्ग जास्त स्पष्ट होत जाणार. कारण त्या दोघांच्यामधील मतभेद 'टॅक्टीकल' नाही, तो 'पॉलीटीकल' ही आहे. देशातील सर्व लोकशाही शक्ती आता पुढे येणार. त्यात कम्युनिस्ट नेतृत्व अनिवार्य राहील.'

३१ ऑगस्ट १९६९ रोजी 'पीपल्स् डेमॉक्रसी'च्या अग्रलेखातील राजकीय चिकित्सा सूचक आहे: 'काँग्रेसमध्ये दोन तट पडले असले तरी काय फरक पडला आहे? सिंडिकेट व इंडिकेट दोन्हीही खरे पाहता मोनोपोली गटांचे प्रतिनिधित्व करीत आहेत. सिंडिकेट देशातील स्वतंत्र व जनसंघ या दगाखोर पक्षांचे साहाय्य घेऊन सत्ता टिकवू पहात आहे. इंडिकेट 'नवीन कार्यक्रम' पेश करून उगीच गाजावाजा करीत आहे! आणि हे करीत असताना वर उल्लेखिलेल्या दगाखोर पक्षांचे साहाय्य अपेक्षित आहे! ध्रुवीकरणाची खरी वेळ येताच त्यावर थंड पाणी ओतत आहे. स्वतःच्या हातातून सत्ता न सुटावी म्हणून जगजीवनराम व फकरुद्दीन यांच्या सहकार्याने अस्पृश्य व मुसलमान यांना आपल्याबरोबर ओढत आहे. अशा रीतीने १९७२ च्या निवडणुकीत इंडिकेट गट विजयी व्हावा असे राजकारण आज खेळले जात आहे.'

त्यापुढील मजकूर महत्त्वाचा आहे: 'याचा अर्थ असा नाही की या खेळात आम्ही स्वस्थ बसून राहणार आहोत. नाही, बिलकूल नाही. कट्टर प्रत्याघाती गटाचा विजय होणार नाही, त्यांचा विनाश होईल यासाठी आपण प्रत्याघाती गटास जो जो विरोध करेल त्याच्या मागे उभे राहणार आहोत. ह्यांना आपण मोठे प्रगतिशील किंवा लोकशाहीचे धुरंधर आहेत असे समजण्याच्या बिलकूल भ्रमात राहू नये! प्रजेस फसवून ह्यांनी (इंडिकेट) सत्ता काबीज करावी अशी

आमची बिलकूल इच्छा नाही. "

पकडा ! बच्चो, एवढी स्वच्छ कबुली व Blunt विचारसरणी क्वचितच इतर पक्षात पहावयास मिळेल.

'फ्रंटियर' (३० ऑगस्ट १९६९) 'मध्ये लेसर ईव्हील' नावाच्या लेखात कम्युनिस्ट स्ट्रॅटेजी स्वच्छ मांडली आहे : 'अमुक मुद्यांवर त्यांच्याशी सहकार्य करणे योग्य ठरेल. त्यांना कामचलाऊ टेका देणे जरूर पण आहे. ऑगस्ट महिन्यात जे घडले ती 'ऑगस्ट क्रांती' नाही. खोटया भ्रमात राहू नये.'

पुढील मजकूर वाचनीय आहे : 'इंदिरा पुढील मार्ग हाताळताना घावरीत आहे. राजामहाराजांची वर्षासने काढून टाकण्याच्या धोरणाविषयी तिने खासगी संभाषणात सांगून टाकले की ही कृती करणे १९७२ सालपर्यंत तरी शक्य नाही ! मोठ्या थैलीशहांचे वजन तिच्यावर आले, त्याचा हा परिणाम. काँग्रेसमध्ये जी एकता साधण्याची भाषा काढली जाते ती या थैलीशहांच्या दावामुळेच. लक्षात असू द्या की १९७२ साली विजय मिळविण्यासाठी मुस्लीम व हरीजन यांना केलेले जातीयवादी अपील फुकट जाणार आहे....थोडक्यात एकही गट खऱ्या अर्थाने भांडवल-विरोधी नाही. केरळ व बंगालप्रमाणे केंद्र सरकार संयुक्त आघाडीचे होईल व आपण त्यात भाग घेऊ अशी स्वप्ने बाळगणे आज बरोबर नाही. साऱ्या कम्युनिस्ट भाईंना सांगणे एकच– दीर्घ व सश्रम अंतिम लोकलढ्याचा मार्ग सोडून संयुक्त सरकारच्या मोहात पडणे योग्य नव्हे.'

इंदिराजींचा एक्स–रे फोटो या पत्राने सादर केला आहे. ह्या पत्राने सुचविले आहे की कम्युनिस्टांनी इंदिराजींच्या सर्वस्वी आहारी जाऊ नये, सत्तेसाठी अधीर होऊ नये, इंदिराजीसही आपली गरज आहे हे विसरता कामा नये. अन्कंडीशनल सपोर्ट तर देणे वेडेपणा ठरेल. त्या पत्राने लिहिले आहे : 'इंदिरा कोणत्याही बाबतीत– विशेषत: आर्थिक किंवा बौद्धिक विचारात–निष्ठावंत नाही. व्यवहारात ती फार कुशल व धूर्त आहे. मात्र तिच्या घोषणांनी काहीही सिद्ध होत नाही हे विसरू नये.'

या सर्वाचा अर्थ उघड आहे.

त्यांची स्ट्रॅटेजी सोपी व सरळ आहे: १. प्रथम काँग्रेसमध्ये फूट पाडणे. २. इंदिराजींनी दिलेली आश्वासने पाळली नाहीत तर त्यांच्यावर वजन आणून त्यांनी दावाखाली आपल्याला अनुकूल असे दान पाडत राहावे असे प्रयत्न करणे. ३. योग्य वेळ येताच सत्ता हस्तगत करणे.

कम्युनिस्ट पक्षाची ही स्ट्रॅटेजी नवीन नाही. दक्षिण व्हिएटनाम व पूर्व जर्मनी या दोन्ही ठिकाणी याच स्ट्रॅटेजीस साम्यवादी फळे लागली होती.

त्यांचे इंदिराजीस उघड आव्हान आहे: 'एक तर आगेकूच करा किंवा प्रतिगामी लोकांना शरण जा, प्रजेचा रोष पत्करा व खत्म व्हा.'

कम्युनिस्ट इतर कोणत्याही राजकीय लोकांपेक्षा जास्त हुशार, जास्त श्रीमंत, जास्त सुसंघटीत व जास्त पाताळयंत्री व म्हणून यशस्वी राजकारणी ठरले आहेत. विभूतिपूजेस त्यांनी स्थानच ठेवलेले नाही. क्रुश्चेव्ह रशियन कम्युनिझमच्या विरुद्ध जात आहे असे वाटले, त्यांनी त्यास पहाता पहाता टांग मारली. स्वतःच्या सर्वोच्च पुढाऱ्यास इतक्या निर्विकार मनाने व समारंभाविना डच्चू देणाऱ्या या जडवादी लोकांना इतर देशाच्या राजकारणात ढवळाढवळ करून आपल्या हिताआड येणाऱ्या परदेशी पुढाऱ्यांचा काटा काढणे हातचा मळ वाटत असेल हे जाणत्यांना काय सांगायला पाहिजे ? मात्र मला कौतुक वाटते रशियन राजकीय नियोजनाचे. आमची कोणतीच योजना सफल होत नाही. त्याउलट त्यांची कोणतीच योजना चुकत नाही. इतके पद्धतशीर व पाताळयंत्री कारस्थान शिजते त्यांच्या राजकारणात! वेस्ट इंडिजचा फास्ट बोलर हॉल याच्याशी खेळण्याची संधी मिळालेल्या एका स्थानिक क्रिकेटप्रेमी माणसाने मला सांगितले, 'साल्याची बॉलींग इतकी फास्ट असे की मी व विकेटकीपरने बॉल मिस् करून तो बॉल बाउंडरी लाईन ओलांडून मला बायचे चार रन्स् मिळेस्तोवर मला बॉल कुठे आहे ते कळतच नसे ! रशियन राजकीय क्रिकेटमध्ये रशियन बॉलींग अशीच चपळ पण धोकेखोर आहे.

नेहरू गेले व लगेच कोसिजीनसाहेब दिल्लीत हजर झाले. लाल बहादूरशास्त्री गादीवर आले. सहकारी नेतृत्वाचे ते सुरुवातीचे दिवस होते. त्यावेळेस येथील कम्युनिस्टांचा मॉस्को येथे गेलेला गुप्त संदेश महत्त्वाचा आहे : 'नेहरूंबरोबर येथील आकर्षक (Charismatic) नेतृत्व संपले. वरच्या थरातील पुढाऱ्यात बरीच तणातणी चालली आहे. आम्ही सावधपणे काय चालले आहे ते बघत आहोत. कामराज योजना काँग्रेस पक्ष जास्त जोरदार बनविण्यासाठी जन्मास आली होती पण तिचा काहीही उपयोग झालेला नाही. कामराज आज किंग–मेकर म्हणून तोऱ्याने वावरत आहेत. याचा अर्थ कम्युनिस्ट पक्षास सध्या काहीच भाव उरलेला नाही.'

यानंतर लालबहादूर शास्त्री यांचा जमाना चालू झाला. हिंदुस्थान-पाकिस्तान युद्ध सुरू झाले. त्या गडबडीत दोन महत्त्वाच्या घटना कम्युनिस्ट पक्षास मारक म्हणून ठरल्या. सबंध भारत लालबहादूर शास्त्री यांच्या मागे उभा राहिला व शास्त्रीजी आणि जनसंघ यांचे संबंध बरेच जवळचे झाले. उजवा गट प्रबल झाला. पाकिस्तान चिडून जाऊन चीनच्या मांडीवर बसले. भारत एकसंध्र आपोआप बनले की कम्युनिस्टांना चळवळ करण्यास वावच नाही. आणि भारतातून एकदा साम्यवाद हलला की ती स्फूर्ती बाकीच्या पूर्व आशियन राष्ट्रांनी घेतलीच म्हणून समजा.

या शहास काटशह देण्यासाठी क्रेमलीनमध्ये एक सुंदर डाव शिजला. त्यात पहिला बळी भारताने हजारो तरुणांचे रक्त सांडून जिंकलेल्या खास पाकिस्तानी भूभागांचा पडला. लक्षात ठेवा, गोरे वगैरे चार दोन मंडळी सोडली तर लोक-

सभेत काँग्रेसचा एवढ्या कारणावरून निषेध कोणीही केलेला नाही. ताश्कंदच्या कागदी पराभवामुळे काय कोणाचे रक्तच उसळले नसेल ? मग सार्‍यांनी आपली तोंडे चूप का ठेवली ? लोकसभेत कोणी देशभक्त म्हणून शिल्लक नव्हता काय ? आजचे सिंडीकेटचे देशभक्त गडी त्यावेळेस काय करीत होते ?

दुसरा बळी हिंदुस्थान-पाकिस्तान युद्धातील विजयी वीराचा. मी डॉक्टर आहे. मी जास्त बोलू इच्छित नाही. मी एकच प्रश्न विचारतो : 'लालबहादूर शास्त्र्यांच्या मृत्यूप्रमाणे इतिहासात घडलेला दुसरा मृत्यू मला दाखवाल काय ?' या घटनेची जास्त माहिती असलेली दिल्लीत दोन चार तरी मंडळी आहेत. ते ताश्कंद येथे होते. ते आज चूप आहेत. कधीतरी तर ते तोंड उघडतीलच ना ? राजकीय रहस्यास पेटंट औषधाप्रमाणे Expiry Date असते.

तिसरा बळी संजीव रेड्डींचा. वैयक्तिक दृष्टचा हा बळी महत्त्वाचा नाही. पण त्याने अंतर्कलहास तोंड फुटले. म्हणून हा सर्वात महत्त्वाचा मैलाचा दगड. डावे-उजवे यांची सुंदोपसुंदी येथे सुरू झाली.

चौथा बळी मोरारजींचा. राजकारणी पुरुषाचा राजकीय मृत्यू शारीरिक मृत्यू-पेक्षा महत्त्वाचा असतो. या विषयावर चर्चा करण्याचे दुर्दैव पुन्हा माझ्यावर आले होते व तेही मोरारजींबरोबर ! आयुष्यात पहिल्यांदा बोलताना मोरारजी सूत कातायचे थांबले, चरखा दूर सारला व म्हणाले, 'कोणास माझी हत्या करा-वयाची असेल तर किती सोपे आहे.' याचा अर्थ ? ह्या Vegetative existence ला काय अर्थ आहे ? माणसाच्या हातून सत्ता गेली की तेथेच त्याचा मृत्यू सुरू होतो.

पाचवा बळी काँग्रेसच्या एकजिनसीपणाचा. अर्ध्या काँग्रेसने लोकसभेत विरोधी




बाकडचायर बसायचे यास अर्थ आहे का? त्यात मान कोठे आहे? त्यात अब्रू कोणाची राहिली? जगात लोक आम्हास काय म्हणतील?

सहावा बळी राष्ट्रीय एकात्मतेचा. ही कम्युनिस्टांची स्ट्रॅटेजी खास ध्यानात ठेवण्यासारखी आहे: "Social divisions and regionl differences are made to be exploited.' हे साध्य कसे करावयाचे? सोपे आहे. त्याचे उत्तर: 'make it a business to appear to become the political custodians of regional patriotism.' थोडक्यात, मराठी गुजराथी, कर्नाटकी, मल्याळी, पंजाबी अस्मिता जागृत करून एकमेकांच्या मध्ये आग पेटवा. उजवे पक्ष व राष्ट्रीय पक्ष बहुधा या मूर्खपणास बळी पडणार नाहीत. पडले तर बरेच आहे, त्यांचा आघाडीवरचे हुतात्मे म्हणून उपयोग करून घेऊ! या चळवळीस त्यांनी विरोध केला तर बरेच आहे. आपल्या हाताने आपल्यासाठी खड्डा खणून ठेवतील. वेळ साधून आम्ही त्यांना बरोबर आत ढकलून दाटून देऊ! हा 'Separatist thesis' ज्यांच्या टाळक्यातून जन्मास आला असेल त्यांच्या सुपीक मेंदूचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

पुढील ओळींचा अर्थ पहा: "Party leaders speak of 'democratic centralism' in internal organization as necessary if the CPI is to be an efficient instrument for political action; but as a matter of fact there is a distinct aversion and unwillingness on the part of many leaders to serve in staff capacities; better to resign and rule at the lower levels of the political process than to serve and be a nobody at headquarters." ह्याचा 'मुजाहीदी' अर्थ जनसंघाच्या पूर्वजांना पंचवीस वर्षापूर्वी कळला असता तर हिंदुस्थानचे 'भारत' झाले नसते. सुज्ञास जास्त सांगणे नलगे.

आणि सातवा बळी लोकशाहीचा. लोकांचा कलह सुरू झाला की लोकशाही संपुष्टात आली म्हणून समजा. लष्करशाही येथे येत नाही. ती काळजी मेनन-साहेबांनी नेहरूंसाठी केव्हाच घेऊन ठेवली होती.

आठवा बळी व्यक्तिस्वातंत्र्याचा.

नववा बळी भारतीय संस्कृतीचा.

क्रांतीचा जयजयकार असो! इन्किलाब झिंदाबाद! क्रांतीत बळी हे जायचेच. आणि त्यात विघडले कोठे? पं. बंगालच्या गेल्या नऊ महिन्यात झालेल्या क्रांतीत(?) पाचशे माणसे हुतात्मे झाले. बोलशेविक् क्रांतीपासून आजपर्यंत दहा कोटी लोकांची क्रांतीत हत्या झाली आहे असे 'टाईम अँड् टाईड' या ब्रिटीश पत्रिकेचे म्हणणे आहे. एकट्या चीन देशात आजवर चार कोटी पंचेचाळीस लाख लोकांनी आपले प्राण क्रांतीच्या वेदीवर अर्पण केले आहेत. १९'७ ते १९६९ या कालात

साडेचार कोटी रशियन्स् साफ झाले आहेत. पूर्व युरोपात एकंदर ३५ लाख लोकांची कत्तल झाली आहे. भारतात, त्या दृष्टीने, अजून क्रांती आलीच नाही! रशियात गेल्या वर्षी दोन लाख लोकांना मार्क्सला भेटण्यासाठी वर पाठवून दिले गेले!!

'अजापुत्रांना बळी द्यावेत' असे तुमची भारतीय संस्कृतीच नाही का शिकवीत ?

इंदिरा गांधींना जर ही हिंसा थांबवायची असली तर तिला भांडवलशाहीच्या प्रतिनिधींशी हातमिळवणी करावी लागेल. हे लोक त्यांची किंमत मागितल्याशिवाय रहाणार नाहीत. त्यांना हिंसा नको असते. त्यांना शोषण पाहिजे असते. हिंसा केली, तेवढ्या लोकांना मारून टाकले तर तेवढ्या प्रमाणात आपला फायद्याचा हिस्सा कमी होईल ही त्यांना भीती वाटते. कारण अर्धमेल्या अवस्थेतही लोक जिवंत राहिले तरी ह्या धनिकांचा पाच–दहा–पंधरा टक्के नफा जो मिळायचा तो चालूच राहणार आहे. भांडवलदारांना गरीबांचे काय होत असते ह्याची पर्वा नसते. कारणे उघड आहेत : १. त्यांना तेवढा वेळ नसतो. २. त्यांच्याजवळ गरीबांची सेवा करावी ही दानत नसते. ३. हिंदू धर्माने धर्माच्या दलालांना त्यांची टक्केवारी दिली की भांडवलदारांचे पापक्षालन करण्याची सूट ठेवली आहे. ४. लोकात एकी नाही त्यामुळे लोकमताचा दाब भांडवलदारांवर पडणे नाही. ५. प्रत्येक हिंदूस किंमत असते. ती दिली की भांडवलदारांविषयी 'प्यार ही प्यार' ६. सत्ताधीशांना तरी कोठे गरीबांविषयी काही वाटते ? सत्ताधीश व भांडवलदार एकत्र होऊन गरीबांचे पोषण करण्याऐवजी शोषण करतात. सत्ता व संपत्ती दोन्ही डोक्यात जातात. त्याचा ताप गरीब जनतेस.

ह्या सर्व परिस्थितीचा फायदा, अलबत्, कम्युनिस्ट पक्ष घेणार असे दिसते. कारण जनसंघ व स्वतंत्र पक्षाच्या पुढाऱ्यांना त्यांच्या राजकारणासाठी थैलीशहांवर अवलंबून रहावे लागणार; नकसलाईट्स्प्रमाणे त्यांना काही डाके पाडता येणार नाहीत. त्यांच्याकडून थैलीशहा त्यांची स्वतःची टक्केवारी वसूल केल्यावाचून रहाणार नाहीत. येथे आदर्शवादी गुरुजींनी फार दखल केली तर त्यांना अप्रिय बनवून संघ व जनसंघ यांच्यात फूट पाडण्याचे राजकारण खेळण्यास काँग्रेस–समाजवादी–कम्युनिस्ट तयार आहेतच. हिंदूमहासभेस त्यांनी वेगळे काढलेच ना ? समाजवादी पक्षाचा समाजवाददेखील घोषणावादीच आहे. त्यांच्या जन्मजात दळिद्रीपणामुळे त्यांना रेल्वेच्या तिकीटापासून ते हॉटेलच्या जेवणापर्यंत भांडवलदारांवर अवलंबून रहावे लागते !

ह्या दृष्टीने मॉस्कोस गेलेला एक जुना गुप्त अहवाल मोठा विचार करायला लावणारा आहे. त्यातील मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :

१. कॉंग्रेस पक्षात सारी बुद्‌ढी मंडळी भरली आहेत. त्यांच्या हातून प्रत्यक्ष कार्य काहीही होऊ शकणार नाही. इंदिरेस नवीन रक्त परवडणार नाही. कारण नवीन रक्त इंदिरेचा संधिसाधूपणा चालून देणार नाही. नवीन रक्तास कार्यक्रम व कार्यसिद्धी हवी असते. कॉंग्रेसमध्ये नाव घेण्यासारखा आज एकही खऱ्या ताकदीचा पुढारी शिल्लक नाही.

२. कॉंग्रेस पक्षात डावे व उजवे असे दोन पक्ष पडले आहेत. त्यात उपपक्षही बरेच आहेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण ही उतावळी कृती आहे असेही एका उपपक्षाचे म्हणणे आहे. हिंदूंचे योग्य संरक्षण, मिश्र अर्थशास्त्रीय धोरण, राष्ट्रीयीकरण, शेतकरी व कामगार यांचे एकदम हितसंवर्धन—एक ना दोन, अनेक गोष्टींवरून कॉंग्रेसमध्ये उपपक्ष पडले आहेत व त्यांना सांधून घेणारा कोणीही दुवा नाही.

३. पंचवार्षिक योजना फलदायिनी ठरलेल्या नाहीत. साऱ्या योजना परदेशी मदतीवर गुलामाप्रमाणे अवलंबून होत्या. प्रत्येक पुढील योजना स्वदेशी असण्याऐवजी जास्तजास्त परदेशी होत गेली. गरीब माणसाचे भवितव्य व दैनंदिन जीवन योजनांमुळे बदलले आहे, तो सुखी झाला आहे असे सरकारी प्रचार सांगतो. ते खरे नाही. आश्वासने व न पाळली जाणारी वचने यांनी पोट भरत नाही.

४. लाचलुचपतीमुळे सारे प्रशासन पोखरून निघाले आहे. सरकारी कागदी योजना, न्यायालयीन चौकशींचे अहवाल व निष्कर्ष यांनी लोकांची समजूत होत नाही. उलट, त्यावरील लोकांचा विश्वास आता उडत चालला आहे.

५. बेकारी, विशेषत: सुशिक्षित वर्गातील बेकारी, धोक्याच्या प्रमाणात रोज वाढत आहे. तरीही शिक्षण देणे कमी होत नाही.

६. तरुण वर्गास कळून चुकले आहे की कॉंग्रेसच्या राजकारणात त्यांना स्थान नाही. बुद्धिवंतांचीही तीच खात्री होऊन चुकली आहे.

७. ट्रेड युनियन्समध्ये कॉंग्रेसचा सत्तेवर असूनही जोर कमी होत आहे. जनसंघाचा जोर सुशिक्षित व शहरी कामगारांच्या अमुक एक वर्गात वाढत आहे. सारे विरोधक कॉंग्रेसच्या लहानात लहान चुकीची वाट पहात उभे आहेत—त्या चुकीचे राजकीय भांडवल केव्हा व कसे करावे या हेतूने.

मला नाही वाटत, राजकीय परिस्थितीची इतकी सुंदर छाननी इतर कोणत्या पक्षाने केली आहे. छाननीनंतर लगेच स्ट्रॅटेजी ठरविली जाते. तिची अंमलबजावणी म्हणजेच उपाययोजना.

उपाययोजना तात्कालिक व दीर्घ मुदतीची अशी दोन प्रकारांची असते. दीर्घकालीन उपाययोजना परिणामामुळे कळून येत असते. त्यादृष्टीने गेल्या काही महिन्यातील कॉंग्रेस सत्ताधारी पक्षातील ठळक घटना तपासून पहाणे उपयोगी ठरेल. कम्युनिस्टांच्या चालबाजीचे ते गमक वा निर्देशक ठरेल.

१. डॉ. झाकीर हुसेन यांच्या दुखवट्यास श्री. कोसिजीन दिल्लीस आले होते

त्यावेळस फक्त रशियन दुभाष्यास कोसिजीन-इंदिरा भेटीच्या वेळी परवानगी देण्यात आली होती. भारतीय दुभाषी राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन फुटला तर काय करा ?

२. 'संजीव रेड्डी हे प्रतिगामी व भांडवलशहांचे हस्तक आहेत म्हणून आमचा पाठिंबा फक्त गिरींना राहील; रेड्डींविरुद्ध आम्ही उग्र आंदोलन करू,' अशी कम्युनिस्ट पक्षाने भीती घालताच बाईंनी रेड्डींना सोडले व पक्षशिस्तीच्या भंगाचा धोका पत्करूनही गिरींना पकडले.

३. मोरारजीभाईंना काढलेच पाहिजे, तें शत्रू क्रमांक एक आहेत असा आदेश दिला गेला व मोरारजी गेले. मोरारजी तडजोड करण्यास तयार होते तरीसुद्धा !

४. चंद्रजित यादव, गणेशन् व नंदिनी सत्पथी यांचा समावेश नव्या कार्यकारणीत झाला. नंदिनी सत्पथींना ओरीसाच्या काँग्रेसमध्ये जराही स्थान नाही व त्यांचे कम्युनिस्टांशी अगदी जवळचे संबंध आहेत. चंद्रजित यादव हे जुने कम्युनिस्ट. गणेशन् हे अंदमान निकोबारचे काँग्रेस सदस्य. पण या अंदमान निकोबारात काँग्रेस पक्षच म्हणण्यासारखा नाही !

५. सुब्रह्मण्यम् यांना पूर्वी काँग्रेसमधून घालवून देण्यात आले होते. कामराजांना विरोध करणारे व कृष्णमाचार्यांच्या विश्वासातील म्हणून त्यांना घेण्यात आले.

६. अण्णासाहेब शिंदे हे देखील पूर्वाश्रमीचे कम्युनिस्ट होत. पण त्यांनी कम्युनिस्टांशी संबंध तोडून टाकला. शिवाय यशवंतरावांच्या ते मर्जीतले. म्हणून कार्यकारीणीत त्यांना स्थान देण्यात आले नाही.

७. रशिया भारतीय वॅगन्स् विकत घेणार होता पण दोन अटींवर. (अ) रशियन विमाने अमेरिकन विमानांपेक्षा कमी दर्जाची असली तरीही भारताने तीच घ्यावीत. (ब) भारताची विमानदलातील संरक्षणविषयक माहिती रशियास पाहिजे होती. त्याचप्रमाणे हिंदी महासागरातील काही महत्त्वाच्या ठाण्यांविषयी माहितीदेखील. संरक्षण दलाच्या अधिकाऱ्यांनी संमती दिली नाही. वॅगन्स्ची ऑर्डर बहुधा कॅन्सल !

८. मुंबईच्या १५० कम्युनिस्टांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून इंदिरा गांधींचे हात बळकट करण्याची तयारी केली आहे.

९. प्रो. हजारींची डावरी मते सर्वज्ञात आहेत. त्यांची रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदावर नेमणूक करण्यात आली आहे.

१०. प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याचे उच्चाटण करून पुन्हा कम्युनिस्टांना जीवदान !

आज प. बंगाल व केरळ येथे रीतसर official साम्यवादी पक्षाचा जोर आहे. महाराष्ट्र, आंध्र, बिहार, आसाम व गुजराथचा काही भाग, तेलंगण, सारी हिमालयाची उत्तर भूपट्टी व काश्मीर हा कम्युनिस्टांच्या मते संभाव्य साम्यवादी भाग

होय. त्यांच्या मते 'काँग्रेस विरुद्ध कम्युनिस्ट' हा लढा आता संपला असून हा लढा कम्युनिस्ट विरुद्ध कम्युनॅलीस्ट यांच्यात सुरू झाला आहे. गेल्या वीस वर्षांत कम्युनॅलीस्ट शक्ती हिंदूसभेप्रमाणे पार क्षीण होऊन तेथे डाव्यांचे प्रस्थ सुरू होईल हे साम्यवादी स्वप्न कम्युनॅलीस्टांचे तीन अध्यक्ष संशयास्पद कारणांमुळे खलास होऊनदेखील साकार होऊ शकलेले नाही. आपला हा पराभव साम्यवादी लोक कबूल करतात. त्यांच्या मते भारतीय संस्कार, संस्कृती व मर्यादा यांचे जोपर्यंत नीट उच्चाटण होत नाही तोपर्यंत हे काम त्यांना अवघड ठरणार आहे, त्यासाठी नवीन पाश्चात्य संस्कृतीचे राजदूत – फॅशन्स्, सिनेमा, नाच, टी. व्ही, व इतर खुळे उदा. दारू-काम, हिप्पी वगैरे – त्यांचे उद्दिष्ट साधावयास मदत करतील अशी त्यांची धारणा आहे.

शहरातील औद्योगीकरणामुळे या संस्कृति-नाशाचा (de-culturisation) कार्यक्रम वेगाने पार पडेल असे त्यांचे म्हणणे. उदाहरणार्थ, पुणे ही पेशव्यांची राजधानी आणखी दहा वर्षांनी औद्योगिक दुर्गुणांची खाण बनेल व आस्ते आस्ते दाक्षिणात्य मंडळींच्या सहवासाने साम्यवादी होईल असे त्यांचे गणित आहे. प्रत्येक प्रांतात अशा पाच पाच पुण्यनगरी निर्माण झाल्या की पुरे; त्यामुळे सहज त्यांच्या स्ट्रॅटेजीचा पहिला टप्पा पुरा होईल. कम्युनिस्टांच्या दोन्ही पक्षांचे अंतिम उद्दिष्ट एकच आहे हे आपण विसरता कामा नये. वेळ पडल्यास दोन्ही पक्ष एकत्र होऊन कार्य करतील व आपले अंतिम ध्येय साधतील याची कम्युनिस्ट सर्वोच्च पुढाऱ्यांना खात्री आहे. एका सर्वोच्च पुढाऱ्याने मला मागे सांगितले होते, 'आमचे मतभेद अंतिम ध्येयाविषयी नाहीत, कार्यपद्धतीबद्दल आहेत.' ह्या कार्यासाठी काँग्रेसमध्ये शिरलेले साम्यवादी 'मुजाहीद' फारच उपयोगी पडतील असे डॉ. बालीगा नेहमी म्हणत. हे जेवढे संख्येने जास्त तेवढे त्यांना काढणे अवघड.

श्रमजीवी व शेतकरी वर्गाचा पाठिंबा मिळवून जनतेच्या हलाखीच्या परिस्थितीस सत्ताधीश सरकारच जबाबदार आहे अशी जनतेस खात्री पटवून आपला जोर वाढविणे ही कम्युनिस्टांच्या स्ट्रॅटेजीची दुसरी पायरी. मला वाटते, ती काही प्रांतात आज बरीच सफल होत आहे. या सफलतेचा निदर्शक (Pointer) कोणता या माझ्या प्रश्नाचे उत्तर मला पुढीलप्रमाणे ऐकावयास मिळाले. 'राज्यकारभारात, मंत्रालयात, त्रिदलात, इतर राजकीय पक्षात, वृत्तपत्रांच्या कार्यालयात व सामाजिक जीवनाशी संबंध येणाऱ्या इतर संस्थांमध्ये आमची माणसे पद्धतशीरपणे मोठ्या संख्येने आम्ही घुसवू शकलो की आमचे काम सफल झालेच म्हणून समजा. याचा फायदा देशात गोंधळ वा बखेडा माजेल त्यावेळी आम्हास आपोआप मिळेल, एरवी नाही. लक्षात ठेवा, आमचा लढा दीर्घकालीन (Long Term) व मोठ्या प्रमाणावर (Total) असतो.'

उरील उद्दिष्ट साध्य होईस्तोवर क्रांती (?) सनदशीर व कायदेशीर मार्गाने

पुढे न्यायची असे साम्यवादी पुढाऱ्यांचे ठरलेले आहे. हा तिसरा टप्पा साध्य करण्यासाठी गरीब वर्गात हलाखीची स्थिती वाढून असंतोषाचा भडका उठला पाहिजे म्हणजे त्यातून प्रस्थापित राज्यसत्ता उलथून टाकण्याच्या प्रयत्नांना जनतेचा उठाव वा आंदोलन असे गोंडस व आकर्षक नाव देता येते. राजकीय क्रांती वा उठाव जनतेच्या हार्दिक सहकार्याशिवाय यशस्वी होत नाही हे साम्यवाद्यांना मध्यपूर्व आशिया, अतिपूर्व आशिया व तेलंगण–बंगाल सारखे काही भारतीय प्रांत यांच्या अनुभवावरून कळून चुकले आहे. जनतेचे सहकार्य मिळेल असा आत्मविश्वास आला की शस्त्रास्त्रे वाटणे व सशस्त्र क्रांतीस आवश्यक ठरणाऱ्या Bases ची उभारणी करणे सोपे जाते. शस्त्रास्त्रांची मदत. परदेशाहून मिळविणे (स्मगलींग करून) त्यामानाने सोपे काम आहे. पण स्मगलींग करणार तरी किती? त्यासाठी येथील शस्त्रास्त्रांच्या कारखान्यात आपली माणसे घुसविणे व येथल्या येथे शस्त्रांस्त्रांचे गुप्त कारखाने सुरू करणे हे केव्हाही सोयीचे ठरते. (अ) भारतीय लोक भ्याड आहेत, जीवे मारीन असा धाक निर्माण केला तर वाटेल ते मानतील असे एक गणित मांडले जाते. (ब) दुसरे गणित पाकिस्तानाची मदत घेऊन येथील मुस्लीम बांधवांना उठविणे व त्यांची मदत घेणे हे होय. याचे प्रात्यक्षिक अहमदाबादेत पोलीसांना पहावयास मिळाले. (क) तिसरे गणित, क्रांतिकारकांच्या शत्रूंचा निःपात करणे. सशस्त्र, पेटलेल्या क्रांतिकारकांना हे अवघड नाही. त्यासाठी वय हे मुख्य Consideration. मोरारजींना हात लावण्यापेक्षा त्यांना मानसिक धक्के देऊन आजारी पाडणे व अंथरुणास खिळविणे हे जास्त सोपे.

चौथी पायरी प्रत्यक्ष युद्धसंघटना उभी करणे. त्यासाठी युद्धाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. रिटायर्ड लष्करी अधिकारी त्यादृष्टीने उपयोगी ठरतात. कोणे एके काळी लष्करी अधिकाऱ्यांना त्यांचे हे असले राजकीय qualification पाहून बढती देण्यात आली होती. ती अजून पाचदहा वर्षांनी उपयोगी पडेल असा अंदाज आहे.

एवढे झाले की पाचवी पायरी सुरू. युद्ध संघटना व्यवस्थित तयार असेल, जनतेचे सहकार्य मिळत गेले व शासनात आपल्याच लोकांचे बहुमत झाले तर अंतिम युद्ध पुकारून सत्ता काबीज करणे (Take over) अगदी सोपे काम आहे. त्यासाठी असंतोषाचा वणवा चेतवित ठेवणे अत्यावश्यक आहे. प्रचारासाठी वृत्तपत्रे, वक्ते, लेखक व पुढारी यांचेही फार मोठे साहाय्य ह्या पवित्र युद्धासाठी (Holy War) आवश्यक आहे. सरकारविरुद्ध रोज नवीन कंड्या पिकविणे हा प्रचारकांचा मुख्य उद्योग या वेळी असतो. त्याची थोडीफार झलक आज आपणास दिसून येते.

"कम्युनिस्ट सरकार दहा वर्षांत दिल्लीत येईल असे तुम्हास वाटते का?" मी एका सैद्धांतिक दृष्टीने समर्थ असलेल्या प्रो-रशिया साम्यवादी अग्रणीस प्रश्न




शांततेची लस

केला. साम्यवादी पोळ्यात यांचे 'राणी' सारखे वर्चस्व असते; बाकीचे सारे मजूर. काम करावयाचे व ते संपले की त्यांची अवतारसमाप्ती !

"आम्ही आशावादी जरूर आहोत पण आशावादासही स्थलकालानुसार मर्यादा असतात."

"तुम्हास भारतात अशा गोंधळलेल्या अवस्थेतही मर्यादा वाटतात अजून ?"

"फार !"

"त्या कोणत्या ?"

"त्या आता जगजाहीर झाल्या आहेत."

"जगजाहीर झालेल्या सांगू नका. काहीतरी नवीन सांगा."

"कम्युनिझमची हिंसेशी सांगड घातली गेली आहे. तो सामान्य भारतीयास किती रुचेल-पचेल याची मला शंका वाटते. या देशात गांधीजींनी व नेहरूंनी शांततेची लस ठोचून साऱ्यांना हिंसा-विरोधी बनविले आहे."

"सध्या तर भारतात हिंसेची कमाल मर्यादा दिसते."

"पण ती तात्पुरती फीट् आहे. सर्वसामान्य भारतीय माणूस अँटी-व्हायोलन्स् आहे. कम्युनिझमचा पायाच मुळी व्हायोलन्सवर उभारलेला आहे."

"आणखी एखादा नवीन पॉईंट ?"

"चीनचा तिसरा वर्ल्ड फोर्स म्हणून उदय. आशियन राष्ट्रे चीनच्या कच्छपी लागतील तर रशियन साम्यवादाचा त्यात पराभव होईल. आधीच चीनचे साठ कोटी सभासद संख्येत युरोप व रशियन साम्यवाद्यांच्या दुप्पट आहेत. त्यात इतर पन्नास कोटी साम्यवादी लोकांची भर पडली तर संपलेच."

"और कुछ ?"

"बाकी सब कंटीन्यूड् फ्रॉम द लास्ट पेज."

हे जुने मुद्दे सर्वांना चांगले ठाऊक झाले आहेत. त्या मुद्यांचा सारांश पुढील-प्रमाणे :

१. साम्यवादी पक्षात मुळातच असंख्य weak spots आहेत. हेवेदावे, मत्सर, राग, अनुराग, सत्ताभिलाषा व प्रसिद्धीची हाव यातून हे दोष जन्मास आले. बंगाल व केरळ येथे सत्ता हाती आली. तेव्हापासून हे दोष वाढीसच लागले आहेत. त्यापेक्षा सत्ता नसलेली बरी, असे उद्गार नंबुद्रीपादांनी त्रिवेंद्रम येथे त्यांच्या घरी माझ्याशी बोलताना काढले होते.

२. भारतीय साम्यवादी पक्ष परदेशी (विशेषत: रशियन !) पक्षांवर चार गोष्टी-साठी अवलंबलेला आहे; म्हणून त्याची अवस्था गुलामासारखी झाली आहे. त्या चार गोष्टी पुढीलप्रमाणे : (अ) पैसा. (ब) सैद्धांतिक उपदेश व कल्पना. (क) स्ट्रॅटेजी किंवा व्यूहरचना, व (ड) वाङ्मय. परदेशी मदतीचा ओघ जर आटला तर पक्षाचा आत्मा थंड होईल. हे सत्य जनसंघ वगैरे लोकांना माहीत आहे, पण परदेशी मासिके, साप्ताहिके व इतर असंख्य स्मगल्ड् वस्तू बंद व्हाव्यात यासाठी हे लोक काहीही करीत नाहीत. उलट, त्यातील पुष्कळांजवळ मी 'हिरो' पेन्स् पहातो ! गांधीजी वा सावरकरांनी विदेशी मालावर बहिष्कार पुकारला, प्रसंगी होळीही केली होती. ती कुवत, ती जागृती–खैर छोड दो, हेही का आपण सुचवायचे असते ?

३. चिनी प्रेमिकांनी बंगाल, केरळ व महाराष्ट्र येथे नको तो वाद उभा केला आहे व पक्षशिस्त आणि पक्षबल यांचे खच्चीकरण केले आहे. तरीही, भारतात आज बहुमत रशिया–प्रेमिकांचे आहे. कारण, जास्त पैसा रशियन आहे. चिनी आशियन दरिद्रीनारायणाचे प्रतिनिधी आहेत. त्याउलट रशियन लोक Every Hindu has his own price हे तत्त्व चांगल्या रीतीने जाणतात. मार्क्सच्या अर्थ-शास्त्राचे ते खरे वारस ना ?

१९६२ साली चिन्यांनी युद्ध घोषित करून सामान्य माणसाची उगीचच विरुद्ध प्रतिक्रिया करून घेतली आहे. कारण चीन व कम्युनिझम हे भारतात एक समजले जातात. कलकत्त्यात एका पीकींगवादी कम्युनिस्टांनी मात्र आत्मविश्वासाने मला सांगितले, " People's memories are proverbially short. The Chinese invasion at least in Calcutta is a thing of the past and although it is not entirely forgotten its image is blurred. The people, particularly workers and peasants do believe in our promises of a clean, honest, efficient government, promises of a lower cost of living, of employment, of greater equalization of income and reduction of economic disparities. "

पण गेल्या दोन वर्षातले कलकत्त्याच्या कम्युनिस्टांचे रेकॉर्ड काही विशेष नेत्र-दीपक नाही. माझ्या पीकींगवादी दोस्ताचा आत्मविश्वास अजून तेवढाच आहे का

ते बघण्यासाठी मला पुन्हा एकदा कलकत्त्यास गेले पाहिजे.

४. कम्युनिस्ट पक्षाचे भारतातील 'पास्ट रेकॉर्ड' एकदम खराब आहे. आमचे भोगीलाल गांधी हे एक जुने श्रद्धावंत कम्युनिस्ट अग्रणी! गुजराथचे प्रथम श्रेणीचे लेखक व विचारवंत. त्यांनी साम्यवादी पक्षापासून केव्हाच फारकत घेतली आहे. त्यांचा अनुभव : "They are the throughly unprincipled opportunists prepared to make any volte face at any time. They have hardly any dependable, firm loyalties to their own people and homeland." केरळमधील जुन्या मुख्य प्रधानांनी मला सांगितले, 'सत्तेसाठी हे लोक काय वाटेल ते करतील.'

५. कलकत्त्याचे नक्सलाईट कम्युनिस्टस् मला जास्त व्यवहारी वाटले. ते इतर भारतीय कम्युनिस्टांना बेअकली समजतात. त्यांची विचारसरणी मला सरळ व सोपी वाटली. इतर पक्षांनी त्या दृष्टीने विचार करावा अशी माझी त्यासाठी अनाहूत शिफारस आहे. त्या नक्सलाईटांनी सांगितले, 'चिनी कम्युनिस्टांनी जेव्हा लाँग मार्च करून चीन ताब्यात घेतला तेव्हा त्यांच्याकडे सर्व यंत्रणा तयार होती. त्यांच्यामागे शेतकरीवर्ग भक्कमपणे उभा होता. त्यांचे नेतृत्व अचाट कर्तबगारीच्या व महत्त्वाकांक्षेच्या पुढाऱ्यांकडे होते. या पुढाऱ्यांनी खरोखरच आपत्तींना, उपासमारीस, शत्रूच्या हल्ल्यास इतर लोकांच्यासमवेत राहून तोंड दिले होते. लोखंडी शिस्त त्यांनी सत्तेवर येताच जाहीर केली व कोणीही शिस्तभंग केला नाही! आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट, त्यांच्यापाशी त्यागी, विरागी व देशप्रेमाने प्रेरित झालेले रेड आर्मीचे शिपाई होते. अशी यंत्रणा कम्युनिस्ट पक्ष सोडा, भारतात एकाही पक्षाजवळ तरी आहे काय? आम्हा नक्सलाईट् लोकांना तशी 'रेड आर्मी' उभी करायची आहे. आमच्याजवळ पैसा नाही म्हणून आम्ही दरोडे घालतो, धाकदपटशा दाखवितो पण संपत्ती गोळा करतो. सांगा मला, यात आमचे काय चुकते ते. आम्ही गृहमंत्र्यांना विचारणार आहोत, तुम्ही पत्रीसरकार निर्माण केले तेव्हा काय केलेत? तुम्ही आमचे गुरू आहात!'

वा: रे गुरू! आणि धन्य ते चेले!

(क्रमशः)

 [पृष्ठ ... २३ वरून]

थांबली आणि तिकडून दुसरी एक वैतागलेली गाडी तेथे येऊन थांबली. ती गांधीनगरहून आली होती. तिच्यातील माणूस म्हणाला,

'शहाणे असाल तर तिकडे जाऊ नका!'

'का? काही दंगा वगैरे झाला का?' सिंधी माणूस. कारण येथील लोकांच्या मनातून दंग्याची भीती अजून गेलेली नव्हती.

'दंगा नाही. पण जाणंच अशक्य आहे. अहमदाबाद ते गांधीनगर वीस मैलांच्या रस्त्याला वाहनांची माळ लागलीय. पोलिस व्यवस्था तोकडी पडलीय. रस्ता अरुंद आहे. आणि तिकडून येणाऱ्या व इकडून जाणाऱ्या गाड्यात एखादं जरी टेक् ओव्हर झालं तरी रस्ता तुंबतो. मी सकाळी अकराला परत यायला निघालो ते आता कसं तरी पोहोचलो. तुम्ही जाऊ नका!'

त्या सिंधी माणसाची चुळबळ सुरू झाली. त्याचा उत्साह पार मावळला. पोराबाळांना घेऊन निघालेल्या त्या माणसाचं मन डळमळू लागलं. त्याचा म्हातारा चुलता तर म्हणाला,

'नको जाऊ यात–'

परंतु या सिंधी माणसाने त्याच्या तोंडावर हात ठेवला. आणि आमच्याकडे नजर करून त्याला चापले.

माझ्या ही गोष्ट लक्षात आली. केवळ आपल्याला शब्द दिला म्हणून, कर्तव्य म्हणून आता त्याच्या मनात जाणं उरलं हे मी ओळखलं. जोशीबुवांना म्हटलं,

'त्यांच्या मनात जावं असं नाही.'

'पण माझ्या मनात जावं असं आहे. आपण जाणारच.'

'अहो, पण ही गाडी अधिवेशनाची नाही. दुसऱ्याच्या मालकीची आहे.'

'मग काय झालं. आपण गाडीतून उतरू आणि बसनं जाऊ?'


'आतापर्यंत मग तुम्ही काय ऐकलंत? तुम्हाला बस कुठून मिळणार?'

'मिळेल हो. त्या दुसऱ्या माणसाच्या थापा आहेत. उगीच घाबरतो आहे तो.'

आमचं बोलणं मराठीतून चाललं होतं म्हणून बरं. त्यांना मराठी समजत नव्हतं. मी त्या सिंधी मित्राला म्हणालो,

'आप हमारी फिकिर मत करो. हम कैसे भी जायेंगे. आप हमारे लिये मत तकलीफ करो।'

'नही, नही! ऐसा नही हो सकता. आप हमारे साब के मेहमान हैं. हम आपको ऐसा नही छोड सकते. चलिये.' म्हणून ते लोक गाडीत बसले. आणि गाडी गांधीनगरच्या मार्गाने चालू झाली. आम्हाला निराळयाच रस्त्याने साईड



अप्रामाणिकपणा या देशाच्या कानाकोपऱ्यात भरून उरलेला आहे

मिळत होती. रस्त्यावरून प्रचंड जत्रा अधिवेशनाला जात होती. स्त्री, पुरुष, मुले, वृद्ध, धडधाकट, अपंग, लठ्ठ, किरकोळ, हिंदु, मुसलमान, मारवाडी, खिश्चन. सारं अहमदाबाद गांधीनगरकडे लोटलं होतं. समाजवादाची पर्वणी साबरमतीच्या तीरावर, गांधीजींच्या पायथ्याशी चालून आली होती. हा प्रचंड सोहळा, दुर्दम्य उत्साह, अनिवार आशा, नेत्यांच्या ठिकाणी असलेलं अनिवार्य प्रेम ! नेमकं काय होतं ! काही कळत नव्हतं. या जत्रेचं विश्लेषण करता येत नव्हतं. या जनसमुदायाच्या नाडीवर बोट ठेवता येत नव्हतं. माझं मन भांबावून गेले होतं.

पंडित नेहरूंच्या व्याख्यानांना जमणारी आणि शहरातून चारी दिशांनी येणारी गर्दी मी पाहिलेली होती. तो जनसमुदाय माझ्या ओळखीचा होता. परंतु ही ओढ ही गर्दी, हा जनसमुदाय त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक होता. एकाच दिशेने धावणाऱ्या माणसांची एवढी प्रचंड संख्या मी आजवर पाहिली नव्हती. माझ्या मनात विचार आला...गांधींची दांडी यात्रा निघाली तेव्हा एवढी गर्दी या रस्त्यावर झाली असेल का ? साबरमतीचं पात्र माणसांच्या लाटांनी असंच तुडुंब भरून गेलेलं असेल का ? आमची गाडी याच वेळी साबरमतीच्या पात्रातील कच्च्या पुलावरून चालली होती. पोलिसांनी गांधीनगरला जाण्यासाठी आणखी हा निराळाच रस्ता काढलेला होता. सिंधी कॉन्ट्रॅक्टर म्हणाला,

'पोलिसांनी तिकडे जाण्यासाठी चार पाच निरनिराळे रस्ते काढून दिलेले दिसतात. हा रस्ता खूपच लांबून आहे.'

मी जोशीबुवांकडे पाहिलं. पण त्यांचं आमच्या कुणाच्याच बोलण्याकडं लक्ष नसावं. साबरमतीच्या रुंद पात्रावर एक मोठा पूल बांधलेला होता. आणि मध्येच तो मोडूनही पडला होता. मी सिंधी मित्राला विचारलं,

'हा पूल नुकताच बांधलेला दिसतोय. अजून काम चालू आहेसं दिसतंय ?'

तो माझ्याकडे पाहून छद्मी हसला. मग म्हणाला,

'हा पूल बांधता बांधताच पडला. कॉन्ट्रॅक्टर मात्र लाखो रुपये खाऊन बसला.'

'असं ? इथंही हा प्रकार चालतो वाटतं ?'

'इथं म्हणजे ? ही काय इंद्रनगरी आहे ? अहमदाबादविषयी तुमच्या कल्पना तरी काय आहेत ?'

त्याच्या प्रश्नाचं नेमकं उत्तर मला देता आलं नसतं. पण मनात मात्र या शहराविषयी, येथील माणसांविषयी माझ्या निराळ्या कल्पना मनात बसल्या होत्या. मी उत्तर देत नाही असं पाहून कॉन्ट्रॅक्टर म्हणाला,

'अहो, अप्रामाणिकपणा या देशाच्या कानाकोपऱ्यात भरून उरलेला आहे. शिवाय चोराच्या खुणा चोरांनाच माहीत !'

'म्हणजे काय ?' मी चमकून विचारलं.

'मी सुद्धा एक ठेकेदारच आहे. मीही लाखो रुपयांची कामं घेतली आणि केलेली आहेत. आणि मलासुद्धा प्रामाणिक राहता आलेलं नाही !'

आमच्या गाडीनं उजवीकडे वळण घेतलं. डावीकडे दूर, हिरव्यागार झाडीत गांधींचा आश्रम दिसत होता. ठेकेदाराचं बोलणं ऐकून मला गांधींची आठवण झाली. त्याला म्हटलं,

'तुम्ही प्रामाणिकपणे खरं बोलता, हा गांधीजींच्या भूमीचा परिणाम !'

'कशाला साहेब ती तुलना करता ? आम्ही क्षुद्र माणसं. आम्ही खरं बोलत असू, पण गांधीजींसारखं खरं वागता कसं येईल आम्हाला ? वागणं आणि बोलणं यात फार फरक आहे !'

'बरोबर आहे !' माझं मन विचार करू लागलं. वाटलं होतं तितका हा माणूस उथळ नाही.

गाडी कच्च्या रस्त्यावरून धावत होती. आमच्या पुढंही खूप मोटारी धावत होत्या आणि मागंही. धुळीचे प्रचंड लोट आकाशात जमले होते. म्हणजे आकाशच दिसत नव्हतं. धुळीतून परावर्तित होणारं ऊन विचित्र वाटत होतं. या रस्त्यानं अजून गांधीनगर किती दूर आहे हे लक्षात येत नव्हतं. दिशा दिसत नव्हत्या. रस्ता देखील दिसत नव्हता. पुढची गाडी थोडीबहुत दिसत होती त्या रोखाने आमचा ड्रायव्हर, जुन्या काँग्रेसच्या समाजवादाच्या रस्त्याने चालला होता !

'पण आम्हालाही खोटेपणा करावाच लागतो....' सिंधी ठेकेदार सांगत होता. 'कारण सरकारी नोकर पैसा खाल्ल्याशिवाय मुळी काम करीतच नाहीत !'

'या नोकरात लाचखाऊ वृत्ती फार वाढलीय नाही ?'

'त्यात नोकरांचा काही दोष नाही साहेब ! मंत्री पाच वर्षांच्या काळात जर लाखो रुपये कमावतो, तेही वाममार्गानं बरं ! तर बिचाऱ्या अर्धपोटी नोकरवर्गानं

कोणता आदर्श पुढं ठेवावा ? मग लाखाच्या कामाला पंचवीस हजार जर लाच द्यावी लागली तर ते काम या पुलासारखंच नाही होणार तर कसं ? भाक्रा नानगलच्या धरणाची दरड कोसळली होती हे आपणास माहीत आहे ना साहेब ?'

मी नुसती मान हलविली आणि सुन्न झालो. त्या सिंधी ठेकेदाराच्या चेहऱ्याकडे पाहातच राहिलो. सरकार, कॉंग्रेस आणि नोकरवर्गाविषयींचा सात्विक संताप त्याच्या गुबगुबीत चेहऱ्यावर पसरला होता. त्याची दाढी किंचित वाढली होती. त्याच्या डोक्यावर टोपी नव्हती. त्याचे राठ केस ताठ उभे होते. पांढरा शर्ट आणि पांढराच लांब कोट त्याच्या अंगात होता. त्याचं व्यक्तित्व चटपटीत वाटत नसलं तरी कष्टाळू आणि धीमं, समंजस वाटत होतं. त्याच्याकडे पाहून मनात विचार येत होते...माणसाचं व्यक्तित्व कसं घडतं ? कोण घडवितं ? पूर्वसंस्कार का वर्तमान परिस्थिती ? आणि परिस्थिती कोण निर्माण करतं ? समाजसेवक का राज्यकर्ते ? काळाबाजार, लाचलुचपत, गुंडगिरी, एकमेकावरील अविश्वास, अप्रामाणिकपणा कोणी निर्माण केला ? विनोबा भावे यांनी का पंतप्रधानांनी ?

'आता हेच पाहा साहेब ?...' ठेकेदार माझ्याकडे पाहून बोलला आणि माझं विचारचक्र तुटलं. मी त्याच्याकडे पाहून 'ऐकतो' अशा अर्थाची मान हलविली. तो पुढे म्हणाला,

'अहमदाबादमधली हिंदु-मुसलमानांची दंगल कुणी घडवून आणली ?

मी चमकून त्याच्याकडे पाहिलं.

'सांगा ना ?' तो म्हणाला.

'तुम्हालाच खरं काय ते माहीत.' मी म्हणालो.

'अहो, याला कारण राज्यकर्तेच. एकीकडे जगात गर्जना करायची आमचा देश 'सेक्युलर' आहे म्हणून आणि दुसरीकडं हे असे दंगे पेटवून द्यायचे ! माझा तर फार संताप होतो साहेब. त्या रामायणातल्या परटानं रामाच्या बायकोविषयी शंका घेतली तर रामानं सीतेचा त्याग केला. आणि आमच्या या राज्यात दररोज असली विकृत रामायणं घडतात पण इथला या देशातला राज्याधिष्ठित राम काही केल्या सिंहासन सोडीत नाही ! एवढं चौदा चौकड्यांचं राज्य आणि अमाप सत्ता हातात असताना या देशात दंगली का होतात, भ्रष्टाचार का माजतात, लाचलुचपत का बोकाळते ? सांगाना ? बोला...मला काहीतरी उत्तर द्या साहेब !' सिंधी ठेकेदार सात्विक संतापाने पेटून निघाला होता. तो बोलत होता त्यामधलं एक अक्षर चूक नव्हतं.

या देशात एकीकडे दु:खाचे डोंगर पसरलेले आहेत आणि दुसरीकडे सुख असूनही समाधान आणि शांतता नाही, कर्तबगारी असूनही तिचा वापर सचोटीने करता येत नाही !

त्याला मी काय उत्तर देणार ?

'आणि आता ही काँग्रेस फुटली. देशात समाजवाद आणण्यासाठी फुटली! आता तुम्हीच सांगा. एकीनं कल्याण होतं का बेकीनं? ज्या काँग्रेस पक्षाची आपसात एकी नाही तो पक्ष देशातील हिंदु-मुसलमानात एकी कशी काय घडवून आणू शकेल? आणि समाजवाद तरी कसा आणू शकेल?'

ठेकेदाराच्याही तोंडी 'समाजवाद' शब्द आलेला पाहून मला मौज वाटली. काँग्रेसच्या फुटीमुळे 'समाजवाद' हा शब्द खालच्या पातळीपर्यंत तरी पोहोचला. आता काही वर्षांनी शब्दासारखाच खरा समाजवादही खालपर्यंत पसरेल. मिरासदारांच्या कथेतील खेडूत लोक जसे 'आर्जंट', 'मिष्टिक' वगैरे इंग्रजी शब्द वापरतात तसे या देशातील लोक काही वर्षे तरी समाजवाद हा शब्द वापरू लागतील!

आमच्या मोटारीचा वेग आता अगदीच मंदावला होता. जवळ जवळ ती बैलगाडीच्याच वेगाने चालत होती. मागे पुढे शेकडो गाड्यांची माळ पडली होती. धूळ तर सारखी उडतच होती. धुळींच्या लोटांनी जो आकार घेतला होता तेवढी लांबी गाड्यांची होती असे अनुमान काढता येत होते. मी ठेकेदाराला विचारले,

'समाजवाद आणायचा म्हणजे आता तुम्हाला काय पाहिजे?'

'अहो कसला समाजवाद आणि कसचं काय घेऊन बसलात साहेब. हे राज्यकर्ते चोर आहेत. पक्के चोर!'

'हा खोटा आरोप आहे त्यांच्यावर.'

'नाही. तुम्हीच सांगा, एका काँग्रेसच्या दोन काँग्रेस झाल्या. या दोन्ही काँग्रेसचे आई, बाप, भाऊ एकच — गांधी, नेहरू, वल्लभभाई पटेल, लालबहादूर शास्त्री. तुम्ही सिंडीकेट काँग्रेसचा डायस काल पाहिलाच असेल ना?'

'हो.'

'पाठीमागे वरील सर्वांचे फोटो आहेत. तुम्ही आता मुंबईच्या काँग्रेसलाही जाणार आहातच. मी इथं बसून सांगतो, त्यांच्याही व्यासपीठावर वरीलच फोटो असतील....

'मग बिघडलं कुठं? असेनात का? दोन भाऊ वेगळे झाले, तरी त्यांनी आईबापांचे फोटो घरात लावू नयेत काय?'

'तशी तुलना करू नका साहेब!'

'का?'

'अहो, राजकारणात कुणी बापाला बाप समजत नाही. स्वार्थ हाच त्यांचा बाप आणि खुर्ची हीच त्यांची आई! आता हेच पाहा ना. एकाच्या दोन काँग्रेस झाल्या. आता त्यांची दोन अधिवेशनं चालली आहेत. म्हणजे पूर्वी त्यासाठी एक कोटी खर्च येत असेल तर आता २ कोटी. पैसा मिळणार उद्योगपतींकडून म्हणजे खरा जनतेकडूनच. यांच्या साऱ्या नाड्या उद्योगपतींच्या हातात आणि जनतेच्या

नाड्या या उद्योगपतींच्या हातात. आता या त्रांगड्यातून समाजवाद कसा काय आणणार ते तुम्हीच पाहा.' म्हणून तो अत्यंत छद्‍मी हसला. त्याच्या हसण्यात तिरस्कार जेवढा ओतप्रोत भरून उरला होता तेवढीच उदासीनताही भरून राहिली होती!

आता दिवस पार मावळायला आला होता. त्या धुळीच्या लोटांमधून आम्ही कसेबसे गांधीनगरला पोहोचलो. गांधीनगरचं अधिवेशनाचं पटांगण माणसांनी गच्च फुलून गेलं होतं. पार्क केलेल्या गाड्या काढायला जागा नव्हती, तिथं नवीन गाडी पार्क कशी करता येणार!

'सभा संपली साहेब!' सिंधी मित्र गाडीतून उतरत म्हणाला.

खरोखरच सभा संपली होती आणि माणसं सैरावैरा धावत होती. समुद्रावर लाटा याव्यात तशा माणसांच्या लाटा आतून बाहेर येत होत्या. उसळत होत्या. पाहता पाहता गर्दीनं आम्हाला घेरलं आणि सिंधी मित्राचा निरोप घेण्यापूर्वीच त्याची आमची चुकामूक झाली. जोशीबुवांना म्हटलं, 'आपण एकमेकांच्या हाताला धरून गर्दी ओसरेपर्यंत थांबून राहू.' जोशीबुवा काही बोलले नाहीत. फक्त त्यांनी हात हातात दिला. त्यांना महिला संमेलन ऐकायला मिळालं नाही याचं वाईट वाटलं असावं!

आमच्या जवळून दहाबारा तरुणांचं एक टोळकं चाललं होतं. वक्त्यांना ते तरुण शिव्या घालीत होते.

'It's all Tamasha' त्यातील एक म्हणाला.



' They are deceiving the Public !' दुसरा वैतागून म्हणाला. ते टोळकं अदृश्य झालं.

'लोक निराश झालेले दिसतात !' जोशीबुवांना मी म्हटलं.

'आता इथून परत कसं जाता येईल एवढंच पाहिलं पाहिजे.' जोशीबुवा म्हणाले.

'बससाठी रांगेत उभं राहायला पाहिजे.'

'चला.'

'अहो पण जरा थांबाल तर खरं ! यायची घाई आणि परत जायचीही घाई.'

'त्या रांगा बघितल्यात का ?'

अक्षरशः अर्ध्या अर्ध्या मैलांच्या रांगा लागलेल्या होत्या. चहूकडे काळोख होता. पाचसहा लाख लोकांना उजेड देण्याइतकीही लाईट आरेंजमेंट तेथे नव्हती. लोक इतके जमतील अशी त्यांची कल्पनाच नसावी ! एखाद्या बोटीवर जर अशी वेड्यासारखी माणसं चढली असती तर बोट समुद्राच्या तळाशी केव्हाच गेली असती. कप्तानासकट. पण ही समाजवादाची बोट होती. आणि भाषणं संपवून कप्तान केव्हाच इंपाला, डॉज, शेव्हरलेट गाड्यांतून गावात निघून गेले होते आणि ही लाखोंच्या संख्येतील जनता अंधारात, थंडीत या धुळीच्या वाळवंटात सुखरूप घरी जाण्यासाठी धडपडत होती. नेत्यांना शिव्या घालीत रांगेत निमूटपणे उभी होती. म्हातारं माणसं कुरकुरत होती, तरुण सिगारेटी ओढीत टोळक्यांनी फिरत होते. रांगेत उभं राहणं त्यांना कंटाळवाणं वाटत होतं. स्त्रिया आपल्या मुलांना पदराशी घट्ट आवळून थंडीपासून त्यांचं रक्षण करण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होत्या.

येताना हे लोक उत्साहाते, संयमाने आले. पण जाताना त्यांची निराशा झाली होती. संयम सुटला होता. बसेसची व्यवस्था तशी चांगली होती. पण लाखो लोकांना एकदम घेऊन जाणं त्यांना कसं शक्य होतं ? सहाशे बसेस धावत होत्या. म्हणजे एका वेळेला चार हजार लोक त्या नेत होत्या. लोक आत मेंढरासारखे खच्चून भरले जात होते आणि वर टपावरही बसत होते. बिचाऱ्या ड्रायव्हर्सची कंबख्ती होती. कोण कुणाला नको म्हणणार होतं ? इथे अंमल कोणाचा होता ? व्यवस्था कोणाची होती ? लोक मैल मैल रांगा करून होते आणि दोन अडीच तासांनी जेव्हा बसजवळ पोहोचत होते तेव्हा तिथं रांग शिल्लकच राहात नव्हती. धटाई खाई मिठाई या न्यायाने लोक इंजिनवरून, खिडक्यातून, मागून, पुढून चहूकडून हल्ला करून बसमध्ये किंवा बसवर घुसत होते. पोलिस नावाची वस्तु तिथं औषधालाही दिसत नव्हती. सारी व्यवस्थाच कोलमडून पडली होती.

तरीही पण लोक तसे शांत होते. माझ्या मनात विचार आला हीच परिस्थिती जर कलकत्त्यात उद्भवली असती तर लोकांनी आतापर्यंत दहा वेळा अख्खा कलकत्ता जाळून टाकला असता ! पण अहमदाबादचे लोक तसे शांत, सोशिक दिसत होते.

आता थंडी फार सुटली होती. आमचे दात वाजू लागले होते. पोटात भूक

सपाटून लागली होती. दिवसभर जेवण मिळालं नव्हतं आणि विश्रांती तर नव्हतीच ! भूक म्हटलं की जोशीबुवा फार हळवे होतात. मी तर काय बोलून चालून अल्सर पेशंट. सकाळपासून जेवण नाही, दूधही नाही. आम्ही विचार केला अगोदर एखाद्या हॉटेलमध्ये जाऊन काही तरी खावं आणि नंतर बसच्या मागे लागावं.

थंडीत कुडकुडत आम्ही स्टॉल्स उघडले होते तिकडे गेलो तर काय ? एखादं युद्ध होऊन गेल्यावर रणभूमी दिसावी तशी अवस्था साऱ्या स्टॉल्सची झाली होती. खुर्च्या–टेबले अस्ताव्यस्त पडली होती. कनातीचे पडदे फाटले होते. दर्शनी भागावर मिठाईच्या आणि तळीव पदार्थांच्या थाळ्या रिकाम्या पडल्या होत्या. प्रत्येक हॉटेलची ही परिस्थिती होती. कुठंही पाण्याचा थेंब नव्हता तर खाण्याचे पदार्थ कुठून मिळणार ? एखाद्या शेतावर टोळधाड येऊन जावी, कणसांच्या दाण्यांचा पार फन्ना उडावा आणि उभं पीक आडवं व्हावं तशी अवस्था या हॉटेल्सची झाली होती.

दूर, लांबवर बसेसपाशी गोंगाट करणाऱ्या माणसांचा गूँऽऽऊँऽऽऽ असा विचित्र आवाज येत होता. दिवे अगदी तोकडे होते. उघड्या रानातील भयाण अंधाराच्या लाटा त्या मिणमिणाऱ्या दिव्यांवर झडप घालीत होत्या. लहान लहान पोरांचा रडण्याचा केविलवाणा आवाज येत होता आणि काळीज थरारत होतं. आता रात्रीचे दहा वाजून गेले होते. थंडी भयानक पडली होती. वेळ पाहण्यासाठी मी मनगटावरची शर्टची बाही सारली तेव्हा दात वाजवीत जोशीबुवा म्हणाले,

'घड्याळ उघड्यावर काढू नका. थंडीनं ते बंद पडेल !'

'पडू दे. वेळ पाहून तरी काय करायंचय ! आता वेळेप्रमाणं गोष्टी थोड्याच घडणार आहेत ?'

'पारगांवकर, मला कुठं सिगरेट मिळेल काहो ?'

'हो मिळेल की !' माझ्या उत्तरामुळे जोशीबुवांचा चेहरा खुलला. म्हणाले,

'चला, द्या ! एक अख्खं पाकीटच घेऊ !' जोशीबुवा सिगरेटचं सबंध पाकिट कधीच विकत घेत नसतं. आज त्यांच्या मनाची गंमत वाटली. मी उत्तरलो,

'सिगरेट अहमदाबादला गेल्यावर मिळेल !'

जोशीबुवांचा चेहरा पडला.

आम्ही निराश मनानं स्टॉलसकडून परतलो. दूरवर अंधारात एका झाडाखाली विडी पीत असलेली एक व्यक्ती मला दिसली. आम्ही झरझर तिकडे गेला. तो पोलिस होता. अगदी लाजलज्जा सोडून जोशीबुवांसाठी मी पोलिसाकडे एका सिगारेटची याचना केली ! त्याच्याजवळ एकच सिगरेट शिल्लक होती. सारी रात्र थंडीत कुडकुडत काढायची होती. पण त्याने लगेच सिगारेट दिली. जोशीबुवांनी अधाश्यासारखे पाचसहा झुरके ओढले. अक्षरशः त्यांच्याच दुसऱ्या लेखातील

'समाजवादा 'प्रमाणे त्या सिगारेटला त्यांनी ओरबाडून ओरबाडून ओढलं. या ठिकाणी राज्यकर्त्यांचा अगतिकता आणि जोशीबुवांची अगतिकता यांची जात एकच म्हणायला काही हरकत नाही.

त्या गुजराती पोलिसाला मी विचारलं,

'तुम्ही तिकडे बंदोबस्त करायचा सोडून इकडे दूर अंधारात येऊन का बसला ?'

पोलिसाच्या डोळ्यात पाणी तरारलं. पोलिसच रडताना पाहून मला वाईट वाटलं. देशातला पोलिसच जर रडू लागला तर जनतेनं काय करावं ?

'मी सकाळपासून उपाशी आहे साहेब !' तो म्हणाला.

'अरे ? तुमचीही खाण्यापिण्याची काही व्यवस्था नाही केली सरकारनं ? या लाखो जनतेला तर त्यांनी अक्षरश: थंडीवाऱ्यात सोडून दिलंय !'

पोलिसानं पायातील जाड काळी चप्पल बाहेर काढली आणि काडी ओढून त्याने पायापाशी धरली. त्याचे दोन्ही पाय सुजले होते.

'खाणं सोडाच, तीन चार दिवस स्वस्थ थोडा वेळ बसायला देखील मिळालं नाही. त्यामुळे पाय सुजलेयत !'

हे विलक्षण होतं. आता या निराधार माणसांनी खच्चून भरलेल्या वाळवंटात एकही पोलिस दिसत नव्हता याचं कारण हात-पाय सुजून आणि भुकेनं अर्धमेले होऊन सारे पोलिसलोक याच्यासारखेच कुठं कुठं विव्हळत पडले असतील ! मला तिथं त्याच्याजवळ बसवेना.

आता रात्रीचे बारा वाजून गेले होते. थंडीनं थैमान मांडलं होतं. पोटात विलक्षण भूक पेटली होती. विशाल आकाशाखाली माणसांच्या रांगा मूकपणे उभ्या होत्या. पलीकडे पटांगणात बसेस येत होत्या आणि माणसांचा हल्ला त्यांच्यावर होत होता. पाहता पाहता सारी बस माणसांनी गच्च भरत होती. आता एस् टी. च्या जोडीला अहमदाबादमधील सिटी बसेस देखील आलेल्या होत्या. त्या लाल आणि हिरव्या बसेस अक्षरश: कर्मयोगी बनल्या होत्या. तरी पण माणसांची गर्दी हटत नव्हती.

माझ्या मनात विचार आला. देशातील अज्ञान आणि गरीबी देखील अशीच आहे. तिला दूर करण्याकरिता कितीही साधनं वापरा ती काही हटताना दिसत नाही. वीस एकवीस वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळालं, तेव्हाची परिस्थिती आठवून पाहिली तर भारताच्या एखाद्या संपूर्ण प्रांतात मिळून तरी एवढ्या बसेस तेव्हा असतील का ? नक्कीच नव्हत्या. आज एका गावात, एका ठिकाणी, एका समारंभासाठी अठराशे बसेस उपलब्ध होऊ शकतात. तसंच वीस वर्षापूर्वीचं अहमदाबाद शहर घ्या. तेव्हाचं पुणे शहरदेखील किती लहान, तोकडं होतं ! त्याला पेन्शनरांचं शहर म्हणत असत. चालू व्यवसाय करणारे शिक्षक आणि व्यवसायातून बाहेर पडलेले पेन्शनर. याशिवाय पुणे शहराचं व्यक्तिमत्व कोणतं निराळं होतं ? मला आठवतं त्यावेळी या पुण्यात बर्कलेपेक्षा भारीची सिगारेट मिळत नव्हती ! तेच

आज इथं 'लकीस्टाइक' आणि ५५५ सारख्या महागड्या सिगारेटस् मिळतात, पावमिसळीच्या हॉटेलापासून 'लतीफ्' 'क्वॉलिटी'सारखी अद्यावत हॉटेले पुण्यात गजबजली आहेत. आणि बंगले, रस्ते, मोठमोठाल्या इमारती, उद्योगधंदे, व्यापार या साऱ्या दृष्टीनं विचार केला तर आज पुण्याची वाढ पूर्वीच्या पाच पटींनी सहजच झालेली आहे. तीच गोष्ट या अहमदाबादची. सकाळी बसमधून गांधी-नगरला येताना एका गुजराती प्राध्यापकाशी माझं याच विषयावर बोलणं झालं होतं. स्वातंत्र्यकाळापूर्वीचं अहमदाबाद आणि आजचं अहमदाबाद आणि जीवन. मी वर पुण्याविषयीची जी वस्तुस्थिती सांगितली हुबेहूब तीच या शहराच्या बाबतीत त्यांनी मला सविस्तर सांगितली होती.

अहमदाबादच्या व्यापाराविषयी आणि आर्थिक उलाढालीविषयी त्यांनी जे सांगितलं ते अक्षरशः मन थक्क करणारं होतं !

...तरीही पण देशातील गरीबी हटत नव्हती ! अजून बसेस धावत होत्या. हजारो माणसांना एका वेळी घेऊन जात होत्या; पण गर्दी हटत नव्हती ! ... देशात मोठमोठाले प्रकल्प झाले होते. हजारोंच्या संख्येने शाळा आणि कॉलेजे स्थापन झाली होती, शेकडोंच्या संख्येने विद्यापीठे निर्माण झाली होती. संशोधन संस्था, प्रयोगशाळा चालू झाल्या होत्या तरी पण देशातील अज्ञान हटत नव्हते ! आणि प्रकल्पाबरोबरच मोठमोठाले कारखाने, अनेक लहान मोठे उद्योगधंदे निर्माण होऊन देखील गरीबी हटत नव्हती.

शेकडो बसेस धावताना दिसत होत्या पण गर्दी हटत नव्हती, तसेच शेकडो मार्गांनी देश प्रगती करीत असल्याचे प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत होते; पण गरीबी हटत नव्हती. हे एक फार मोठे कोडे होते. आणि हे कोडे सोडविण्यासाठी काँग्रेस फुटली होती. या ऐंशी वर्षांच्या अवाढव्य काँग्रेसला तडा जाताना जो कर्कश्श आवाज झाला, कानठळ्या बसविणारा गगनभेदी आवाज झाला, त्या आवाजातून जे ध्वनी उमटले ते समाजवाद, समाजवाद, या शब्दाचे होते ! ...

रात्रीचा एक वाजत आला होता. मला तर उभे राहवत नव्हते. थंडी अक्षरशः अंगाला डसत होती. मातीच्या वाळवंटात ठिकठिकाणी आगट्या पेटलेल्या दिसत होत्या. मी कुडकुडत जोशीबुवांना म्हटलं,

'चला एखाद्या आगटीवर शेकत बसू !'

घुसणं मिळणं शक्यच नव्हतं. घुसाघूस करणं आणि दांडगाई करणं आमच्या रक्तातच नव्हतं. एका आगटीजवळ आम्ही पोहोचलो. तिथं बसायला जागा मिळाली. जवळ एक तंबू होता. त्यात बायका-मुलं थंडीने कुडकुडत होती. आगटी भोवती पाच-सात माणसं ज्वाळांपुढे हात करून शेकत होती. पलीकडे स्त्रियांसाठी मुत्र्या तयार केलेल्या होत्या. त्यांच्या भिंती तट्ट्यांच्या होत्या. दोन माणसं ते तट्टे फाडीत होते आणि जाळात आणून टाकीत होते. ठिकठिकाणी अशा प्रकारचा जाळ करणं

घाललं होतं. कोणी भकास पडलेल्या हॉटेल्सचे वांबू उपसून आणीत होते, कुणी तंबूचे कापड फाडून आणीत होते.

तासभर आम्ही तिथं बसलो. मला या साऱ्या लाखोंच्या संख्येनं इथं आलेल्या माणसांची कीव येत होती. ही माणसं इथं कशासाठी जमा झाली होती आणि मध्यरात्री जीव धोक्यात टाकून इथं असहाय्य होऊन का पडली होती ?

गरीबी हटत नव्हती...सुधारणा होत होत्या, प्रकल्प होत होते, उद्योगधंदे निघत होते...पण गरीबी हटत नव्हती ! आता 'समाजवादाचा' मंत्र उच्चारून ती हटविण्यात येणार होती. दोन्ही काँग्रेसमध्ये समाजवादाचे मांत्रिक आहेत. इकडे कामराज आणि अशोक मेहता; तिकडे इंदिरा गांधी आणि यशवंतराव चव्हाण ! त्यानंतर समाजवादी आणि संयुक्त समाजवादी पक्षही आहेतच. मग गरीबीचं काय ? या लाखो लोकांच्या भवितव्याचं काय ? पाणी कुठल्या वाळवंटात मुरत आहे ?...

जोशीबुवा ओरडले. 'चला, चला. ही बस मिळेलसं दिसतंय ! थोडी धक्काबुक्की करावी लागेल. थोडं स्वतःला पुढं रेटावं लागेल. निव्वळ इथं आगटीपाशी बसून तुम्हाला बस मिळणार नाही.'

आम्ही उठलो. धक्काबुक्की करीत त्या बसच्या दारापाशी गेलो. पंधरा मिनिटं रेटारेटी करून शेवटी बसमध्ये घुसता आलं. बस चालू झाली. आम्ही सुटकेचा निःश्वास सोडला. मी घड्याळात पाहिलं. रात्रीचे अडीच वाजले होते ! दुपारी अडीचला आम्ही अधिवेशनाला यायला निघालो होतो आणि रात्री अडीचला आम्हाला परतीची बस मिळाली होती. मातीच्या वाळवंटावर असहाय्य माणसांचे थवे दिसत होते. अजून गर्दी हटतच नव्हती. गरीबी हटत नव्हती.

मला एक आठवण झाली. पंडित नेहरूंची व्याख्यानं मी अनेक ऐकली आहेत. त्यांच्या व्याख्यानांना लाखोंच्या संख्येने लोक गर्दी करीत असत. आणि तास तास शांतपणे बसून व्याख्यान ऐकत असत. भाषणाच्या शेवटी पंडितजी 'जय हिंद' म्हणत आणि श्रोत्यांनाही म्हणायला लावीत. तीन वेळ स्वतः म्हणत आणि तीन वेळा श्रोत्यांना मोठ्यानं म्हणायला लावीत. तेव्हा व्याख्याता आणि श्रोता एका पातळीवर येत असे. आता जनतेनं बघ्यांची आणि श्रोत्यांची भूमिका घेण्याचं सोडून दिलं पाहिजे. ऐकण्यापेक्षा करण्याची भूमिका घेतली पाहिजे. विधायक कृतीच्या पातळीवर राज्यकर्ते आणि जनता यांचं मिलन झालं पाहिजे. कर्मयोगापासूनच या देशाचे आता दुसरं पर्व सुरू व्हायला पाहिजे.

एरवी या लाखोंच्या उरुसाला कवडीचीही किंमत नाही !

□ □ □

# आंतर बँक नाट्यस्पर्धा

**मुंबई**

**– अनिल नाडकर्णी**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्पोर्टस् क्लबतर्फे आयोजित यंदाची अकरावी आंतर-बँक नाटयस्पर्धा साहित्य संघ मंदिर येथे मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या स्पर्धा दि. २१, २२ व २३ जानेवारी रोजी झाल्या. स्पर्धेत एकूण बारा बँकांनी भाग घेतला होता.


पहिल्या दिवशी 'होते पण आता!', 'समोरचा नाडकर्णी', 'चिमणी उडाली भुर्रर्' व 'इन्व्हेस्टमेंट' अशा चार एकांकिका झाल्या.

'होते पण आता' ही शंभू दामनीवाला यांची एकांकिका सेंट्रल बँक ऑफ इंडियाने सादर करून स्पर्धेचा शुभारंभ केला. मध्यंतरी मुंबई महापालिकेने पुतळे हलविण्याचा जो कार्यक्रम हाती घेतला होता त्यावरून लेखकाला सुचलेल्या या एकांकिकेत लेखकाने खुद्द पुतळ्यां-च्याच मनातील व्यथा दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. लार्ड डलहौसी, लॉर्ड कर्झन, आलबर्ट एडवर्ड आणि लॉर्ड एडिंबरो या पुतळ्यांना त्यांना त्यांच्या स्थानावरून झालेली उचल-बांगडी कशी जाचक होते हे मोठ्या गमतीदार पद्धतीने दाखविले आहे. जहूर मणियार, श्रीराम दाते यांनी अनुक्रमे 'डलहौसी' व 'एडवर्ड' यांच्या भूमिका ठीक केल्या. विजय व्यवहारकर यांनीही 'हवालदार' व 'क्लार्क' या दोन्ही भूमिकेत गंमत आणली. वसंत कोल्हटकर यांचा 'करसन' मात्र बराचसा कृत्रिम वाटला. या एकांकिकेनंतर बँक ऑफ इंडियाने विजय तेंडुलकर यांची 'समोरचा नाडकर्णी' ही एकांकिका सादर केली. समोरच्या नाडकर्ण्यासारखा आपल्या नवऱ्यानेही जीवनाचा आस्वाद घेत जगावं असा त्याच्याजवळ हट्ट धरून बसणारी सौ. बावडेकर, नाडकर्णी जेव्हा आपल्या बायकोचा खून करून स्वत: आत्मनाश करून घेतो, तेव्हा मात्र कमालीची कावरीबावरी होते अन् मग आपला फाजील हट्ट ती तात्काळ सोडून देते, अशी कथावस्तु असलेल्या या एकांकिकेत अमोल पालेकर हे झाले होते 'श्री. बावडेकर' आणि सौ. अनुया पालेकर या झाल्या होत्या 'सौ. बावडेकर.' दोघांच्याही कामात सफाई होती. सुभाष कीर्तिकर यांनीही वेणीवाल्याचं छोटंसं काम छान केलं. नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेने 'चिमणी उडाली भुर्रर्' ही शाम फडकेंची एकांकिका सादर केली. दोघांच्या मनात असलेली मुलगी तिसराच पटकावतो ही या एकां-

किकेची मध्यवर्ती कल्पना. प्रभाकर पोतनीस यांचा 'वश्या' ठीक वाटला. 'नल्लू'चं काम सरोज कुळकर्णी यांनी योग्य प्रकारे वठविण्याचा प्रयत्न केला. या एकांकिकेनंतर महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह बँकेने वसंत सबनीसांची 'इन्व्हेस्ट-मेन्ट' ही विनोदी एकांकिका अत्यंत उत्तम प्रकारे सादर करून दाखवली. विश्वंभर-पंत हे आपला भाचा दिगंबर याला काव्य नाट्य आदी बाबीत 'अति हुशार' बनविण्याचा प्रयत्न करतात, पण प्रत्यक्षात मात्र बिचाऱ्या दिगंबरला त्यासाठी कसकशा खस्ता खाव्या लागतात हे या एकांकिकेत दाखविले आहे. 'कवी'च्या भूमिकेत गुरुनाथ मिडगावकर हे व 'नाट्यदिग्दर्शक सुरेंद्र'च्या भूमिकेत जे. डी. सुर्वे शोभून दिसले. निंबाळकर यांनी 'विश्वंभर'ची भूमिका सावरून धरली. 'दिगंबर'च्या भूमिकेत डी. डी. कुलकर्णी यांनी विलक्षण बहार आणली. सदर एकांकिकेचं दिग्दर्शन भास्कर पंडित यांनी केलं होतं.

दुसऱ्या दिवशी 'देवमासा', 'स्टेटमेन्ट', 'शहाणे गाढव' व 'यम हरला यम जिंकला' अशा चार एकांकिका सादर करण्यात आल्या.

'देवमासा' हे युजिन ओनीलच्या 'ILE'चे भाषांतर. ही एकांकिका बँक ऑफ बरोडाने सादर केली. कोणत्याही परिस्थितीत देवमाश्याचं तेल घेऊनच घरी परतण्याची जिद्द बाळगणाऱ्या कॅप्टन किनीची ही कथा. शरद सापळे यांनी दिग्दर्शित केलेल्या या एकांकिकेत स्वतः सापळे हे 'कॅप्टन किनी' झाले होते. पण कॅप्टनचा आब राखण्याच्या शिकस्तीत त्यांची भूमिका मात्र अत्यंत कृत्रिम वाटत होती. कॅप्टनच्या पत्नीची भूमिका वठविण्याचा वनिता नार्वेकर यांचा प्रयत्न अतिशय प्रामाणिक होता. शिवाय जयंत कोपरकर यांचा 'बेन' व अरुण जोग यांचा 'नोकर' ठीक होते. सदर एकांकिकेचे नेपथ्य उत्कृष्ट वाटले. युनियन बँकेने यंदा 'स्टेटमेंट' ही रहस्यप्रधान एकांकिका सादर केली. ऑफिसातील आपल्या एका सहकाऱ्याचा खून करून परुळेकर-दाभाडे ही जोडगोळी आपल्या साहेबासमोर ऑफिसचे स्टेटमेंट मोठ्या साळसूदपणे तयार करीत बसतात. पण मध्येच स्वतः साहेबच त्यांच्याकडून त्यांनी केलेल्या खुनाचे स्टेटमेंट घेऊ लागतात तेव्हा मात्र त्यांची पाचावर धारण बसते. युनियन बँक ऑफ इंडियाने ज्या नेटकेपणाने या एकांकिकेची सुरुवात केली तितक्याच चमत्कारिकपणे तिचा शेवट केला. प्रेक्षकांना चक्क त्यांनी बुचकळ्यातच टाकले. त्यातल्या त्यात मधुसूदन जोशींनी 'दाभाडे'ची भूमिका बरी वठवली. या एकांकिकेनंतर देना बँकेने रमेश चौधरींची 'शहाणे गाढव' ही प्रहसनात्मक एकांकिका करून दाखवली. प्रकाश या कथाकाराला त्याच्या कथांवर भाळलेल्या एका मुलीचं अकस्मात पत्र येतं अन् त्यात ती आपण अतिशय कुरूप असल्याचं, पण त्याच्या कथांवर आषक असल्याचं नमूद करते. पत्रात ती त्याच्या भेटीला येणार असल्याचंही कळविते. प्रकाशचं दुसऱ्याच मुलीवर प्रेम असल्या-कारणाने तो ही पीडा टाळण्यासाठी आपल्या मित्राला प्रकाश होऊन त्या मुलीला



। अनिल काळसेकर । शशिकांत कारेकर । एकच प्रश्न ।

सामोरे जाण्याची विनंती करतो अन् मग पुढे कसा नि काय गोंधळ उडतो हे या एकांकिकेत दाखवले आहे. अशोक कुलकर्णी हे ' प्रकाश ' म्हणून बरे वाटले. ' अतुल 'च्या भूमिकेत शरद परुळेकरांचा आवाज आवश्यकतेपेक्षा अधिक निघत होता. ' मंजू 'ची छोटीशी भूमिका प्रतिभा ठोमरे यांनी छान केली. ' यम हरला यम जिंकला ' ही वसंत सवनीस यांची एकांकिका रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सादर केली. मोटार अपघातात जेमतेम प्राण वाचलेली विभिन्न व्यवसायाची मंडळी एकत्र येऊन सचिंत मुद्रेने पुढल्या प्रवासाबद्दल चर्चा करीत असतानाच यम हा त्यांच्यापैकी कुणा एकाचा प्राण नेण्यासाठी येतो. पण अखेर यमालाच गुंगारा देऊन सर्व पळून जातात. ' सगुणा 'च्या भूमिकेत निर्मला देव, ' वकीला 'च्या भूमिकेत मोहन मुरकंडे, आणि यमाच्या भूमिकेत नाना जोशी चमकले. जयश्री बांगर यांनीही ' त्रिवेणी 'ची लहानशी भूमिका जबाबदारीने पार पाडली. ' डॉक्टर ' झालेले वसंत सोमण मात्र अधूनमधून अकारण स्मित करताना दिसत होते.

तिसऱ्या दिवशी ' आली आली गेली गेली,' ' एकच प्रश्न,' ' शल्य राहिले

उरी' आणि ' ब्रह्मांडाची पोकळी आणि अवकाशाच्या आकाशातील पोल ' या एकांकिका झाल्या.

शाम फडके यांची ' आली आली गेली गेली ' ही एकांकिका चार्टर्ड बँकेने सादर केली. उत्तम नाटके सादर करण्याची परंपरा चार्टर्ड बँकेने यंदा मात्र मोडली. पात्र-योजना मुळातच सदोष वाटत होती. आशा केळकर ' कालिंदी' च्या भूमिकेत साधारण वाटल्या. सदर एकांकिकेची बव्हंशी कल्पना ' शहाणे गाढव ' सारखी होती. ' एकच प्रश्न ' ही विजय तेंडुलकरांची एकांकिका पंजाव नॅशनल बँक या गतवर्षीच्या विजेत्या बँकेने विलक्षण सुसूत्रपणे सादर करून दाखवली. बायकोच्या खुनाचा आरोप असलेल्या कैद्याला मानकामेवकील सोडविण्यासाठी येतात, परंतु कैदी मोठ्या कौशल्याने त्या वकीलालाच तुरुंगात डांबून पोबारा करतो अशी या एकांकिकेची कल्पना. अनिल काळसेकरांची ' कैद्या'ची भूमिका वाखाणण्याजोगी झाली. सहज अभिनय, संवादाची अचूक फेक हे काळसेकरांच्या अभिनयाचं वैशिष्टच ! ' मानकामे'ची भूमिका शशिकांत कारेकर यांनी तन्मयतेने साकारली. कमीत कमी नेपथ्य, कमीत कमी रंगभूषा—वेषभूषा आणि कमीत कमी पात्रात एकांकिका यशस्वी करून दाखविण्याची पंजाव नॅशनल बँकेची किमया खरोखरंच कौतुकास्पद आहे. सदर एकांकिकेची प्रकाशयोजनाही कल्पक होती. बँक ऑफ महाराष्ट्रने यंदा ' शल्य राहिले उरी ' हो श्रीनिवास भणगे यांची रहस्यप्रधान एकांकिका करून दाखवली. एका अभागी बहिणीचा भाऊ एका खुन्याचा मोठ्या चलाखीने सूड घेतो अशी एकंदरीत कल्पना असलेल्या या एकांकिकेत भावाची भूमिका जयवंत फडके यांनी केली होती. या एकांकिकेचा प्रयोग सुविहीत असा झाला. सुधाकर पाटणकर यांचे दिग्दर्शन चपखल होते. अखेरची ' ब्रह्मांडाची पोकळी आणि अवकाशाच्या आकाशातील पोल ' ही विजय तेंडुलकरांची नाविन्यपूर्ण एकांकिका स्टेट बँक ऑफ इंडियाने करून दाखवली. मॉडर्न आर्टची टिमकी वाजविणाऱ्यांची या एकांकिकेने मोठ्या मार्मिकपणे टर उडवली आहे. एकाच चित्राकडे निरनिराळ्या दृष्टिकोनातून बघणारी माणसे परस्परांना आपलाच दृष्टिकोन पटविण्याची धडपड करतात, प्रसंगी हे प्रकरण हातघाईवर येतं अन् मग तिथेच झोपलेला त्या चित्राचा निर्माता खडबडून जागा होतो; ते चित्र चुकून उलट लावलं गेलं असल्याचं सांगतो, अशी गंमतीदार कल्पना घेऊन तेंडुलकरांनी ही एकांकिका लिहिली आहे. या एकांकिकेतील ' दाढीवाला ' झालेले अशोक सराफ, ' जंटलमन ' झालेले राजा दाणी, ' लेडी'च्या भूमिकेतील तारका ठेंगडी आणि ' खेडवळ गृहस्थ ' झालेले प्रवीण पाटील या सर्वांनी आपापल्या परीने सुरेख कामे केली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. आत्माराम भेंडे, प्रा. माधव मनोहर व सौ. शांता जोग यांनी काम पाहिले.

गतवर्षी ढाल पटकावलेल्या पंजाब नॅशनल बँकेने यंदाही ढाल आपल्याचकडे

ठेवण्याचा बहुमान मिळवला. (एकच प्रश्न). यावर्षी आणखी एक ढाल (रनर्स-अपसाठी) ठेवण्यात आली होती. ही ढाल कै. आनंदराव ढोलेकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या भाची सौ. रजनी पिल्ले यांनी ठेवली होती. 'यम हरला यम जिंकला' या नाटकाबद्दल रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला ही ढाल मिळाली.

उत्कृष्ट अभिनेता म्हणून पंजाब नॅशनल बँकेच्या अनिल काळसेकर (कैदी-एकच प्रश्न) यांना व उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून रिझर्व्ह बँकेच्या निर्मला देव (सगुणा-यम हरला यम जिंकला) यांना पारितोषिक मिळाले. अभिनयाचं उत्तेजनार्थ पारितोषिक पंजाब नॅशनल बँकेच्या शशिकांत कारेकर (मानकामे-एकच प्रश्न) व डी. डी. कुलकर्णी (दिगंबर-इन्व्हेस्टमेंट: महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह बँक, यांना मिळाले. स्त्रियांमध्ये अभिनयाचं उत्तेजनार्थ पारितोषिक स्टेट बँकेच्या तारका ठेंगडी (लेडी-आकाशातील पोल) व बँक ऑफ इंडियाच्या अनुया पालेकर (सौ. बावडेकर-समोरचा नाडकर्णी) यांना मिळालं. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाबद्दल सुधाकर पाटणकर (शल्य राहिले उरी :-बँक ऑफ महाराष्ट्र) यांना पारितोषिक मिळाले.

तीन दिवस मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या स्पर्धेचं संयोजन श्री. म. शं. देवस्थळी यांनी अत्यंत कौशल्यपूर्वक असंच केलं.

□ □ □


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ¤ डोकेच नाही तर डोकेदुखी कुठली ?

माझे डोके कधी दुखत नाही याचा मला आतापर्यंत अभिमान वाटत आला होता. उलट आमच्या हिचे ॲस्प्रोशिवाय सरत नाही. "आपले नाही बुवा कधीच डोके दुखत ?" अशी मी फारच फुशारकी मारली की आमची ही आर्य स्त्री "डोके असेल तर दुखेल न !" असा हळूच टोमणा मारीत असे. आतापर्यंत मी या टोमण्याकडे दुर्लक्ष करीत होतो, पण आता मात्र तो वाटतो तितका अर्थहीन नाही अशी मला भीती वाटू लागली आहे. कारण थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीला एक डॉक्टरांची परिषद भरली होती तेव्हा एका डॉक्टरने अशी माहिती दिली की हुशार, महत्त्वाकांक्षी अन् श्रीमंत लोकांना डोकेदुखीचा त्रास असतो. च्यायला ! म्हणजे माझे डोके कधीच न दुखण्याची एक सोडून तीन कारण आहेत म्हणायची !

आता श्रीमंत लोकांचे डोके दुखते तेव्हा माझे कधीच दुखायचे नाही हे सांगायला डोके नको. परवा अस्मादिक साहेबाकडे पगारवाढ मागायला गेले तेव्हा केवळ माझा डोकेदुखीचा त्रास वाचावा म्हणूनच साहेबाने डोळे वटारून "जेवढा पगार मिळतोय तेवढे तरी काम करा !" अशा वात्सल्यपूर्ण शब्दात माझी बोळवण केली. आतापर्यंत दोन-तीनदा लॉटरीची तिकिटे घेऊनही दोन-तीन लाख रुपये मिळाल्याने माझा कपाळशूळ उठण्याचा प्रसंग उद्भवलेला नाही ही देवाचीच दया म्हटली पाहिजे. अन् मी बाजारात गेलो की भाजीवाल्यापासून साडीवाल्यापर्यंत प्रत्येक जण माझ्याकडून जास्त पैसे काढतो ते केवळ माझ्याकडे बेसुमार संपत्तीचा संभव होऊन मला अर्धशिशीचा रोग लागू नये म्हणूनच हे मला आता उमजले.

महत्त्वाकांक्षी लोकांचे डोके दुखते तेव्हा माझे दुखायचे नाही हे मात्र मला मान्य नाही. परवा मी साहेबाकडे सबंध पाच रुपये पगारवाढ मागायची छाती केली ती काय महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय ? आज नाही उद्या मी ज्यूनियर क्लार्कचा सीनियर क्लार्कच काय. पण हेडक्लार्क देखील होऊन दाखवीन अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. फाइलीवर मी केलेल्या मार्जिनल नोटिंगमध्ये साहेबाला एकही स्पेलिंगची चूक सापडू नये अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. थोडक्यात म्हणजे माझ्या महत्त्वाकांक्षा गगनाला गवसणी घालणाऱ्या आहेत.

आता बुद्धिमान लोकांना डोकेदुखी असते, इतरांना तिचा त्रास होत नाही हा मुद्दा जरा अडचणीचा आहे. पण तसे पाहिले तर मी बुद्धीची चमक अनेक वेळा दाखविली आहे. लहानपणी शाळेत "औरंगजेब शिवाजीचा कोण ?" असे विचारले तेव्हा मी "मामा !" असे डोकेबाज उत्तर देऊन मास्तरांचा मामा केला होता. हे झाले अगदी जुने उदाहरण. अगदी ताजे उदाहरण द्यायचे म्हणजे परवाच माझ्या नावावर एक लघुकथा छापून आली ती मी डोके चालवून कुठल्या इंग्रजी मासिकातून उचललेली आहे याचा अजून संपादकांना थांगपत्ता लागलेला नाही. सांगायचे काय, माझे डोके उठण्याइतके मला निश्चित डोके आहे. त्यामुळे आपले डोके का दुखू नये याचा विचार करून करून माझे डोके दुखायला लागले आहे.

## ◻ गहू दळण्याचे ॲडव्हान्स ट्रेनिंग

पाव कसा भाजावा हे अडाणी भारतीयांना शिकविण्यासाठी आपल्या सरकारने मागे परदेशी तज्ज्ञ बोलावले तेव्हाच अस्मादिकांनी ओळखले की आज ना उद्या गहू कसा दळावा हे शिकविण्यासाठी देखील परदेशी तज्ज्ञ येणार अन् अगदी तसेच झाले आहे. परवा दिल्लीला शेतकी–तज्ज्ञांची एक परिषद झाली तेव्हा गहू कसा दळावा म्हणजे तो फुकट जाणार नाही याची एका परदेशी तज्ज्ञाने चर्चा केली. आता बोला ! ठाण मांडून जात्यावर बसणाऱ्या हिंदुस्थानातल्या आजीबाईला दळण्याचे ॲडव्हान्स ट्रेनिंग घेण्यासाठी सूटबूट घालून खुर्चीवर बसणाऱ्या साहेबाकडे पहावे लागेल याची कोणाला कल्पना होती ? मला वाटते हा साहेब मेकॅनिकल इंजिनियरिंग व शास्त्रीय गायन यांची शास्त्रोक्त सांगड घालून गहू बारीक दळण्यासाठी कुठली ओवी म्हटली पाहिजे अन् जाडा दळण्यासाठी कुठली याचा पद्धतशीर तक्ताच आजीबाईंना तयार करून देईल. शिवाय देशी गहू दळायला ओवी, तर कॅनडियन गहू दळायला एखादे बीटल्-गीत हेही ओघानेच आले. याच्याही पुढे जाऊन गहू दळायला ओवी तर बाजरी दळायला आर्या, भाकरीचे पीठ हवे असेल तर भावगीत, दशमीचे हवे असेल तर द्वंद्वगीत असला रिसर्चही हा ह. भ. प. (हरभरे भरडण्यात पटाईत) तज्ज्ञ भारताच्या कल्याणासाठी करू शकेल.

◻ ◻ ◻



# मनाची पकड घेणारा कानेटकरांचा पारिजात

वसंत कानेटकरांचे 'घरात फुलला पारिजात' पहाण्यापूर्वी मी 'सत्यकाम' पाहिला होता. 'सत्यकाम'चा विषय मनामध्ये असतानाच हे नाटक पाहिल्याने आणि नाटकाचा विषयही तोच असल्याने दोन्ही कलाकृतींमधील साम्य जाणवले.

सत्यप्रियप्रमाणे ताठ मानेने, सत्याची कठोर वाटचाल तुडवीत समाजातील दुष्टवृत्तींशी संघर्ष करीत, एकलकोंडी शिलेदारी करणारा लाल बियाणी हा कानेटकरांच्या नाटकाचा नायक. पोलिस खात्यामध्ये वरिष्ठ अधिकारी असलेला बियाणी आपल्या नवीन बंगल्यात रहावयास आलेला आहे. घराची मांडामांड चालू असतानाच एक नवखा – लोचट इसम साहेबांसाठी एक पेटी भेट म्हणून घेऊन येतो. साहेब नसताना पेटी तशीच ठेऊन तो निघून जातो. चोरट्या सोन्याच्या एका प्रकरणामध्ये साहेबांनी वाजवीपेक्षा जास्त लक्ष घातल्याने संबंधितांकडून त्यांना ही भेट देण्यात आलेली असते. अर्थात भेटीच्या परतफेडीची अपेक्षा असते. डी. एस. पी. बियाणी भेट आणणाऱ्याला धारेवर धरून त्याने आणलेली खास भेट परत घेऊन जायला लावतात. – पोलिसांच्या जातकुळीशी अशी बेइमानी दाखवणारा अधिकारी खात्याला मानवणे शक्यच नसते. बियाणीसाहेबांसाठी खास सापळा

तयार करण्यात येतो, आणि या सापळ्यात बियाणीसाहेब अचूक सापडतात.

दोन अंकाच्या मधल्या काळामध्ये बियाणी सस्पेंड होतात. पत्नी चंद्रलेखा शाळेत नोकरी पत्करते. सरकारी निवासस्थानातून बाहेर पडलेल्या बियाणींना एका सामान्य जागेत रहावे लागते; पण पतिपत्नींचा पीळ कायम असतो. आपल्यावरील आरोपाविरुद्ध त्यांनी दावा लावलेला असतो. आणि त्या दाव्याचा निकाल आज असतो. इतक्या गोष्टी अंकाच्या सुरुवातीसच समजून येतात. सत्याचा पाठपुरावा करीत जगणे किती अवघड आहे, याची प्रचीती देणाऱ्या अनेक घटना नाटककारांनी या अंकामध्ये मोठ्या खुषीने गुंफल्या आहेत. तसेच मूळ कथावस्तूला पूरक ठरतील असे माणसांचे नमुने, आणि मानवी स्वभावातील अनेक बारकावे कानेटकरांनी मोठ्या कौशल्याने प्रेक्षकांपुढे ठेवले आहेत. जन्मभर कारकुनी करून, वरिष्ठांचे लांगूलचालन करीत भरपूर 'बोकड कमाई' करून घर बांधणारा घरमालक – त्याच्या दांभिकपणासह लीलया वावरताना दिसतो. मालकासाठी स्वतःच्या घराचे सहा हजार रुपये देणारा चाकर, मानवी जीवाचा एक वेगळाच पैलू दाखवून जातो. बियाणींचा जवळचा स्नेही – श्रीसुद्धा जेव्हा बियाणींबद्दल सहजतेने संशयास्पद पद्धतीने बोलतो, त्यावेळी बियाणींवर अक्षरशः आकाश कोसळते. खालच्या कोर्टामध्ये निकाल बियाणींविरुद्ध जातो. आणि एवढ्या हिंमतीचे लालाजी खचून जातात. पोलिस खात्यातून आपल्याला बाहेर काढणाऱ्या वरिष्ठांमार्फत आलेली खाजगी कंपनीमधील एक नोकरी स्वीकारण्याचा मोह पडण्याइतकी त्यांची मानसिक अवस्था दोलायमान होते. पण पति-पत्नी एकमेकाला संभाळून घेत सत्याचे वाण चालवीत राहतात. पत्नी चंद्रलेखा नाटकामध्ये कामे करू लागते – आणि लालाजी केवळ नाईलाज म्हणून, एक तडजोड म्हणून या गोष्टीला मान्यता देतात. हरलेला खटला जिंकण्यासाठी पुन्हा दोघे जिद्दीने उभे राहतात.

तिसऱ्या अंकामध्ये लालजी पुन्हा आपल्या जुन्या अधिकाराच्या जागेवर रुजू झाले आहेत. वास्तविक आता या अंकामध्ये सांगण्यासारखे काही उरलेले नाही. पण कोणत्या विषारी चक्रव्यूहातून लालाजींना वाटचाल करायची आहे याची चुणूक या अंकामध्ये पहावयास मिळते. पुन्हा पुन्हा येणाऱ्या संकटांनी खचलेल्या लालजींना पत्नी पुन्हा आधार देते. आणि नवीन उमेदीने संकटांशी जिद्दीने झुंज घेणारे लालाजी – 'Establish' करून लेखकाने अंक तोडला आहे. लाच देणारा पूर्वपरिचित इसम, आणि आपल्या मुलाला सोडवण्यासाठी लालाजींकडे येऊन प्रेक्षकांच्या समोर लालाजींच्या शिपायास उघड लाच देणारा घरमालक, यांचे प्रसंग नाटककाराने कौशल्याने गुंफले आहेत. चंद्रलेखेने नाटकामध्ये काम करण्यावरून झालेला संघर्षही वास्तवतेच्या पातळीवरून कौशल्याने हाताळला आहे.

वसंत कानेटकरांचे मी बघितलेले गेल्या वर्षीचे हे दुसरे नाटक. 'तुझा तू वाढवी

राजा ' मला आवडले नव्हते. आणि ही नापसंती मी स्पष्टपणे नोंदली होती· कानेटकरांचा 'पारिजात' मात्र मनाची पकड घेणारा आहे. त्याची मुख्य कारणे चार. नाटकाचा विषय अतिशय जिव्हाळ्याचा, आणि सर्वसामान्य प्रेक्षकांना निश्चितपणे आवडणारा आहे. नाटकाची बांधणी विषयाशी प्रामाणिक राहून केली आहे. कानेटकरांच्या हातून उतरलेले संवाद सोपे; परंतु मनाची झटकन पकड घेणारे आहेत. आणि प्रा. मधुकर तोरडमल यांनी प्रयोग कौशल्याने बसवला असून सर्व कलाकारांनी त्यांना मनःपूर्वक साथ दिली आहे. नाटकाच्या तिसऱ्या अंकामध्ये विषयाला जो एका विषारी चक्राचा आकार येतो त्यामुळे नाटक अधिक परिणामकारक होते.

नाटकाचा प्रयोग प्रा. मधुकर तोरडमल यांनी भरपूर मेहनत घेऊन बसवला आहे. दोन बैलांची झुंज, तशाच पद्धतीचे पेंटिंग्ज, आणि विळख्यात सापडलेल्या जवानाची त्यातून सुटण्यासाठी धडपड करणारा पुतळा – हे त्यांनी वापरलेले सिंबॉल्स फार ब्रॉड वाटतात. पुतळ्यावर प्रकाशझोत टाकून नाटकाची सुरुवात करण्याची कल्पना चांगली आहे. लहान-लहान कलाकारांकडून त्यांनी उत्तम कामे करून घेतली आहेत. श्रीबरोबर येणारी ज्योती मात्र अगदीच नवशिकावू वाटते. तिसऱ्या अंकामध्ये लालाजींच्या मनातील संघर्ष तंत्राचा वापर करून प्रभावीरित्या दाखवला आहे. मात्र तो प्रकार नाटकामध्ये फिट बसण्यापेक्षा सिनेमॅटीक वाटतो. लालाजी बियाणींची भूमिका तोरडमल समर्थपणे करतात. – जुन्या लाल्याशी त्यांची तुलना करणे सर्वस्वी गैर आहे. चंद्रलेखाची महत्त्वाची भूमिका आशालता वाबगावकर यांनी भरपूर मेहनत घेऊन प्रामाणिकपणे केली असली तरी वारंवार उफाळून येणाऱ्या कृत्रिम अभिनयामुळे एका विशिष्ट मर्यादेपलीकडे त्या पोचू शकत नाहीत. लाच देणाऱ्या इसमाच्या भूमिकेमध्ये गणेश सोळंखी एकदम पसंत. घरमालक – मनोहर जोशी बेताचेच वाटतात. अतिशय सहजसुंदर अभिनयामुळे दौलतराव ( इनचेकरर ) चांगलेच लक्षात रहातात. आपले छोटे काम त्यांनी अतिशय कौशल्याने आणि जबाबदारीने केले आहे.

एका भेदक विषयावरील प्रभावी नाटक म्हणून या नाटकाचा उल्लेख करावा लागेल. लालाजी बियाणींसारखा ध्येयवादी, झुंज देण्याची जबर ताकद असलेला सामर्थ्यवान पुरुषही चंद्रलेखेसारख्या पत्नीची साथ मिळाली नसती तर कोणत्या वाटेने गेला असता याचा विचार मनामध्ये आला तरी समाजाला लागलेली ही कीड दूर होणे किती कठीण आहे या विचाराने एखाद्या सात्विक मनामध्ये चलविचल माजते.

– शरद गोखले



आराधना या सध्या गाजत असलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक शक्ती सामंता यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेले 'पगला कही का' हे नवीन चित्र शम्मी कपूरच्या सहज़सुंदर अभिनयामुळे प्रेक्षणीय ठरले आहे.

आराधना या चित्रपटाला कथेची जशी घट्ट पकड आहे तशी ती या चित्रपटाला नाही – साधारणपणे सामंतांचे पूर्वीचे चित्रपट ज्या पद्धतीचे होते त्या पद्धतीला साजेशा पद्धतीने चित्रपट तयार करण्यात आला आहे.

शक्ती सामंता चित्र

# पगला कही का

सुरजीत कुमार – या एकाकी जीवन जगणाऱ्या तरुणाच्या जीवनामध्ये शाम नावाचा मित्र येतो. शाम एका मोठ्या हॉटेलमध्ये नोकरी करत असतो. आपल्या मित्राला याच हॉटेलमध्ये तो गायक म्हणून नोकरी लावून देतो. संगीत विभागाचा प्रमुख शाम, गायक सुरजीत, आणि नृत्यांगना जेरी यांच्या निकटच्या सहवासातून सुरजीत–जेरी जवळ येतात. शाम अलग पडतो. श्यामच्या मनात तिच्याबद्दल विशेष भावना असतात. परंतु मित्रासाठी शाम आपली प्रीती व्यक्त करत नाही. हॉटेल मॅनेजर मॅस्वी दारुच्या नशेत सुरजीत–जेरी संबंधी वेडे–वाकडे बरळतो. वाचावाची वाढते आणि मॅस्वीचा खून होतो. खुनाचा आरोप सुरजीत आपल्या अंगावर घेतो आणि खुनाच्या आरोपातून सुटण्यासाठी वेड्याचे सोंग घेतो. डॉक्टरांकडून वेडा ठरवला गेल्याने त्याची वेड्याच्या इस्पितळामध्ये रवानगी होते. हॉस्पिटलमधील एक डॉक्टरीण–शाळू सुरजीत वेडा नसल्याचे ओळखते. सुरजितला वेड्याचा शहाणा केल्याचे नाटक ती अचूक वठवते. वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या एकाकी शाळूच्या मनामध्ये सुरजितबद्दल विशेष भावना निर्माण होतात. तथापि सुरजीत–जेरीच्या प्रीतीची कल्पना असल्याने ती आपल्या भावना व्यक्त करीत नाही. जेरीवर अत्याचार करून शाम जेरीला आपल्याशी विवाह करावयास भाग पाडतो. हॉस्पिटलमधून बाहेर आलेल्या सुरजीतला हा धक्का सहन होत नाही.

तो खरेच वेडा होऊन पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल होतो. शाळूला वस्तुस्थिती समजते. सुरजितला प्रीतीची खास फिल्मी ट्रिटमेन्ट देऊन ती बरी करते. शामचे खरे स्वरूप उघड होते. – अर्थात मॅस्वीचा खून त्याच्या हातून झाला आहे ही गोष्ट गुप्तच रहाते. पोलीस त्याला अटक करतात. जेरीला शामच्या हातून मृत्यू येतो आणि सुरजीत–शाळूचे मिलन होते.

वेड्यांच्या हॉस्पिटलची पार्श्वभूमी सोडली तर कथा नेहमीच्या रुळल्या वाटेने जाते. चित्रपट प्रेक्षणीय होतो तो शम्मी कपूरच्या सुरजीतकुमारच्या भूमिकेमध्ये त्याने दाखवलेल्या कौशल्याने. खास शम्मी कपूरचा असा प्रेक्षकवर्ग निश्चितपणे आहे. नेहमीच्या मर्कटचेष्टा, वेड्या–वाकड्या उड्या, अवास्तव हातवारे, आरडा-ओरडा, या खास ट्रिक्स् वापरून त्याने या प्रेक्षकांचे समाधान केले आहे. तथापि नाजूक भावना व्यक्त करण्याच्या जेरी व शाळूबरोबरच्या हळुवार प्रसंगामध्ये उत्तम रंगत भरून त्याने इतर प्रेक्षकांनाही समाधान दिले आहे. हेलन–केवळ नृत्यांगना नसून तिला अभिनयाचेही अंग आहे. वाट्याला आलेल्या लहान मोठ्या भूमिकांमधून तिने यापूर्वी ही गोष्ट अनेकवेळा सिद्ध केली आहे. ' जेरी 'च्या भूमिकेमध्ये याची तिने पुनः एकदा प्रचीती दिली आहे. प्रेम चोप्रा–शामच्या भूमिकेमध्ये ठाकठीक वाटतात.

शक्ती सामंता यांच्या हाताळणीमध्ये विशेष कौशल्य जाणवत नाही. संजीव, शाम, जेरी आणि शाळू या चार प्रमुख व्यक्तिरेखांपासून कथा दूर जाणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली आहे. सर्वसाधारणपणे हिंदी चित्रपटामध्ये आढळून येणारे उपकथानक या चित्रपटामध्ये नाही. शेवटचे हाणामारीचे प्रसंग, त्यासाठी निवडलेले लोकेशन, या गोष्टी कृत्रिम वाटतात. जेरीचा मृत्यू स्वाभाविक न वाटता–एक गरज म्हणून घडवून आणल्याप्रमाणे वाटतो. ' वेड्यांचे हॉस्पिटल ' म्हणजे विनोदनिर्मितीची हमखास जागा ठरवण्याचा हिंदी चित्रपटांचा परिपाठ आहे. सामंता यांनी हीच परंपरा कायम ठेवली आहे. " मेरी भैस को डंडा क्यू मारा " – या गाण्याचे टेकींग वरील गोष्ट मान्य केली तर पटणारे आहे. एका वेड्याच्या मृत्यूच्या वेळी निर्माण केलेले वातावरण कृत्रिम आहे. या प्रसंगाचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करून घेणे शक्य होते.


रमेश पंत यांचे संवादलेखन ठीक वाटते. चित्रपटाची गरज पूर्ण करण्यापलीकडे त्याचा प्रभाव पडू शकत नाही.

शंकर जयकिसन यांचे संगीत ही चित्रपटाची जमेची बाजू.

आशिक हूँ एक मैहजबी का, व तुम मुझे यूँ भुला न पाओगे, ही गीते त्यांनी चांगली बांधली आहेत. पार्श्वसंगीत चित्रपटाच्या प्रवृत्तीशी मिळते जुळते आहे. ' मेरे भैस को डंडा ' हे गीत मन्ना डेच्या गानकौशल्यामुळे लक्षात राहील.

वर्षामध्ये अनेक चित्रपट प्रदर्शित होतात त्या अनेकांपैकी एक यापेक्षा गंभीरपणे या चित्रपटाची दखल घेण्याचे कारण नाही.

–प्रतिनिधी



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१४ ते २० फेब्रुवारी १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सुखदायक आहे. रवी अकरावा मंगळ बारावा, बुध दहावा, गुरु सातवा, शुक्र-राहू अकरावे व शनी पहिला. सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. फक्त मंगळ बारावा आहे. त्यामुळे उष्णतेचे विकार वाढतील. मनस्वास्थ्य बिघडेल. धनलाभ चांगला होईल. भागीदारीतील धंद्यात फायदा होईल. भागीदार, पत्नी व मित्रांकडून सर्व बाबतीत मदत होईल. चंद्राचे भ्रमण २।३।४ स्थानातून होत आहे ते चांगले आहे. ता. १४।१५ ला वडिलार्जित स्थावराचे व्यवहार करावे. ता. १६।१७।१८ ला घराचे अगर नवीन जागा घेण्याचा विचार असेल तर त्यात यश येईल. घरात शुभ समारंभ घडतील. विवाह जमण्याचा योग येईल. गुरू-रवी-शुक्र-राहू-चंद्र यांचे त्रिकोण होत आहेत. सर्व कामे या तीन दिवसात उरकून घ्यावी. विद्येला थोडीशी अडचण येईल. लिखाण करावयाचे पुढे ढकलावे. वडील भावंडांशी मतभेद होतील. ज्यांची नावे च, ल, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १६।१७।१८

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला हानीकारक आहे. साडेसाती आहे. शनी दशमेश, एकादशेश व्ययात, चतुर्थेश रवी राहूने भ्रष्ट व त्याच्याबरोबर लग्नेश षष्ठेश शुक्र. मानमान्यता व सुख हानी, मित्रांकडून फसवणूक. व्यापार-धंद्यात नुकसान. कंत्राटदार व वाहातुकीचे काम करणारे, कमिशन एजंट यांना नुकसान-कारक. गुरू, शुक्र व चंद्राचा होणारा त्रिकोण चांगला आहे, पण त्याला स्थानबल नाही. तो २।६।१० या घरात झालेला आहे. विद्याभ्यासात यश. शास्त्रीय लिखाण हातून होईल. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तींना साहित्यक्षेत्रात यश मिळेल. संततीपासून सुख लाभेल. या राशीच्या माणसांना नैसर्गिक वाचाशुद्धी असते. गोड बोलून पुष्कळशी हानी कमी होईल. व, व, आणि अ खेरीज सर्व स्वरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १६।१७

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला धनदायक आहे. शनी अकरावा, मंगळ दहावा, रवि-राहु-शुक्र नववे, बुध अष्टमात, गुरू पंचमात, असे सर्व ग्रह

बुधाशिवाय शुभफलदायी आहेत. बुध लग्नेश व चतुर्थेश अष्टमात गेल्यामुळे आरोग्य (मनस्वास्थ्य) व सुख नाश होईल. ज्या घरात सावत्र माता असेल त्यांना जास्त होईल. विद्येत यश लाभेल. व्यापारात फायदा होईल. मशिनरी, प्रिंटिंग वगैरे व्यवसायातील लोकांना जास्त फायदा होईल. सरकारी कामात थोडासा त्रास पडेल. अचानक धनलाभाचा योग येईल. चंद्राचे भ्रमण व्यय, लग्न व धनस्थानातून आहे. ता. १४।१५ ला मानसिक त्रास व पैशाची अडचण येईल. ता. १६।१७ ला सर्व अडचणी दूर होतील. ता. १८।१९ धनदायक जातील. ज्यांची नावे क, प, द, घ, च, फ, झ, ज्ञ ह्या अक्षरांनी सुरू होत असतील त्यांनाही वरील फळे मिळतील.

**कर्क :** या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला पीडादायक आहे. शनी दहावा, मंगळ नववा. मंगळ पंचमेश व दशमेश भाग्यात आहे. कर्केचा हा एकच एक राजयोगकारक ग्रह आहे. रवी-शुक्र-राहू अष्टमात, सप्तमात बुध व चतुर्थात गुरू शुभ आहे. सरकारी कामात अल्प यश. मिलिटरी कॉन्ट्रॅक्टर्स, मेडिकल उपकरणांचे व्यापारी, केमिस्ट, कॉसमॅटिक्सच्या व्यापाऱ्यांना व्यापारात फायदा होईल. सैन्यात भरती करून घेण्याला दिवस चांगले आहेत. ता. १४।१५ या दृष्टीने अधिक चांगल्या आहेत. ता. १६।१७ ला मानसिक यातना व धननाश होईल. ता. १८।१९ त्यातल्या त्यात बरे दिवस आहेत. ह्यादिवशी (१७।१८) सिंडिकेटच्या प्रचाराला जोर येईल. ज्यांची नावे ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरील फळे मिळतील.

**सिंह :** या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला पीडादायक आहे. शनी भाग्यात, अष्टमात मंगळ, सप्तमात रवी-शुक्र-राहू, षष्ठात बुध व तृतीयात गुरू. भाग्यातील शनी व तृतीयातील गुरू सोडून बाकीचे ग्रह अशुभफलदायी आहेत. भागीदारांकडून नुकसानी, धननाश, शत्रूपासून त्रास. सरकारी कामात अपयश. प्रेमप्रकरणात निराशा. सुख व भाग्याचा नाश. चंद्राचे भ्रमण पहिले दोन दिवस दशमातून आहे. ते त्यातल्या त्यात बरे आहे. चुलत घराण्याकडून मदत होईल. ता. १६।१७ ला मित्रांकडून मदत होईल. १८।१९ तारखा वाईट जातील. प्रत्येक काम लांबणीवर पडेल. ज्यांची नावे ग, श, म, ट अगर ठ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १६।१७

**कन्या** या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला सौख्यदायक आहे. अष्टमात शनी, सप्तमात मंगळ, षष्ठात रवी–राहू–शुक्र, पंचमात बुध व धनस्थानात गुरू. वहुतेक ग्रह शुभफलदायी आहेत. संतती विरोध करील, विद्याभ्यासात अपयश, व्यापारात विशेषत:–प्रकाशनकार्यात यश येईल. शत्रुनाश होईल. भागीदारांशी थोडा मतभेद होईल. चंद्राचे गोचरी भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ता. १४।१५ ला

मित्रांच्या मदतीने कार्य होईल. ता. १६।१७ ला मानमान्यता मिळेल. सरकारी कामे होतील. उष्णतेचे विकार होतील. ज्यांची नावे क, प, द, घ, फ, छ, घ, भ, थ ह्यांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. सर्व आठवडाच चांगला आहे. शुभ तारखा १८।१९।२०

**तूळ :** या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला भोगदायक आहे. सातवा शनी, सहावा मंगळ, पाचवे रवी–शुक्र–राहू, चौथा बुध आणि पहिला गुरू. सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. शत्रुनाश होईल. विद्याभ्यासात यश प्राप्त होईल. जमिनीच्या व्यवहारात धनलाभ होईल. सरकारी कामात यश येईल. ४२ च्या पुढे वय असलेल्या व्यक्तींना जास्त धन प्राप्त होईल. पत्नीशी मतभेद होतील. वाहतुकीचे उद्योगात ता. १४।१५ ला अपघात होऊन नुकसान होईल. १६।१७ तारखांना स्त्रियांकडून व्यवसायात नफा होईल. ता. १८।१९।२० ला चंद्राचे भ्रमण दहाव्या घरातून आहे. मानमान्यता मिळेल. घरात काहीतरी शुभ कार्य घडेल. ज्यांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सार्वजनिक कामात भरघोस यश येईल.

**वृश्चिक :** या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला त्रासदायक आहे. शनी सहावा, मंगळ पाचवा, रवी–शुक्र–राहू चौथे, बुध तिसरा व गुरू बारावा. असे सर्वच ग्रह वाईट फळ देणारे आहेत. शत्रूकडून त्रास. सुखनाश होईल. घराबद्दलच्या सरकारी कामात अपयश येईल. विद्याभ्यासात अपयश येईल. धननाश होईल. पराक्रमाला कमीपणा प्राप्त होईल. मित्रांकडून त्रास होईल. धंदा-व्यवसायात नुकसान होईल. भागीदाराबरोबर मतभेद होतील. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून होत आहे. पैकी १६।१७ तारखा मनस्ताप. प्रत्येक कामात नुकसान. ता. १८।१९।२० ला सार्वजनिक कामाकरिता प्रवास योग. सार्वजनिक कार्यात यश. सिंडिकेटचा प्रचार फार जोरात चालेल. न, य, ब, व, आ, इ, उ, ओ ह्या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १८।१९।२०

**धन :** या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला भोगदायक आहे. पाचवा शनी, चौथा मंगळ, तिसरे रवी–शुक्र–राहू, दुसरा बुध व अकरावा गुरू असे सर्व ग्रह अनुकूल आहेत. विद्याभ्यासात यश, शत्रुनाश, पराक्रमाला चांगला. कलावंतांना मोठेपणा मिळेल. कौतुक होईल. विवाह जमण्याचे योग येतील. बौद्धिक व्यवसायात –लिखाण–शास्त्रीय लिखाण हातून होईल. भावंडांकडून व मित्रांकडून भरपूर मदत होईल. सुखाची थोडीशी हानी होईल. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे. मनस्वास्थ्य थोडेसे बिघडेल. ता. १८।१९।२० ला अचानक धनलाभ होईल. ज्यांची

नावे क, प, द, ध, च, घ, थ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. सर्व सप्ताहच चांगला आहे.

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला भोगदायक आहे. चौथा शनी, तिसरा मंगळ, दुसरे रवी-शुक्र-राहू, पहिला बुध व दहावा गुरू असे सर्व ग्रह अनुकूल आहेत. या राशीची माणसे भाग्यवान असतात. लग्नेश शनी चौथ्या घरात आहे. तो सुख व गृहस्वास्थ्य देईल. हा आठवडा धनदायक जाईल. उद्योगधंदा फायदेशीर होईल. रवी-शुक्र युतीमुळे सरकारी अगर सहकारी कामात यश मिळेल. विद्याभ्यासात यश मिळेल. अचानक धनलाभ होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या घरातून आहे. ता. १४।१५ हे दिवस नोकरीबद्दल प्रयत्न करण्याला चांगले आहेत. ता. १८-१९।२० ला भागीदारांकडून व्यवसायात फायदा होईल. पत्नीकडून उत्तम साहचर्य मिळेल. व्यवसायाबद्दल वडील नातलगांकडून मदत होईल. समारंभात भाग घेण्याचा योग येईल. ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १४।१५।१८।१९।२०

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला प्रवासयोग आणणारे आहे. शनी तिसरा, मंगळ दुसरा, रवी-शुक्र-राहू पहिले, व्ययात बुध व भाग्यात गुरू असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. फक्त बुध व्ययात आहे, तो वाईट आहे. संततीचा विरोध, विद्याभ्यासात दुर्लक्ष होईल. मिलीटरीत शिरण्याचा प्रयत्न करण्यास हा सप्ताह चांगला आहे. घरासंबंधीचे व्यवहार होतील. धनप्राप्ती चांगली होईल. प्रेमप्रकरणे निर्माण होतील. चंद्राचे भ्रमण ४।५।६ स्थानातून होत आहे, ते चांगले आहे. ता. १५।१६ ला हातून लिखाण होईल. ता. १८।१९।२० ला प्रवासात नुकसान होण्याचा योग आहे. एकूण सप्ताह साधारणच आहे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट, ठ ह्या अक्षरांनी सुरू होत असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला सुखकारक आहे. दुसरा शनी, पहिला मंगळ, बारावे रवी-शुक्र-राहू, अकरावा बुध व भाग्यात गुरू. शनी लत्तेला आलेला आहे. त्याच्या समोर गुरू आहे. तो लग्नेश दशमेश आहे व मंगळ भाग्येश लग्नी आहे. मान-सन्मान मिळेल, धनप्राप्ती होईल. ३६ वयाच्या पुढील व्यक्तींना शनीचे फळ चांगले मिळेल. सरकारी कामात यश मिळणार नाही. पत्नीकडून व भागीदारांकडून मदत होईल. चंद्राचे भ्रमण ३।४।५ ह्या घरातून आहे. ते अत्यंत चांगले आहे. ता. १४।१५ ला विद्येमुळे मोठेपणा मिळेल. ता. १६।१७ ला घरात शुभ समारंभ होईल. ता. १८।१९।२० ला प्रवासयोग येईल. त्यात फायदाच होईल. क, प, द, ध, य, फ, झ, ञ, घ, छ, थ ह्या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू होत असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १८।१९।२०

□ □ □

# अक्षरपद्धती आणि चालू राजकारण

पंडित वि. म. जोशी, ज्योतिषविशारद

जगातील सर्व शास्त्रांचा पाया ज्योतिषशास्त्र हा आहे. इतकेच नव्हे तर मनुष्य-मात्राचे शरीर आणि त्याचे वैचारिक जगत हेही ग्रहांच्या तत्त्वाने बनलेले आहे. हे मूलभूत तत्त्व घेऊन अक्षरपद्धती निर्माण झाली. आधुनिक शास्त्रज्ञांनीसुद्धा शब्द हे अवकाशात, तसेच लहरीरूपाने राहतात असे सिद्ध केले असून त्याचीच परिणती म्हणजे रेडियोलॉजी निर्माण झाली. यावरून अक्षरांचा मानवी जीवनाशी किती निकटचा संबंध आहे हे सहज लक्षात येईल.

ज्योतिषशास्त्राप्रमाणे अक्षराचे तीन गट होतात. राजकारणात या तीन गटांपैकी एकच गट एकावेळी अधिकारावर येतो व एकाच वेळी अधिकारभ्रष्ट होतो. गटाचे नाव व गटातील अक्षरे खालीलप्रमाणे आहेत.

पहिला गट : शुक्र – मंगळाचा.

अक्षरे : च, ल, र, त, न, य, व, ब आणि सर्व स्वर (अ आ इ वगैरे.)

दुसरा गट : शनि – रवि – चंद्राचा.

अक्षरे : ज, स, ख, ह, ड, ग, श, म, ट, ठ.

तिसरा गट : बुध – गुरूचा.

अक्षरे : क, प, द, ध, (च) फ, झ, ज्ञ, भ, घ, य, छ.

आता वर दिलेल्या अक्षरांच्या गटाप्रमाणे कोणत्याही नावातील पहिल्या अक्षराव-रून म्हणजेच आद्याक्षरावरून त्या त्या नावाचा गट कोणता हे कळते. भारताच्या सध्याच्या राजकारणात इंदिरा गट, निजलिंगप्पा गट, इंडिकेट, सिंडिकेट, सुब्रह्मण्यम्-जगजीवनराम, मुरारजी – स. का. पाटील, आझादनगर–गांधीनगर ही नावे नेहमी ऐकू येतात. किंबहुना याच नावांभोवती सध्याचे राजकारण अधिक निगडीत आहे असे दिसून येईल. म्हणून याच नावांचा अक्षरपद्धतीप्रमाणे विचार करावयाचा.

| | | |
|---|---|---|
| इंदिरा गट : | आद्याक्षर | इ, शुक्र – मंगळाचा पहिला गट. |
| निजलिंगप्पा गट : | आद्याक्षर | न, शुक्र – मंगळाचा पहिला गट. |
| इंडिकेट : | आद्याक्षर | इ, शुक्र – मंगळाचा पहिला गट. |
| सिंडिकेट : | आद्याक्षर | स, शनि – रवि – चंद्राचा दुसरा गट. |
| आझाद नगर : | आद्याक्षर | आ, शुक्र – मंगळाचा पहिला गट, |
| गांधी नगर : | आद्याक्षर | ग, शनि – रवि – चंद्राचा दुसरा गट. |
| सुब्रह्मण्यम् / जगजीवनराम | आद्याक्षरे | स, ज, शनि – रवि – चंद्राचा दुसरा गट. |

| | | |
|---|---|---|
| मुरारजी<br>स. का. पाटील | आद्याक्षरे | म, स, शनि – रवि – चंद्राचा दुसरा गट. |

शनि हा एका राशीत अडीच वर्षे राहतो व राहू हा एका राशीत दीड वर्षे राहतो. शनीचा काळ हा इतरांपेक्षा मोठा कालखंड आहे व राहूचा काळ हा त्यापेक्षा म्हणजे शनीपेक्षा छोटा काळ म्हणून तो छोटा कालखंड आहे.

मोठा कालखंड : अडीच वर्षांचा गट शनीवरून काढावयाचा असतो.

छोटा कालखंड : दीड वर्षांचा गट राहूवरून काढावयाचा असतो.

वर्षाचा गट गुरूवरून काढावयाचा असतो.

महिन्याचा गट रवीवरून काढावयाचा असतो.

दिवसाचा गट चंद्रावरून काढावयाचा असतो.

शनि मंगळाच्या घरात आहे. (मोठा कालखंड)

राहू शनीच्या घरात आहे. (छोटा कालखंड)

मोठ्या कालखंडाला ५, छोट्या कालखंडाला ४, वर्षाला ३, महिन्याला २ व दिवसाला १ असे गुण देऊन काय निष्कर्ष निघतो ते पहा.

| | | गुण | | | गुण |
|---|---|---|---|---|---|
| इंदिरा गट | (मोठा कालखंड) | ५ | निजलिंगप्पा | (मोठा कालखंड) | ५ |
| इंडिकेट | " | ५ | सिंडिकेट | (छोटा कालखंड) | ४ |
| आझाद नगर | " | ५ | गांधीनगर | " | ४ |
| | | १५ गुण | | | १३ गुण |

यावरून इंदिरा गटाला १५ गुण मिळतात व निजलिंगप्पा गटाला १३ गुण मिळतात हे दिसते.

इंडिकेट व सिंडिकेट या दोनही गटांची अधिवेशने डिसेंबर महिन्यातच झाली. त्या वेळी धनेचा रवी होता. महिन्याचा गट रवीप्रमाणे बुध – गुरूचा म्हणजे तिसरा गट आहे; व तो निष्प्रभ झालेला असल्यामुळे दोन्हीही अधिवेशने सुखरूप म्हणजेच निर्विघ्नपणे पार पडली.

१४ जानेवारी १९७० ते १४ मार्च १९७० पर्यंत रवी मकर – कुंभेत आहे. महिन्याचा गट रवीवरून काढावयाचा असतो. तो गट पहिल्या तीन गटांपैकी दुसरा गट आहे. त्यामुळे खाली दिल्याप्रमाणे गुणांची बेरीज होते.

| | मोठा कालखंड, | महिना | | मोठा कालखंड, | महिना |
|---|---|---|---|---|---|
| इंदिरा गट : | ५ | ० | निजलिंगप्पा गट : | ५ | ० |
| इंडिकेट : | ५ | ० | सिंडिकेट : | ४ | २ |
| आझादनगर : | ५ | ० | गांधीनगर : | ४ | २ |
| | १५ + | ० | | १३ + | ४ |
| | एकूण १५ गुण | | | एकूण १७ गुण | |

येत्या दोन महिन्यात निजलिंगप्पा गटाचा वरचष्मा होईल. पण त्यानंतर १४ एप्रिल ते १४ जून १९७० पर्यंत खालीलप्रमाणे परिस्थिती होईल, व याच काळात दोन्ही गटांची तडजोड होऊन पुन्हा कॉंग्रेसमध्ये एकी प्रस्थापित होईल.

| | मोठा कालखंड, | महिना | | मोठा कालखंड, | महिना |
|---|---|---|---|---|---|
| इंदिरा गट | ५ | २ | निजलिंगप्पा गट | ५ | २ |
| इंडिकेट | ५ | २ | सिंडिकेट | ४ | ० |
| आझाद नगर | ५ | २ | गांधी नगर | ४ | ० |
| | १५ + | ६ = २१ | | १३ + | २ = १५ |

अशा रीतीने १४ एप्रिल ते १४ जून १९७० पर्यंत इंदिरा गटाचा जोर राहील व याच महिन्यात इंदिरा गटाचाच जय होईल. यात भारताचा फायदा तर होईलच परंतु या दोन पक्षांच्या (इंडिकेट व सिंडिकेट) ऐक्यामुळे भारतात खरी समर्थ प्रजासत्ताक राज्यपद्धती प्रत्यक्ष अमलात येईल.

वरील गटपद्धतीचा प्रत्यक्ष उपयोग करून पाहिला तर अनुभवसिद्धता मिळते. १९३९ च्या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अशीच अक्षरांच्या गटाची स्थिती होती, व शास्त्रीय दृष्टीनेही गुरू–शनीची अवस्था अशीच होती. त्यावेळीही आजच्या सिंडिकेट–इंडिकेट प्रमाणेच युद्धाचे विरोधी गट होते, व त्यात सिंडिकेटचा पराभव झाला.

इंडिकेट : राष्ट्रे : अमेरिका, इंग्लंड व रशिया.

पुढारी : रुझवेल्ट, वि. चर्चिल, आयसेन हॉवर वगैरे.

हे सर्व शुक्र–मंगळ गटाचे होते.

सिंडिकेट : राष्ट्रे : जर्मनी, जपान व इटली.

पुढारी : हिटलर, हिरोहिटो, मुसोलिनी, गोबेल्स, गोअरिंग, सेसिनकार्ट, फिल्ड मार्शल जोडल.

हे सर्व शनि–रवि–चंद्राच्या गटाचे होते.

अशा रीतीने पाहिले तर वरील सिद्धांताला पुष्टी मिळते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत शनी–रवी–चंद्र या दुसऱ्या गटाचीच सत्ता अधिकारावर होती. (उदा. भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व शास्त्री यांच्या आद्याक्षरावरून यांचा दुसरा गट येतो.) मोहनदास ऊर्फ महात्मा गांधी यांच्या आद्याक्षरावरून त्यांचाही तोच शनी–रवी–चंद्राचा गट असल्यामुळे, त्याच गटाच्या सत्तेने निदान गांधींच्या समाधीला हार घालण्याचे सोंग तरी केले. परंतु आता जो शुक्र–मंगळाचा गट प्रबळ होणार आहे तो महात्मा गांधींचा व गांधी तत्वज्ञानाचा मारक गट आहे. महात्मा गांधींचे बहुतांश मारेकरी हे शुक्र–मंगळ गटाचेच होते. यावरून ज्योतिषशास्त्रदृष्ट्या गांधीयुग नष्ट होईल असे आम्हास वाटते.

□ □ □

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) | 40 Paise | Regd. No. M H-649




" शिष्टमंडळासाठी माझ्याइतका लायक माणूस दुसरा कोण सापडणार आहे? अगदी हा एवढा लहान असल्यापासून या सीमाप्रश्नाचा प्रारंभापासून आतापर्यंतचा इतिहास या डोळ्यानी प्रत्यक्ष पाहिलेला आहे मी. . . . "